# शब्द रुची

४७

जानेवारी २०२३ • मूल्य १० रु. • पृष्ठे ५२


सुलोचना चव्हाण


सुधीर नांदगावकर


नागनाथ कोत्तापल्ले


मोहनदास सुखटणकर


वाचकदिनी उषा मंगेशकर
यांची रंगलेली मुलाखत



एका कलंदराची पंचाहत्तरी!
**अशोक नायगावकर यांचा सत्कार करताना दिनकर गांगल आणि आशिष शेलार**


@abpmajhatv
कट्टा अमर्याद व्यक्तिमत्वांचा
कट्टा दिलखुलास संवादांचा!
abp
माझा
१०
माझा कट्टा
दशकाचा...दर्शकांचा...
पाहा दर शनि. रात्री ९ वा. आणि
पुन:प्रक्षेपण रवि. सकाळी ९ वा.
एबीपी माझावर
एपिसोड्स पाहण्यासाठी स्कॅन करा.
6.15 million Followers
1.39 million Followers
1.42 million Followers
9.64 million Subscribers
facebook.com/abpmajha
instagram.com/abpmajhatv
twitter.com/abpmajhatv
www.kooapp.com/profile/abpmajha
youtube.com/abpmajhatv
www.abplive.com
For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

शब्द रुची ४७

**जानेवारी २०२३, वर्ष नववे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**
**साहाय्य – अर्चित नागवेकर**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

लावणीच्या मळ्यातील गोड गळा : पद्मश्री सुलोचनाताई चव्हाण / ५
**प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**

चित्रपटाच्या रस्त्याचे अविरत गाणे / ८
**श्रीकांत बोजेवार**

शब्दांच्या भूमीत सकस लेखनाचं पीक काढणारा लेखक / ११
**प्रवीण बर्दापूरकर**

एक सकारात्मक व्यक्तिमत्त्व / १४
**निरुपा केणी**

मनाचे तरंग लिहिणारा कलाकार महेंद्र गौतम / १७
**किरण येले**

ॲस्पी पटेल / २१
**प्रकाश दुधलकर**

**वाचकदिन क्षणचित्रे / २५**

एका ठिणगीमुळे वणवा पेटू शकतो / २९
**शरद काळे**

चौदाव्या शतकातील कलावंत / ३४
**विजयराज बोधनकर**

**ग्रंथाली प्रकाशन वृत्तांत / ३८**

**ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ४४**

# संपादकीय...

ग्रंथालीचा अठ्ठेचाळिसावा वाचकदिन २५ डिसेंबर रोजी पार पडला. सहा नव्या पुस्तकांचं प्रकाशन 'एबीपी माझा'चे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते झालं. त्याचा वृत्तांत अंकात आहे. त्याबरोबर गेल्या महिन्यात अन्यही पुस्तकं प्रसिद्ध झाली. एकूण वर्षाअखेरचा महिना नवं साहित्य घेऊन आला आणि त्याची सांगता झाली दोन अविस्मरणीय कार्यक्रमांनी.

वाचकदिनी ख्यातनाम गायिका उषा मंगेशकर यांची दिलखुलास मुलाखत श्रोत्यांना अनुभवता आली. मंगला खाडिलकर यांनी ती छान खुलवली. नव्वदीच्या घरातल्या, तब्येत बरी नसतानाही उषाताई आल्या. लावणीचे प्रकार सांगताना त्यांनी झलक दाखवायचा प्रयत्न केला, मात्र इच्छा असूनही गाता येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. 'ग्रंथाली'चं कार्य माहीत आहे, मला साहित्यप्रेमी रसिक लाभले याचा आनंद वाटला असं सांगून त्यांनी 'ग्रंथाली'नं देऊ केलेलं मानधनही घेतलं नाही. त्या आल्या आणि मनमोकळा संवाद साधला, तेव्हा खरंच मनात कृतज्ञता दाटली.

दुसरा कार्यक्रम झाला तो अशोक नायगावकर यांच्या वयाच्या पंचाहत्तरीनिमित्त 'ग्रंथाली'नं आयोजलेल्या सत्काराचा. ज्येष्ठ पत्रकार, ग्रंथालीचे संस्थापक दिनकर गांगल आणि आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. हास्यकवी म्हणून पाहिलेल्या-ऐकलेल्या नायगावकर यांची कविता कशी अंतर्मुख करणारी आहे, ती हास्य नव्हे व्यंगकविता आहे, समाजातील व्यंगावर ती उपरोधिक भाष्य करते मात्र विनोदाच्या आवरणातून, असं त्यांच्या कवितेचं मर्म नीरजा, अशोक बागवे आणि अरुण म्हात्रे यांनी उलगडलं. नायगावकर ही एक उत्स्फूर्त व्यक्ती कशी आहे, विनोद त्यांचा सहजधर्म कसा आहे याचे किस्से रामदास फुटाणे यांनी त्यांच्यासह केलेल्या मैफिलींच्या आठवणींतून सांगितले. आमदार आशिष शेलार यांनीही थोडक्या भाषणात नायगावकर यांचं योगदान सांगताना विधानसभेतील गदारोळापेक्षा इथे उपस्थित राहणं आनंददायी असल्याचं म्हटलं. श्रीकांत बोजेवार आणि महेश केळुसकर यांनी आपल्या भाषणांना समयोचित आवर घालून अशोक नायगावकर यांना अधिक वेळ दिला आणि नायगावकरांनी आपल्या खुमासदार काव्यवाचनानं सभागृह डोक्यावर घेतलं. हास्याच्या कल्लोळात सारे न्हाले. याचवेळी आपल्या पंचाहत्तरीनिमित्त दहा साहित्यसंस्थांना अर्थसाहाय्य करत त्या संस्थाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे नायगावकर, मराठी वाचक वाढला पाहिजे अशी कळकळ व्यक्त करणारे नायगावकर एक आदर्श निर्माण करते झाले.

डिसेंबर २०२२ असा भरगच्च व लक्षात राहतील अशा कार्यक्रमांचा महिना झाला, तरी वर्षाअखेरच्या या महिन्यानं वर्षारंभीसारखेच काही दुःखद दिवसही दाखवले. ज्यांच्या लावणीनं रसिकांना मुग्ध केलं, घराघरात लावणी पोचली आणि ज्यांच्या ठसक्यानं ती सजली त्या सुलोचना चव्हाण यांनी जगाचा निरोप घेतला. नाट्यसकलावंत आणि 'ग्रंथाली'शी जोडलेले मोहनदास सुखटणकर, माजी संमेलनाध्यक्ष नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रंथाली'च्या आरंभीच्या काळात खजिनदार राहिलेले नरेंद्र आपटे, 'ग्रंथाली'चे लेखक व सर्वतोपरी साहाय्य करणारे आदिनाथ हरवंदे यांच्या निधनाच्या बातम्या चटका लावणाऱ्या आहेत. जगविख्यात फूटबॉलपटू पेलेदेखील आपल्यात राहिले नाहीत. या जादुगारानं त्याच्या पदलालित्याचा ठसा क्रीडाप्रेमींच्या हृदयावर कायमचा कोरला आहे. सिनेमा पाहण्याची दृष्टी देणारे, त्याची चळवळ उभी करणारे प्रभात चित्र मंडळाचे संस्थापक सुधीर नांदगावकर यांच्या निधनाची बातमी मन विषण्ण करणारी आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने पुरस्कार दिला जातो. त्या फाऊंडेशनचे एक संस्थापक आणि समाजभान जपणारे व्यक्तित्व सुनील देशमुख यांचे निधनही दुःखदायक आहे.

असे कडू-गोड अनुभवांचे २०२२ सरले आहे. येणारे वर्ष नवी आशा, नवी स्वप्नं घेऊन येईल. 'ग्रंथाली'ही नवे उपक्रम आखत आहे. त्यात आपला सहभाग असणारच आहे. पुढील अंक विज्ञानविशेषांक असून त्याचे अतिथी संपादक शरद काळे आहेत.

नव्या पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा.

**- अरुण जोशी**

# लावणीच्या मळ्यातील गोड गळा : पद्मश्री सुलोचनाताई चव्हाण



**प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**

**सहा** दशकांपासून रसिकजनांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या पद्मश्री सुलोचनाताई चव्हाण यांचं नुकतंच निधन झालं. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला केलेला हा सलाम. सुलोचनाताई यांचा जन्म कोल्हापूर येथील कदम कुटुंबात १३ मार्च १९३३ रोजी झाला. दिसायला देखणी असणाऱ्या माई लहानपणापासूनच चुणचुणीत आणि हुशार होत्या. घराण्यात गायकीची कुठलीही परंपरा नसताना त्यांनी गायनक्षेत्र निवडलं. माई सात वर्षांच्या असताना मुंबई येथील गिरगावच्या फणसवाडीमध्ये त्यांच्या कुटुंबानं आपलं बस्तान बसवलं. त्यांच्या आई भाजीपाल्याचा व्यवसाय करत असत. त्याचदरम्यान मेळ्यामध्ये माईंना अभिनय करण्याची संधी चालून आली. त्यावेळी श्रीकृष्ण बालमेळा हा खूप प्रसिद्ध होता. त्या बालमेळ्यात त्यांना नाटकांमध्ये गायनाची संधीही चालून आली. १९४७ च्या दरम्यान त्यांना चित्रपटात पार्श्वगायन करण्यासाठी निमंत्रित केलं. लौकिक अर्थानं कुठेही गायनाचं प्रशिक्षण घेतलेलं नसतानासुद्धा सुलोचना चव्हाण यांना गोड गळ्याची देणगी मिळाली. लौकिक अर्थाने कुठलाही गुरू नसला तरी त्यांचे पती श्यामराव चव्हाण हे सतत सुलोचनाबाईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. गाणं कसं असावं? शब्दउच्चारण कसे असावेत? त्याचा स्वभाव कसा असावा? गाण्यातील हरकती कशा असाव्यात? या सगळ्या बारीकसारीक गोष्टी शामरावने त्यांना शिकवल्यामुळे आणि तेवढ्याच तत्परतेनं त्यांनी श्यामरावांना प्रतिसाद दिल्यामुळेच आज सुलोचना चव्हाण हे नाव जगभर प्रसिद्ध झालं.



सुलोचनाताई चव्हाण

ज्या काळात त्यांचं कलाक्षेत्रात पदार्पण झालं तेव्हापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत तमाशा, लावणी यासारख्या कलाप्रकाराकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन थोडा वेगळा होता. नाकडोळे मोडून पाहणाऱ्या पांढरपेशा समाजाला सुलोचनाताई यांनी लावणीसारख्या कलाप्रकाराकडे सकारात्मकतेनं पाहण्यास

आणि ऐकण्यास भाग पाडलं. सुलोचना चव्हाण यांची लावणी घरंदाज आणि ऐश्वर्यवान होती. त्यांनी फडावरची लावणी माजघरात पोहोचवली. लावणीचं सौंदर्यस्थळ ओळखून, डोईवरचा पदर ढळू न देता लावणीला एक संस्कारक्षम बैठक दिली आणि लावणी जगभरात पोहोचवली. गाण्यातल्या शब्दांचं वैभव त्यांनी आपल्या आवाजाने फुलवलं. त्याचं गायन केवळ लावणीपुरतंच मर्यादित नव्हतं तर हिंदी, गुजराती, पंजाबी, तमिळ अशा अनेक भाषांमध्ये त्यांचं मोलाच सांगितिक योगदान आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी कोणीतरी त्यांची गाठ मूळचे ग्वाल्हेरचे गायक-संगीतकार श्यामबाबू पाठक (त्यांना विष्णू दिगंबर पलुस्कर यांचा आशीर्वाद लाभला होता) यांच्याशी घालून दिली आणि १९४७ साली बाईंना 'कृष्ण सुदामा' या चित्रपटासाठी गायची संधी मिळाली. त्यामध्ये बाईंनी दोन सोलो गाणी गायली. त्याच वर्षी संगीतकार रशीद अत्रा (पगली, पन्ना, शिरीन फरहादचं संगीत त्यांचंच) आणि नंदराम ओंकारजी ('बहादूर जीवन' वगैरे चित्रपटांचे संगीतकार) यांनी त्यांच्याकडून गाणी गाऊन घेतली. १९४८ मध्ये त्यावेळेचे प्रसिद्ध संगीतकार ज्ञानदत्त यांनी सुलोचनाबाईंना बोलावलं. दुखियारी, लाल दुपट्टा, नाँव आदी चित्रपटांत त्यांनी गाणी गायली. ज्ञानदत्त आणि शामसुंदर हे सुलोचनाबाईंचे आवडते संगीतकार. श्यामसुंदर यांच्या संगीतामुळेच सुलोचनाबाईंची हिंदी पार्श्वगायनक्षेत्रात ओळख निर्माण झाली. १९५१ सालच्या 'ढोलक' आणि 'काले बादल' या चित्रपटांत बाईंनी शामसुंदर यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली कमाल करून दाखवली. 'इस दुनिया में क्या होता', 'किसी मजबूर का जलता हुआ' ही 'काले बादल'मधील गाणी आणि 'छलक रहा है' आणि 'चोरी चोरी' ही 'ढोलक'मधील गाणी तुफान लोकप्रिय झाली. रफीबरोबर बाईंनी 'मगर ए हसीन, ऐ बेखबर' हे अविस्मरणीय गीत गाऊन अक्षरशः धमाल केली. दुश्मनी, बाबूजी, सागर, दामाद हे सुलोचनाबाईंचे अन्य उल्लेखनीय चित्रपट. १९५३ पर्यंत त्या हिंदी चित्रपटांसाठी गात राहिल्या. १९५३ मध्येच त्यांचा विवाह शामराव चव्हाण यांच्याशी झाला. १९५९ साली 'नकाबपोश' या चित्रपटात त्यांनी एक गाणं गायलं आणि नंतर त्या मराठी चित्रपटांसाठी गाऊ लागल्या. सुलोचनाबाईंचं हिंदी चित्रपटसृष्टीत नाव झाले होतं. 'दुश्मनी'मधील 'फिर लौट के आजा' हे त्यांचे गीत ऐकल्यानंतर, त्यांनी आणखी काही वर्षं तरी हिंदी चित्रपटांसाठी गाणी का गायली नाहीत, असं वाटत राहायचं.. अर्थात मराठी लावण्या आणि चित्रपटगीतं यामध्ये सुलोचनाबाईंचा ठसका, जोरकसपणा आणि ढंगदारपणा हा कायम स्वरूपी लक्षात राहणारा आहे. १९२० पासून सुरू झालेला हा संस्कारक्षम वारसा आज २०२२ मध्येसुद्धा जिवंत आहे आणि पुढेसुद्धा त्यांच्या गाण्याने जिवंत राहील.

'दांगट मळ्याचा बाज गोड गळ्याचा साज' असा कृष्ण-कोयनेचं मिलन झालेला सुलोचना चव्हाण यांचा आवाज. फड सांभाळ तुऱ्याला ग आला, यो यो पाहुणा, कसं काय पाटील बरं हाय का, यासारख्या अजरामर लावण्या त्यांनी गायल्या. चित्रपटातील पार्श्वगायनासोबत मराठी चित्रपटातील लावणीगायन ही सुलोचनाबाईंची खरी ओळख झाली. त्यांना त्यासाठी लावणीसाम्राज्ञी हा किताब आचार्य अत्रे यांच्याकडून प्राप्त झाला. फडावरची लावणी रुपेरी पडद्यावर आणि थेट माजघरात लोकप्रिय करण्याचं ऐतिहासिक कार्य सुलोचनाबाईंनी केलं. त्यांनी लावणी सादरीकरणाचे हजारांवर प्रयोग केले. वत्सलाबाई कुमठेकर यांनी गायलेल्या 'सांभाळ गं , सांभाळ गं', 'दौलत लाखाची' या लावणीनं सुलोचनाबाई विलक्षण प्रभावित झाल्या. आचार्य अत्रे यांच्या 'हीच माझी लक्ष्मी' या चित्रपटात त्यांनी मराठीतलं पहिलं पार्श्वगायन केलं. संगीतकार वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेल्या सुलोचनाबाईंनी गायलेल्या या गीताला रुपेरी पडद्यावर हंसा वाडकर यांनी साकार केलं होतं.

१९५२ साली 'कलगी तुरा' या चित्रपटासाठी त्यांनी लावणीगायन केलं. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शक होते श्यामराव चव्हाण. लावणीगायनात सुरांची नजाकत आणि शब्दफेक यांचं शिक्षण सुलोचनाबाईंना श्यामराव चव्हाण यांनी दिलं. १२ ऑगस्ट १९५३ रोजी त्या श्यामराव चव्हाण यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. 'रंगल्या रात्री' अशा या चित्रपटातील सुलोचना चव्हाण यांच्या लावण्या खूपच गाजल्या. गीतकार जगदीश खेबूडकर यांनी लिहिलेल्या लावण्यांपैकी 'नाव गाव कशाला पुसता अहो मी आहे कोल्हापूरची, मला हो म्हन्त्यात लवंगी मिरची' ही लावणी सुलोचना चव्हाण यांनी लावणीच्या मूळ ठसक्यात गाजवली.

मुळामध्ये सुलोचना चव्हाण या नृत्यांगना नव्हत्या. त्या रंगमंचावर बसून गेय पद्धतीनं लावणी सादर करायच्या. कपाळावर ठसठशीत कुंकू, गव्हाळ वर्ण, डोईवरचा पदर ढळू न देता संस्कारक्षम लावणी त्यांनी समाजापुढे आणली. त्यांच्या गायकीची भुरळ ही फक्त भारतीयांनाच नव्हती तर श्रीलंका, सिलोन रेडिओ, आकाशवाणी दिल्ली, आकाशवाणी पाकिस्तान, यांनाही पाडलेली आहे. माईंनी गायनातले सर्व प्रकार म्हणजे भावसंगीत, भक्तिसंगीत, चित्रपटसंगीत आणि लोकसंगीत हाताळले. मराठी, हिंदी, पंजाबी, गुजराती अशा शेकडो चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केलं. ग.दि. माडगूळकर, जगदीश खेबूडकर, पी. सावळाराम, अशोकजी परांजपे, सी. रामचंद्र अशा ज्येष्ठ संगीतकारांच्या गीतांना आणि लावण्यांना सुलोचनाबाईंनी आवाज दिला. त्यांच्या लावण्या ठसकेबाज असल्या तरी त्या शालीन होत्या.

सुलोचनाबाई म्हणजे केवळ लावणी हा समजही चुकीचा असून लावणीबरोबरच अभंग आणि भावगीतंदेखील त्यांनी गायली. नेफा आघाडीवर त्यांनी जवानांचे मनोरंजन केले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर आपल्या गीतांच्या चाहत्या होत्या असं सुलोचनाबाई मोठ्या अभिमानानं सांगत. लता मंगेशकर यांचा आवाज ही या पृथ्वीतलावर लाभलेली, देवादिकांनी दिलेली देणगी आहे असं त्या मोठ्या अभिमानानं सांगत. वसंत पवार, वसंत देसाई, पी. सावळाराम, जगदीश खेबूडकर अशा अनेक गीतकार आणि संगीतकारांचे अनुभव सांगताना त्या प्रत्येक संगीतकाराच्या

विशिष्ट लकबी सांगत. आपले पती शामराव चव्हाण आणि वसंत पवार यांचा लावणीच्या संगीतदिग्दर्शनामध्ये हातखंडा होता असं त्यांनी अनेक मुलाखतींमधून सांगितलं. त्यांनी आपलं घरंदाजपण सातत्यानं टिकवलं होतं. त्यांनी लावणीला शृंगाराचा दर्जा दिला पण त्यांची लावणी अभिजात लावणी होती. ती ठसकेबाज, कुरेबाज असली तरी त्यांच्या लावणीमध्ये वेगळी शालीनता होती आणि ती त्यांनी सातत्यानं जपली होती. त्यांच्या लावणी सादरीकरणात त्यांचे पती श्यामराव चव्हाण आणि पुत्र विजय चव्हाण यांची साथ असायची. श्यामराव चव्हाणांची पेटी आणि विजय चव्हाण यांची ढोलकी असली की मग त्यांच्या लावणीमध्ये वेगळाच रंग भरला जायचा. त्यांच्या प्रकट मुलाखती आणि लावणीचं सादरीकरण म्हणजे जणू दुधात मिसळलेली खडीसाखर.

सुलोचना चव्हाण कलावंत म्हणून तर मोठ्या होत्याच, शिवाय एक दानशूर व्यक्ती म्हणूनसुद्धा त्या खूप मोठ्या मनाच्या होत्या. गोरगरीब, अंध-अपंग, अनाथ अशा मुलांना त्यांनी सढळ हातानं मदत केलेली आहे. खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशी चौफेर मुशाफिरी करून गायनाचे कार्यक्रम सादर केले. त्यातून मिळालेल्या बिदागीमधून देणग्या दिल्या. मंदिरं, शाळा, आश्रमशाळा, अगदी स्मशानभूमी उभारणीसाठी मोठ्या मनानं व सढळ हातानं मदत केली. २०१९ मध्ये कोरोना येण्याच्या अगोदर लोणावळ्यामध्ये एका अनाथआश्रमानं विजय चव्हाण आणि आमचा एक सांस्कृतिक कार्यक्रम वृद्धाश्रमासाठी आयोजित केला होता. तेथील आयोजकांनी आमच्या हातामध्ये मानधनाची रक्कम दिली. तेव्हा सुलोचना चव्हाण यांनी त्या गोरगरीब वृद्धांना ही मानधनाची रक्कम बक्षीस म्हणून द्या अशा सूचना आम्हाला केल्या. या महान कलावतीकडे दातृत्वाची आणि दानत्वाची श्रीमंती होती. त्या नेहमी म्हणायच्या की एक उत्तम कलावंत होण्यापेक्षा एक माणूस होणं खूप गरजेचं आहे ही मानवतावादाची जाणीव सुलोचना चव्हाण यांच्याकडून शिकण्यासारखी आहे. सुलोचना चव्हाण सुसंस्कारित होत्या तसाच त्यांचा परिवारही संस्कारक्षम होता. मोठा मुलगा जय, छोटा विजय, सुना, नातवंडं असा हा परिवार. काही वर्षांपूर्वी जयचं अचानक निधन झालं. पुन्हा सुलोचनाताईंवर आणि परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. पण त्या डगमगल्या नाहीत. अनेक पारिवारिक संकटे आली तरी त्यांचं गाणं चालूच होतं. अलीकडच्या काळात कोरोनानंतर त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चाललेली होती. वार्धक्यानं नव्वदी पार केली होती. असं म्हणतात वृद्धात्वात स्मृती जाते, परंतु सुलोचनाताईंची स्मृती शेवटच्या घटकेपर्यंत जागृत होती. समोरून कोण आलंय याचं भान त्यांना होतं. आवाजातली हरकत आता पूर्वीसारखी नव्हती, तिची धार थोडी बोथट झाल्यासारखं होते, पण त्या एकदा गाणं म्हणायला लागल्या तर पूर्ण गाणं त्यांना मुखोद्गत असायचं. शरीर साथ देत नसलं तरी त्यांच्या गळ्यानं त्यांना शेवटपर्यंत साथ दिली. विजयची रेकॉर्डिंगची कामं, परदेशातले दौरे थांबले होते तरी लोककला अकादमीतली नोकरी आणि पारिवारिक कर्तव्यं सांभाळून माईंसाठी पूर्णपणे स्वतःला झोकून दिलं. आता मात्र विजयची आणि परिवाराची तारेवरची कसरत सुरू झाली. विजयचा स्वभाव तसा मिश्कील. माई आजारी होत्या तरी त्यांना काहीना काही कारणाने विजय हसवत असे. त्यांचं निधन होण्याअगोदर काही दिवसांपूर्वी अकादमीतील वादन सहकारी कृष्णा मुसळे सुलोचनामाईंना भेटण्यासाठी फणसवाडीला त्यांच्या घरी गेले असता विजय चव्हाण यांनी माईंना विचारलं, माई, हे बघा तुम्हाला भेटायला कोण आलंय? हे गृहस्थ छान पद्धतीनं गिटार वाजवतात! तेव्हा सुलोचनाताईंनी विजयला सांगितलं तू काय माझी मस्करी करतोयस का? मी काय याला ओळखत नाही का? अरे, हा आपला पांडूबुवाचा मुलगा कृष्णा आहे. हा तुझ्याबरोबर असतो ना! हीच खरी पावती त्यांच्या स्मृतीची होती. सुलोचना चव्हाण यांच्या गायिकीनं लोकांचं मनोरंजन तर केलंच, त्याबरोबर प्रबोधन, उद्‌बोधनही केलं. त्यामुळेच त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं. सुलोचना चव्हाण त्या प्रचंड स्वाभिमानी होत्या. या स्वतः साठी कधीच कुणाकडे काही मागण्यासाठी गेल्या नाहीत. त्यांना रसिकांनी भरभरून प्रेम दिलं. महाराष्ट्र शासनानं त्यांचा गौरव केला. भारत सरकारनं त्यांना 'पद्मश्री'नं सन्मानित केलं. गायकीच्या क्षेत्रात चौफेर मुशाफिरी करणारी ही कलावंत १० डिसेंबर २०२२ रोजी काळाच्या पडद्याआड गेली. सुलोचना चव्हाण शरीरानं आपल्यामध्ये नसल्या तरी गोड गळ्यातील सुरांच्या स्मृती कायम आपल्या सोबत राहतील. त्यांच्या स्मृतीस माझा मानाचा मुजरा.

**- प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**
भ्रमणध्वनी : ९८२०४५१७१६
ganesh.chandan20@gmail.com

ग्रंथाली

**अशोक बेंडखळे यांची पाच पुस्तके**












**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रुपये**
**टपालखर्च ५० रु.**

# चित्रपटाच्या रस्त्याचे अविरत गाणे



**श्रीकांत बोजेवार**

**प्रसंग** १९९२ सालचा. कुमार सोहोनी दिग्दर्शित 'आहुती' या चित्रपटाचा पत्रकारांसाठीचा खास खेळ इरॉस मिनी थिएटरमध्ये आयोजित करण्यात आला होता. मला 'लोकसत्ता'मध्ये रुजू होऊन सहा महिने झाले होते आणि चित्रपटाचं समीक्षण लिहायला सुरुवात करून जेमतेम दोन महिने झाले होते. त्यापूर्वी मी 'सकाळ'मध्ये असताना १९९१च्या दिवाळीच्या सुमारास तीन-चार चित्रपटांचं परीक्षण केलं होतं. उण्यापुऱ्या आठ ते दहा चित्रपटांच्या समीक्षणांचा किंवा परीक्षणांचा अनुभव गाठीशी घेऊन मी काही गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करत होतो. 'आहुती'च्या खेळाच्या मध्यंतरात 'तुम्हीच लिहिताना लोकसत्तामध्ये?' असं विचारत ज्या हसऱ्या आणि आश्वासक चेहऱ्याच्या व्यक्तीनं खांद्यावर हात ठेवला ते होते सुधीर नांदगावकर!

या सलामीच्या भेटीत माझ्या लिखाणाबद्दल चकार शब्दही न बोलता त्यांनी 'उद्या प्रभातमध्ये या संध्याकाळी गप्पा मारायला' असं निमंत्रण दिलं. तोवर मला 'प्रभात' ही काय भानगड आहे ते माहीतही नव्हतं. रीतसर पत्रकारितेचं प्रशिक्षण वगैरेही मी घेतलं नसल्यानं अनेक बाबींचा मला गंध नव्हता, मात्र चित्रपटांचं वेड असल्यानं वसंत भालेकर, इसाक मुजावर, शिरीष कणेकर, पद्माकर कुलकर्णी, सुधीर नांदगावकर ही नावं चांगलीच माहीत होती. दुसऱ्या दिवशी मी प्रभातमध्ये गेलो आणि त्या दिवशी माझ्या चित्रपटविषयक अभिरुचीला, आकलनाला आणि एकूणच या



सुधीर नांदगावकर

माध्यमाकडे पाहण्याला वळण लागलं. त्यानंतर १९९२ ते २०२२ या तीस वर्षांच्या प्रवासात अनेक गुण-दोषांसह नांदगावकर हे मित्र, मार्गदर्शक, पाठीराखे म्हणून अनुभवता आले. त्यांच्यामुळे मी 'प्रभात चित्र मंडळा'त रमलो, काम करू लागलो, एशियन फाऊंडेशन आणि थर्ड आयशी जोडला गेलो. गुरुदत्त हा माझा पूर्वीपासूनचा आवडता अभिनेता होता, त्याचीच सुहास्य मुद्रा प्रभातच्या ऑफिसात प्रवेश केल्या केल्या दिसली आणि आता आपली पावलं पुन्हा पुन्हा इकडे वळणार याची मी मनात खूणगाठ बांधली. माझ्यासारखे अनेक तरुण पत्रकार, चित्रपटविषयक लेखन करणारे आणि रसिक त्यांनी प्रयोगशील चित्रपटांच्या धारेला लावले. हळूहळू लक्षात येत गेलं की एका सुधीर नांदगावकर या व्यक्तिमत्त्वात एकमेकांना छेद देतील असे अनेक 'नांदगावकर' वस्ती करून होते. अनेकदा ते हट्टी म्हणावे इतपत आग्रही वाटत, तर अनेकदा गरज म्हणून माघार घेण्याचा पवित्राही ते सहजपणे घेत, मात्र त्यातही वेगळ्या वाटेनं, अप्रत्यक्षरीत्या आपलंच म्हणणं ते खरंही करून घेत.

व्यावसायिक चित्रपटांचा दुःस्वास न करता, समांतर चित्रपटांचा प्रेक्षक कसा वाढवता येईल, याचा विचार ते सतत करत. त्यामुळे चित्रपटांबाबतचा एकांगी दृष्टिकोन त्यांच्यात कधीच आला नाही. चित्रपटांवर लिहिणाऱ्या प्रत्येक तरुण, तरुणीला 'प्रभात'च्या सदस्यत्वाची दीक्षा देण्याचं काम ते करत. मग त्या तरुण पत्रकाराची पावलं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इमारतीत असलेल्या प्रभातच्या कार्यालयाकडे वळत. तिथं संध्याकाळी जमणारे गप्पांचे अड्डे हे त्या तरुण पत्रकारांच्या सिनेमा आणि साहित्यातील अनेक बाबींच्या आकलनात भर घालत. दिनकर गांगल, रघुवीर कुल, विनय नेवाळकर, अशोक राणे या मंडळींच्या चर्चेतून अनेक नव्या गोष्टी कळत. नांदगावकर त्यांच्या खास शैलीत सिगारेटचे झुरके घेत आचार्य अत्र्यांपासून राजाभाऊ परांजपेंपर्यंत अनेकांचे किस्से सांगत. एखाद्याच्या चित्रपटविषयक लेखनाचा विषय निघाला की त्यांच्या विशिष्ट पद्धतीनं 'छ्या' म्हणून तोंड वाकडं करत. 'त्याला काही कळंत नाही' असं म्हणताना काही इरसाल शब्दही वापरत. परंतु हा जो कोणी 'काही न कळणारा' असेल, त्याच्यावर ते फुली मात्र कधीच मारत नसत. जी काही शेलकी विशेषणं असत ती केवळ खासगी मैफलीपुरती. ज्याला कुणाला हाताशी घेऊन चित्रपटसंस्कृतीचा प्रसार आणि प्रचार शक्य आहे, तो करायचा अशी त्यांची भूमिका होती.

संग्रहालयाच्या आवारातच एका टोकाला रचना मुद्रणालयाचं छोटं कार्यालय होतं. दिवसभर ते त्या कार्यालयात बसायचे. भारतीय जनता पक्षाच्या पुस्तिका, भित्तिपत्रकं, माहितीपत्रकं छापण्याची कामं त्यांच्याकडे असंत. त्याची प्रूफे तपासण्यापासून तर अनेक गोष्टी तिथं बसल्याबसल्या ते करत. त्यांच्याशी जरा अधिक ओळख झालेल्यांचा राबता 'रचना मुद्रण ते प्रभात' असा असे. मी त्यात सहज सामील झालो. नांदगावकरांचं सर्वात मोठं वैशिष्ट्य हे, की ते सतत नवं काही करण्याच्या कल्पनेनं झपाटलेले असत आणि हे झपाटलेपणही सकारण असे. व्हिडिओ कॅसेटचा काळ, नंतरचा डीव्हीडीचा काळ आणि पुढे टीव्हीवर मनोरंजनवाहिन्यांचा झालेला सुकाळ या साधारण पंधरा वर्षांच्या काळात फिल्म सोसायटी चळवळ मंदावू लागली. त्यातही मुंबई शहरात केवळ एखादा चित्रपट पाहण्यासाठी म्हणून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणं हळूहळू दुरापास्त होऊ लागलं, तेव्हा आता दिशा बदलली पाहिजे हे त्यांच्या लक्षात आलं. त्यासाठी त्यांनी कॅम्पस फिल्म सोसायटीची कल्पना काढली आणि कॉलेजांमध्येच सोसायटी स्थापन करण्याची कल्पना मोठ्या प्रमाणावर राबवली. त्यासाठी ते राज्यात अनेक शहरांत गेले. चित्रपट या माध्यमाची ताकद, व्याप्ती कळायची असेल, आस्वादाला दिशा द्यायची असेल तर ती तरुण प्रेक्षकच देऊ शकतात, हे वय एकदा गेलं की माणसाच्या आवडी-निवडी घट्ट झालेल्या असतात, त्या सहजपणे बदलता येत नाहीत हे लक्षात घेऊन त्यांनी ही कल्पना राबवली आणि ती यशस्वीही ठरली.

बदलत्या वातावरणाचा अंदाज घेऊन त्यांनी याच काळात आणखी एक प्रयोग केला. साहित्यसंघात तेंडुलकरांनी पटकथा लिहिलेल्या चित्रपटांचा महोत्सव प्रभाततर्फे आयोजित केला. एका लेखकाचे सर्व चित्रपट असे एकाच ठिकाणी आणि एका आठवड्याच्या कालावधीत एकत्र पाहायला मिळणं ही समीक्षक, अभ्यासक आणि प्रेक्षक, सगळ्यांच्याच दृष्टीनं मेजवानी होती. मीसुद्धा तेंडुलकरांचे सर्व चित्रपट तोवर पाहिलेले नव्हते. तेंडुलकरमहोत्सवाला मिळालेला प्रतिसाद हाच बहुधा नांदगावकरांच्या मनात मामि महोत्सवाच्या कल्पनेला जन्म देऊन गेला असावा.

'चित्रपट ही विज्ञानावर आधारित कला आहे' हे वाक्य, फ्रेंच न्यू वेव्ह, इटालियन वास्तववाद आणि पुढील काळात साध्यासुध्या इराणी चित्रपटांनी घेतलेली आशयाची झेप हे त्यांच्या कायम आदराचे विषय होते. भारताचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव तेव्हा दिल्ली, मुंबई, हैदराबाद, कोलकाता असा फिरता असे. मी त्यांच्यासोबतच १९९४-९५-९६ असे सलग तीन फेस्टिवल (कोलकाता, मुंबई, दिल्ली) पाहिले. त्या काळात त्यांनी अनेकदा 'आता मुंबईत दरवर्षी महोत्सव व्हायला हवा' असं बोलून दाखवलं होतं. अखेर मुंबई अकादमी ऑफ द मूव्हिंग इमेजेस अर्थात 'मामि'ची स्थापना झाली. श्याम बेनेगल, किरण शांताराम यांच्यासारख्यांकडे त्याची सूत्रं होती. उत्तोमत्तम चित्रपट आणणं, जगातील आघाडीच्या दिग्दर्शकांना निमंत्रित करणं यात नांदगावकरांची 'मास्टरी' होती, परंतु मोठ्या प्रमाणावर महोत्सव करताना अनेक बाबींचा ताळमेळ घालावा लागतो, ते त्यांच्या स्वभावात नव्हतं. त्यांच्याविषयी, त्यांच्या कामाविषयी आदर असणारी मंडळी त्यांना विरोध करत नसत, परंतु 'मामि'चा आवाका, दबदबा वाढल्यावर त्यात 'नांदगावकर कोण आहेत' याची कल्पना नसणारांची संख्या वाढली, वातावरण बदलून हाय-फाय झालं आणि नांदगावकर तिथून बाहेर पडले. पुढे हळूहळू

‘मामि’मध्ये कमर्शियल चित्रपट आणि तारे-तारकांचा प्रभाव वाढून अखेर तो बंदच पडला. ‘फिल्म सोसायटी माइंडेड’ लोकांच्या ताब्यात राहिला असता तर मामि महोत्सव बंद पडला नसता. मात्र आयोजन, व्यवहार आणि दृष्टिकोन या तीन गोष्टी एकत्र आणू शकतील अशी माणसं त्यासाठी हवी असतात.

माजिद माजिदी, अब्बास किरिस्तामी, असगर फराहादी, मोहसिन मखमलबाफ, जाफर पनाही अशा इराणी दिग्दर्शकांनी जगाचं लक्ष वेधलं, युरोपातील चित्रपट बिघडलेल्या नातेसंबंधातच मुख्यतः अडकून पडल्याचं दिसू लागलं आणि भूतानसारख्या देशातही उत्तम चित्रपट बनू लागले तेव्हा आशियाई चित्रपटांचा वेगळा महोत्सव झाला पाहिजे या कल्पनेनं नांदगावकरांना झपाटलं आणि त्यातून ‘थर्ड आय’ महोत्सवाची कल्पना पुढे आली.


जागतिक चित्रपटांमधून अनेकदा मुख्यतः डाव्या विचारांचा पुरस्कार असे, स्त्री-स्वातंत्र्याची कड घेतलेली असे. नांदगावकर ज्या राजकीय विचारधारेशी बांधील होते त्यात याला फार थारा नव्हता, परंतु हे ‘डावे-उजवेपण’ त्यांनी नीट सांभाळलं, त्यातून त्यांच्या मनात कधी द्वंद्व निर्माण झाल्याचं दिसलं नाही. सत्यजित रे यांच्या ‘चारुलता’चा शेवट त्यांना आवडला याचं त्यामुळेच मला आश्चर्य वाटे, परंतु हा लोभस विरोधाभास म्हणजेच नांदगावकर होते. राजाभाऊ परांजपे, दादा कोंडके, राजदत्त, राजकपूर, गुरूदत्त, डिसिका, किस्लोवस्की आणि सत्यजित रे या सगळ्यांबद्दल त्यांना सारखंच प्रेम होतं, परंतु ते पाईक मात्र डिसिका, किस्लोवस्की आणि सत्यजित रे यांचेच होते. मी त्यांचं समीक्षात्मक लिखाण फार वाचलेलं नाही, जे वाचलं तेही मला फार रुचलं नाही, कारण ते समीक्षक नव्हते तर अभिरुचीचे प्रसारक होते. ‘वास्तव रूपवाणी’ हे त्यांच्या याच धडपडीचं एक्स्टेंशन होतं आणि मराठीत आजही त्याच्या तोडीचं चित्रपटविषयक गंभीर नियतकालिक नाही. यापुढे असण्याची तशी शक्यताही नाही. ‘वास्तव रूपवाणी’चा अंक निवडक शंभरेक साहित्यिक-लेखकांना मोफत पाठवण्याचा सिलसिला त्यांनी बरीच वर्षं सुरू ठेवला होता. मात्र आठ-दहा वर्षं अंक हा वाचूनही दोन-तीन वगळता एकाही साहित्यिकानं कधी वर्गणी भरली नाही किंवा साधं पत्र पाठवून आभारही मानले नाहीत, तेव्हा एक दिवस त्यांनी त्यांचा ‘इरसाल’ शब्द वापरून अंक पाठवणं बंद केलं. अंक पाठवणं बंद केल्यावरही एकाही लेखकानं फोन केला नाही हे आणखी विशेष. मराठी लेखकांना नाटक जवळचं वाटतं, परंतु सिनेमा आपलासा वाटत नाही, ही खंत त्यांना अखेरपर्यंत होती.

ओटीटीच्या गर्दीत जागतिक चित्रपट, वेबमालिका यांचा सुकाळ झालेला असताना, अनेक प्रयोग घरबसल्या पाहता येत असताना आणि आशियाई चित्रपटांमध्येही कल्पनांचं दारिद्र्य दिसू लागलं असताना आता चळवळीला कोणती नवी दिशा द्यावी, महोत्सवाला काय स्वरूप द्यावं यावर अखेरच्या काळात त्यांचं मंथन नक्कीच सुरू असणार. नुकत्याच झालेल्या ‘थर्ड आय’ महोत्सवात आम्ही नांदगावकरांना सत्यजित राय स्मृती पुरस्कार (नांदगावकर कधीच रे म्हणत नसत, राय म्हणावं असा त्यांचा आग्रह असे) दिला याचं आता समाधान वाटतं. थर्ड आय महोत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशीसुद्धा संध्याकाळी साडेसहा वाजता त्यांनी संतोष पाठारेंना फोन केला आणि क्षीण आवाजात ‘झालं का उद्घाटन वेळेत?’ असं विचारलं. अखेरच्या अर्ध्या तासात घरातील सदस्यांव्यतिरिक्त ते सध्या प्रभातची जबाबदारी खांद्यावर घेतलेल्या संतोषचं नाव पुटपुटत होते, यावरून त्यांच्या चळवळीबद्दलच्या आत्मीयतेची कल्पना येते. ‘प्रभात’ आणि ‘थर्ड आय’ची ज्योत पेटती ठेवण्याचा प्रयत्न आम्ही सर्व मिळून नक्कीच करणार आहोत, त्यांची तीच इच्छा असेल. रे यांची ‘अपू चित्रत्रयी’ हा त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. ‘पथेर पांचाली’ म्हणजे ‘रस्त्याचे गाणे,’ नांदगावकर कायमच ‘चित्रपटांच्या रस्त्यावर अभिरुची घडवण्याचं गाणं’ गात राहिले...

**– श्रीकांत बोजेवार**

shrikant.bojewar@gmail.com


**ग्रंथाली**




**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## डॉ. दिलीप पांढरपट्टे यांची दोन पुस्तके

■

**सव्वाशे बोधकथा भाग ३**
**आणि**
**सव्वाशे बोधकथा भाग ४**

■





**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# शब्दांच्या भूमीत सकस लेखनाचं पीक काढणारा लेखक



**प्रवीण बर्दापूरकर**



नागनाथ कोत्तापल्ले

**आमच्या** पिढीनं काळ्यावर पांढरं करायला सुरुवात केली तोपर्यंत कवी आणि कथालेखक म्हणून नागनाथ कोत्तापल्ले यांचं नाव मराठी साहित्याच्या प्रांगणात चर्चेत आलेलं होतं. हा लेखक खूप समजूनउमजून लिहितो, अनेकदा तर आपल्याला जे म्हणावसं वाटतं तसंच लिहितो, अशी जवळीक कोत्तापल्ले यांच्या लेखनाविषयी तेव्हाही वाटायची. तेव्हा ते बीडला प्राध्यापक होते आणि शिक्षकांविषयी आदराची स्थिती वाटावी असा तो काळ होता. याचं कारण, एक तर शिक्षक तळमळीनं शिकवत, 'शहाणे करून सोडावे विद्यार्थीजन' ही वृत्ती तेव्हाच्या शिक्षकांत होती आणि दुसरं म्हणजे विद्यार्थ्यांनीही मन लावून वर्गातच शिकण्याचे ते दिवस होते. कुठल्या तरी कामानिमित्त बीडमार्गे जात असता एकदा कोत्तापल्ले यांना भेटलोही. ते वर्गावर होते. बाहेरून बघितलं तर शिकवण्याची त्यांची मस्त तंद्री लागलेली होती आणि विद्यार्थीही मन लावून नोट्स घेत होते; मोठं विलोभनीय असं ते दृश्य होतं. अध्यापनातली तन्मयता नागनाथ कोत्तापल्ले यांच्यात कायमच राहिली असं नव्हे तर पुढे जाऊन त्यांच्यातल्या शिक्षकानं अनेक विद्यार्थ्यांच्या पालकाचीही भूमिका निभावली.

एक आधीच सांगून टाकायला हवं, मी काही नागनाथ कोत्तापल्ले गुरुकुलातला विद्यार्थी नव्हे. लेखक म्हणूनही कोत्तापल्ले यांच्याशी माझी फार काही घसट नव्हती. अधूनमधून भेटी होतं. गप्पा होतं. 'आपण दोघंही मराठवाड्याचे' हा मृद्‌गंध आमच्यातल्या त्या गप्पांना असे. कोत्तापल्ले यांनी एखादी नवीन असाइनमेंट स्वीकारली, की आवर्जून जाऊन त्यांना त्या नव्या पदाच्या खुर्चीत बघण्याचा नाद जणू मला लागला होता. शिक्षण संपलं. मी पत्रकारितेत आलो आणि स्थिरावलोही. हा मधला दहा–बारा वर्षांचा काळ आमच्यात मुळीच संपर्काचा नव्हता. नागपूरला ते कुठल्यातरी कार्यक्रमाला आले तेव्हा भेटायला गेलो तेव्हा गप्पांतून लक्षात आलं, की भेट न होता आम्ही दोघांनीही परस्परांविषयी स्वत:ला अपडेट ठेवलं होतं. एव्हाना नागनाथ कोत्तापल्ले नावाचं झाड कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक,

शिक्षक असं विविधांगी बहरलेलं होतं. या झाडाला लागलेली फुलं आणि फळंही आगळ्याच कर्तृत्वानं बहरून आलेली होती. मराठी भाषा आणि साहित्यविषयक अनेक समित्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचं कुलगुरुपद, चिपळूणला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद हे याच कर्तृत्वाचे बहर होते.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्यातला कथालेखक अगदी सुरुवातीपासूनच मला जास्त भावत गेला. त्यांच्या कथा काळाच्या पुढे जाणाऱ्या असल्याचं जाणवत असे. त्यांची भाषा सामाजिक बांधिलकी आणि मानवी संवेदनेची होती. दृष्टिकोन पुरोगामी, डावीकडे झुकलेला, नव्याचं स्वागत करणारा अगत्यशील होता आणि वर्तन विवेकी होतं. साहित्याच्या विविध प्रांतात मुशाफिरी करण्याच्या कैफात त्यांच्यातला कथालेखक बराचसा मागे पडला असंही माझं मत आहे आणि हे मी त्यांना बोलूनही दाखवत असे. मुक्तिबोधांची 'जन हे वोळतू जेथे' आणि नागनाथ कोत्तापल्ले यांची 'उलट चालीला प्रवाहो' या माझ्या आवडीच्या कादंबऱ्या; या दोन्हीतील शब्दसाधर्म्य लक्षणीय आहे. 'उलटा चालला प्रवाहो' या कथेचा नायक नारायण अनेक वर्षं माझ्या स्वप्नात पिंगा घालायला येत असे, असं जर आज कुणाला सांगितलं तर त्यावर कुणाचा विश्वास बसणार नाही; कारण. पत्रकार केवळ साहित्यातल्या बातम्या देतात असाच बहुसंख्य लोकांचा समज आहे; पत्रकार साहित्याशी असे एकाग्र होतात यावर अनेकांचा विश्वास बसणार नाही पण, ते असो. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'गांधारीचे डोळे', 'सावित्रीचा निर्णय' या कथांचा पोत साहित्याच्या सर्व निकषांवर अस्सल भरजरी आहे, यात शंकाच नाही. कोत्तापल्ले यांचा स्मरणात राहिलेला आणखी एक लेख म्हणजे 'चळवळीचे साहित्यशास्त्र' मुळात चळवळींना काही साहित्यमूल्य किंवा शास्त्र असतं याची जाणीवच (काही मोजके समीक्षक वगळता) तोवर विकसित झालेली नव्हती. कोत्तापल्ले यांच्या या मजकुरानं चळवळींकडे बघण्याचा दृष्टिकोनाच साहित्यिक अंगानं मग उलगडत गेला.

कोत्तापल्ले विद्यार्थीकेंद्र शिक्षक होते. कुलगुरू झाले तेव्हा माझी मुंबई-नागपूर अशी मुशाफिरी सुरू होती. मराठवाड्यात पत्रकारितेच्या निमित्तानं चकरा सुरुच असत. औरंगाबादला आलो की 'स्वामी' श्याम देशपांडेसोबत कोत्तापल्ले यांची ओझरती का असेना भेट झाली नाही, असं कधी घडतचं नसे. अशाच एका औरंगाबादभेटीत सतीश कुलकर्णी या ज्येष्ठ मित्रानं विद्यापीठात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्यावर कसा अन्याय झाला याची कथा सांगितली. त्या विद्यार्थ्याची भेटही घडवून आणली. हे घडलं तेव्हा नेमकं कोत्तापल्ले औरंगाबादला नव्हते. पुढे त्या विषयावर मी एक बातमी लिहिली. 'लोकसत्ता'च्या पहिल्या पानावर माझ्या नावानिशी ती प्रकाशित झाली; स्वाभाविकच त्या बातमीची बरीच चर्चा झाली. कोत्तापल्लेंचा फोन आला आणि 'हा विषय बातमीचा कशाला करायचा? मला फोनवर सांगितलं असतं तरी मार्ग काढला असता', असं ते म्हणाले. 'त्या विद्यार्थ्याला माझ्याकडे पाठवून द्या.' असंही त्यांनी सांगितलं. त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्याची भेट घेऊन, प्रश्न समजावून घेऊन, त्यातून कोत्तापल्ले यांनी मार्गही काढला.

नागनाथ कोत्तापल्ले यांचं आणखी एक योगदान फारच महत्त्वाचं वाटतं. १९६०च्या आसपास मराठी साहित्याला दलित, ग्रामीण, विद्रोही, वास्तववादी असे धुमारे फुटू लागले. दलित साहित्यानं तर मराठी साहित्यातल्या तोवर प्रस्थापित संकेत, शिष्टाचार आणि रुढींना चक्क हादरेच दिले. नागनाथ कोत्तापल्ले लिहू लागले त्याच्या आसपास आनंद यादव, रा.रं. बोराडे, गणेश चंदनशिव, वासुदेव मुलाटे अशा अनेकांनी ग्रामीण साहित्याच्या दालनात उल्लेखनीय योगदान देणं सुरू केलेलं होतं. अस्सल मातीचा गंध असणाऱ्या या साहित्यप्रकाराची चर्चाही सुरू झालेली होती. मात्र, ग्रामीण साहित्याची ठोस अशी समीक्षा होत नव्हती. कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याच्या समीक्षेला एक निश्चित वैचारिक दिशा मिळवून देण्याचा ठोस प्रयत्न केला, यात शंकाच नाही.

प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्यामुळे नागनाथ कोत्तापल्ले यांच्यासोबत सलग दोन आठवडे राहण्याचा योग आला. जागतिक पातळीवर मराठी संमेलन व्हावं असा तेव्हा अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष असलेल्या कौतिकराव पाटील आणि त्यांच्या गटाचा आग्रह होता आणि नेमका मनोहर म्हैसाळकर व त्यांच्या नेतृत्वाखालील विदर्भ साहित्य संघाचा या विश्व मराठी साहित्य संमेलनाला विरोध होता. मी तेव्हा नागपुरात होतो आणि मनोहर म्हैसाळकरांच्या तंबूतला एक म्हणून साहित्य प्रांती बरीच लुडबूड करत होतो, तरी विश्व साहित्य संमेलनाच्या कल्पनेचा मी हिरिरीनं पुरस्कार केला. एवढंच नाही तर अमेरिकेत सॅन होजे (San Jose) इथे झालेल्या संमेलनात कौतिकराव ठाले पाटील यांच्यामुळे एक प्रमुख वक्ता म्हणून सहभागीही झालो. त्या दौऱ्यात अर्थातच नागनाथ कोत्तापल्ले हेही होते. त्यानिमित्तानं मुंबई ते न्यू यॉर्क या सुमारे दोन आठवड्यांच्या प्रवासात कोत्तापल्ले यांच्याशी चांगलीच जवळीक निर्माण झाली. त्यांच्यातल्या कथालेखनावर भरपूर चर्चाही झाली. या काळात कोत्तापल्ले यांच्यासोबत काही मैफिलीही रंगल्या आणि गप्पांतून त्यांच्यातल्या उमदेपणाचाही परिचय झाला. कोत्तापल्ले, कौतिकराव ठाले पाटील, दादा गोरे यांच्यासोबत नायगारा धबधब्याशेजारी असलेल्या एका हॉटेलात रात्री उशिरापर्यंत रंगलेली मैफल अजूनही स्मरणात आहे.

भारतात परतल्यावरही आम्ही बऱ्यापैकी संपर्कात होतो. एक दिवस कोत्तापल्लेंचा फोन आला आणि चिपळूणला होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीचा त्यांच्या नावाचा अर्ज मी नागपूरहून दाखल करावा तसंच त्यांच्या बाजूनं प्रचार करावा असंही त्यांनी सुचवलं. मी फारच अडचणीत सापडलो कारण हा फोन येण्याच्या पाच-सहा दिवसच आधी ह.मो. मराठे यांचा उमेदवारी अर्ज नागपूरहून दाखल करण्याच्या 'ह.मों.'च्या प्रस्तावाला मी अनुकूलता दर्शवली होती. १९७७ पासून ह.मो.


मराठे यांच्याशी माझा स्नेह होता. लेखनाच्या अनेक संधी त्यांनी मला दिलेल्या होत्या. त्यांची ब्राह्मणवादी भूमिका मला साफ अमान्य होती तरी व्यक्तिगत पातळीवर परस्परांत 'सेंटिमेंटल' गुपितंही शेअर करण्याची आमची मैत्री होती. ब्राह्मणवादाच्या 'त्या' वादग्रस्त भूमिकेचा उच्चारही न करता निवडणूक लढवत असाल, तरच पाठिंबा देतो, ही सेवानिवृत्त विंग कमांडर अशोक मोटे आणि माझी अट 'ह.मों.'नी मान्य केली होती आणि आम्ही दोघांनी मिळून ह.मो.साठी मतांची जुळवाजुळवही सुरू केली होती.

थोडंसं बोलणं झाल्यावर पाठिंबा न देता येण्यामागची भूमिका मी नागनाथ कोत्तापल्ले यांना सविस्तरपणे सांगितली. माझ्या नकारामुळे आलेली नाराजी स्पष्ट पण सौम्य शब्दांत कोत्तापल्ले यांनी व्यक्त केली. तेव्हाचं बोलणं माझ्या अजूनही स्मरणात आहे, पण त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आता कोत्तापल्लेंच हयात नाहीत म्हणून ते संभाषण इथे देत नाही. कोत्तापल्ले आणि मराठे दोघंही निवडणुकीच्या रिंगणात उतरले. पुढे त्या निवडणुकीनं नाट्यमय वळण घेतलं. एका प्रकाशवृत्तवाहिनीनं ह.मो. मराठे यांचं ब्राह्मणविषयक जुनं वक्तव्य नवं म्हणून सादर केलं आणि निवडणुकीला एकदम कलाटणीच मिळाली. ह.मों.विरुद्ध गुन्हाही दाखल झाला. परिणामी विजय हाताशी आलेली ती निवडणूक ह.मो. हरले आणि नागनाथ कोत्तापल्ले चिपळूणला झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. नंतर आमची भेट झाली तेव्हा नागनाथ कोत्तापल्लेंच्या वागण्यात आणि बोलण्यात कोणतीही कटुता नव्हती. जे काही घडलं ते त्यांनी उमदेपणानं घेतलं होतं.

शब्दांच्या भूमीत सकस लेखनाचं पीक काढणारा एक लेखक, तळमळीचा शिक्षक आणि उमदा माणूस म्हणूनही कोत्तापल्ले यांचं मराठी साहित्यात महत्त्व अत्यंत ठळकपणे नोंदवलं गेलेलं आहे. म्हणूनच कोत्तापल्ले आज आपल्यात नाहीत ही जाणीव विषण्ण करणारी आहे...

**– प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी : ९१९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com


**ग्रंथाली**





## शब्दांचा झुला

**मोनिका गजेंद्रगडकर**
■
**लेखसंग्रह**
■
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

## फक्त 'ती'च्यासाठी




**डॉ. स्मिता दातार**
■
**गर्भपात संघर्ष लढा**
■
**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




## भगवान गौतम बुद्ध

लेखक
**अविनाश फणसेकर**
**लेखन संकल्पना**
**अरुणोदय भाटकर**
■
**नाटक**
■
**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**

## विचारमंथन




**ॲड. नोएल डाबरे**
■
**विविधांगी लेखन**
■
**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**


# एक सकारात्मक व्यक्तिमत्त्व



**निरुपा केणी**

**मोहनदास** सुखटणकरांचा जन्म, २१.११.१९३० रोजी, म्हापसा- गोवा येथे झाला. खरे तर, त्यांचे वडिलोपार्जित घर माशेल- गोवा इथे असले तरी वडील वैद्य असल्याकारणाने आणि मुलांच्या शिक्षणासाठी सुखटणकर कुटुंब म्हापसा- गोवा येथे स्थायिक झाले होते. प्राथमिक शिक्षण मराठी आणि पोर्तुगीज माध्यमातून पूर्ण केल्यानंतर, ते इंग्रजी माध्यमातून मॅट्रिक आणि एसएससी या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या काळी, विद्यार्थी, गोव्यांत इंग्रजी माध्यमांतून शिक्षण घेऊन बेळगाव किंवा मुंबईस जाऊन परीक्षा देत असत. पुढील शिक्षणासाठी, उदरनिर्वाहासाठी नोकरी शोधण्यासाठी आणि जमल्यास नाटकाचा छंद जोपासायची स्वप्ने घेऊन, १९५० साली गोव्याहून मुंबईंत आलेल्या मोहनदास सुखटणकरांचा, १९५८ साली 'धि गोवा हिंदू असोसिएशन' या सेवाभावी संस्थेत प्रवेश झाला.

सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उद्दिष्टे असलेल्या या संस्थेने १९५६ साली, आपल्या सांस्कृतिक उपक्रमाअंतर्गत कलाविभागाची स्थापना केली होती व नाट्यनिर्मितीस प्रारंभ केला होता. संस्थेच्या कलाविभाग निर्मित ४५ नाटकांपैकी १७ नाटकांत मोहनदास सुखटणकरांनी विविध भूमिका उत्कृष्टरीत्या साकारल्या. संगीत 'मत्स्यगंधा' नाटकांत 'चंडोल', 'लेकुरे उदंड जाली'मधील 'दासोपंत', 'अखेरचा सवाल'मधील 'हरिभाऊ', तसेच 'स्पर्श', 'दुर्गी' अशा अनेक नाटकांतून त्यांनी



मोहनदास सुखटणकर

भूमिका केल्या. स्पर्श नाटकांतल्या भूमिकेसाठी त्यांना पुरस्कारही मिळाले. गुणसंपन्न कलावंत असूनही, व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करून वलयांकित अभिनेता म्हणून मिरवण्याचा मोह टाळून ते संस्थेचे कार्यकर्ते म्हणून वावरले.

संस्थेच्या अनेक नाटकांतून त्यांनी बदली भूमिका करून संकटसमयी संस्थेला आधार दिला. 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाच्या एका प्रयोगाच्या वेळी संभाजीची भूमिका करणारे अभिनेते आपल्या इतर व्यावसायिक कारणामुळे नाट्यप्रयोगास येऊ शकत नव्हते. त्यावेळी, रात्रभर बसून भूमिकेच्या संवादाचे पाठांतर करणारे, भूमिका साकारल्यानंतर नाटकाचा पडदा पडताक्षणीच अतीव मानसिक ताणाने जमिनीवर कोसळणारे मोहनदास आणि दत्तारामबापूंचा हात पाठीवरून फिरताच त्यांच्या खांद्यावर मस्तक ठेवून अश्रू ढाळणारे मोहनदास आज डोळ्यांसमोर येतात. हा किस्सा मोहनदास सुखटणकरांच्या तोंडून ऐकताना अंगावर शहारे आणि डोळ्यांत पाणी आले. नाटकांव्यतिरिक्त आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट आणि कुसुमाग्रजांच्या साहित्यावरच्या अनेक कार्यक्रमांतून ते लोकप्रिय झाले, तरी शेवटपर्यंत संस्थेचे कार्यकर्ता-कलावंतच म्हणून राहणे त्यांनी पसंत केले हा त्यांचा मोठेपणा. मोहनदास सुखटणकर हे खऱ्या अर्थाने रंगदेवतेचे पुजारी होते तसेच सेवाव्रती होते.

मी १९७८ साली धि गोवा हिंदू असोसिएशनची सभासद झाले असले तरी २००३ साली मी संस्थेच्या कार्यकारिणीवर आले. तेव्हापासून हळूहळू संस्थेच्या कार्यकर्त्यांशी माझा परिचय झाला. संस्थेत यायला लागल्यानंतर रामकृष्ण नायक, मोहनदास सुखटणकर आणि इतर कार्यकर्त्यांचे संस्थेविषयी असलेले प्रेम, आस्था आणि आत्यंतिक तळमळ मी अनुभवली. या संस्थेतील सर्व कार्यकर्ते एका पैशाचीही अपेक्षा न ठेवता व प्रसंगी स्वत:चे पैसे खर्च करून संस्थेची सेवा करताना मी पहिले. त्यावेळी जाणवले की ज्या संस्थामध्ये असे सेवाभावी कार्यकर्ते असतात, त्या संस्था कायम टिकतात.

माझा आणि मोहनदास सुखटणकरांचा खरा परिचय झाला तो २६, जुलै २००५ या दिवशी मुंबईत आलेल्या पुरानंतर. मोहनदास सुखटणकरांनी जतन करून ठेवलेला त्यांचा सांस्कृतिक ठेवा पुराच्या पाण्यामुळे भिजला होता. त्यांनी मला फोन केला तेव्हां मी आणि माझी मैत्रीण डॉ. लता शेट्ये दोघंही अंधेरीला त्यांच्या घरी गेलो. सर्व कागदपत्रे, फोटो तपासून व चांगल्या स्थितीत असलेली कागदपत्रे, फोटो निवडून, फोटोंच्या स्लाईड्स करून त्यांना पाठवून दिल्या. त्या नंतर आमची खऱ्या अर्थाने ओळख झाली.

आम्ही त्यांना मोहनदासबाब म्हणत असू. मराठीत आदरणीय व्यक्तींबद्दलचा आदर 'राव' असे संबोधून व्यक्त करतात त्याचप्रमाणे, गोव्यात आदर व्यक्त करण्यासाठी 'बाब' ही उपाधी वापरली जाते. मोहनदास सुखटणकर हे एक शांत, संयमी आणि कमी बोलणारे व्यक्तिमत्त्व होते. आपली नाराजी व्यक्त करतानासुद्धा त्यांनी कधी अपशब्द वापरले नाहीत. त्यांनी माणसं जपली आणि टिकवली. माणूस कितीही मोठा असला, पण संयमी आणि मृदू भाषिक नसला, लोकांच्या भावना जपणारा नसला तर त्याच्या भोवतालीचे लोकप्रियतेचे वलय ओसरते. मोहनदास सुखटणकरांची लोकप्रियता वयाच्या ९३ वर्षीसुद्धा ओसरली नव्हती, ती त्यांच्या सभ्य, सुसंस्कृत, विनयशील स्वभावधर्मामुळे.

व्यक्ती कितीही, बुद्धिमान, हुशार, असली तरी घरच्या पाठिंब्याशिवाय आपल्या कारकिर्दीवर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकत नाही आणि कलावंतांच्या जीवनात तर अशा भक्कम पाठिंब्याची पुष्कळ गरज असते. त्यांच्या पत्नीने, शालिनीताई यांनी संसाराचा डोलारा समर्थपणे सांभाळला अशी कबुली ते प्रांजळपणे देत असत. शालिनीताईंचे निधन झाल्यानंतर त्यांच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली. पत्नीच्या निधनानंतर थोड्याच दिवसांत मोठ्या मुलीचेपण निधन झाले. हे सर्व आघात त्यांनी समर्थपणे झेलले. चुकूनही त्यांच्या चेहऱ्यावर, वागण्यात अथवा बोलण्यात निराशा दिसली नाही. फक्त एकदाच त्यांनी उद्‌गार काढले, की शालिनी गेल्यावर घर सुने वाटते. पण फक्त एकदाच. एरवी त्यांचे व्यक्तिमत्त्व खळखळत्या झऱ्यासारखे उत्साही असे.

धि गोवा हिंदू असोसिएशन स्नेहमंदिर या स्वायत्त संस्थेच्या ४१ व्या वर्धापनदिनाच्या (१९.०६.२०२२) निमित्ताने मोहनदास सुखटणकरांनी गोव्याला जायचे योजले होते. जायच्या अगोदर ते म्हणाले होते की ते म्हापसा-गोवा इथे जाऊन येणार. मी त्यांना म्हटले, जमलं तर माशेललापण जाऊन या. गोव्याहून त्यांनी मला रामाकांत खलप यांनी केलेल्या त्यांच्या सत्काराचे फोटो पाठवले होते. इथे आल्यावर मी त्यांना विचारले की माशेलला जाऊन आलात की नाही? ते हो म्हणाले, असे आठवते. स्नेहमंदिरच्या पायाभरणीच्या समारंभाच्या वेळी कुसुमाग्रजांच्या बरोबरीने ते खाली उतरले आणि समारंभ पूर्ण केल्याची माहितीही त्यांनी मला सांगितली होती. अशी संधी प्राप्त होणे हे त्यांचे भाग्य होते असेही त्या वेळी ते म्हणाले होते.

२५ जुलै २०२२ रोजी मोहनदास सुखटणकरांची मुलाखत घ्यायचा योग्य आला. सुभाष सराफ, भूषण मोये, मी आणि प्रमोद बापट, व्हिडिओ शूटिंगसाठी त्यांच्या घरी जमलो होतो. प्रमोदजींनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी अतिशय समर्पक उत्तरे दिली. 'नटसम्राट'मधील स्वगते, कुसुमाग्रजांच्या आठवणी, त्यांना आलेले अनुभव, त्यांनी कथन केले. 'प्रेमयोग' ही कुसुमाग्रजांची कविता म्हणून दाखवली. कुसुमाग्रजांबद्दल त्यांच्या मनात असलेला आदरभाव, त्यांच्या बोलण्यातून आणि चेहऱ्यावरच्या भावप्रदर्शनातून व्यक्त होत होता. 'नटसम्राट'मधील त्यांची स्वगते ऐकताना आम्ही सगळे अचंबित आणि स्तिमित होऊन गेलो. त्यांची स्मरणशक्ती, जोश, वाक्यांची फेक आणि समरसता खरोखरच अतुलनीय होती. आम्हाला धन्य झाल्यासारखे वाटले.

शेवटी ते म्हणाले, खरे तर त्यांचा पिंड कलावंताचा, पण ते पूर्णवेळ कलावंत म्हणून नाही तर कार्यकर्ता म्हणून वावरले याची त्यांच्या मनात खंत आहे. पुढे ते म्हणाले की, पुनर्जन्मावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच, त्यांना पुनर्जन्म लाभेलच आणि तोसुद्धा कलावंत म्हणून असा विश्वास त्यांनी ठामपणे व्यक्त केला. हे त्यांचे वाक्य मनाला स्पर्शून गेले. प्रमोद बापटांचे मुलाखत घेण्याचे कौशल्यपण वाखाणण्याजोगे होते.

मोहनदास सुखटणकरांचा आणि माझा व्हॉट्सअॅपवरून संपर्क असायचा, अधून बोलणे होत असे. नोव्हेंबर महिन्याच्या पूर्वार्धांत मी पाठवलेल्या मेसेजना उत्तर सोडाच, पण ते वाचलेपण जात नव्हते हे माझ्या लक्षात आले. आठ ते दहा दिवसांनी मला त्यांचा फोन आला. आवाज थकलेला होता. म्हणाले, ‘मी कोकिळाबेन अंबानी रुग्णालयात होतो.’ त्यानंतर २१, नोव्हेंबर रोजी त्यांच्या जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी मी त्यांना फोन केला. फोन उचलला गेला नाही. शुभेच्छा देणारा मेसेज पाठवला, त्यालापण उत्तर आले नाही तेव्हा मनात पाल चुकचुकली. चार-पाच दिवसांनी त्यांच्या मुलाने (संदीप सुखटणकरांनी) कळवले की ते कोकिळाबेन रुग्णालयांत आहेत. ६ डिसेंबरला त्यांचे निधन झाल्याची बातमी आली आणि एक पर्व संपले.

मोहनदास सुखटणकरांना बघितले की वाटायचे, आयुष्य जगावे तर त्यांच्या सारखे, सकारात्मक. प्रत्येकाच्या आयुष्यात चढ-उतार हे असतातच. त्यालाच तर जीवन म्हणतात. परंतु कधीही कसलीच तक्रार न करता, अपुऱ्या राहिलेल्या इच्छांबद्दल झुरत न बसता कसे आनंदात राहावे याचे उदाहरण म्हणजे मोहनदास सुखटणकर. कलावंत म्हणून पुनर्जन्म घ्यायची त्यांची आंतरिक इच्छा पूर्ण होवो ही ईश्वर चरणी प्रार्थना.



**– निरुपा केणी**

भ्रमणध्वनी : ९८३३१५९३३९

naiknirupa@gmail.com



ग्रंथाली




# ढगाखाली

**चांगदेव काळे**

■

**कथासंग्रह**

■

**मूल्य ३५० रु.**

**सवलतीत १५० रु.**

# तिरकस चौकस




**सॅबी परेरा**

■

**विनोदी लेखन**

■

**मूल्य २५० रु.**

**सवलतीत १५० रु.**




# निवांत

**मॅटिल्डा अँथनी डिसिल्वा**

■


**कथासंग्रह**

■

**मूल्य १५० रु.**

**सवलतीत १०० रु.**

# फुले फुलली श्रमाची




**डॉ. प्रदीप आगलावे**

■

**विविधांगी लेखन**

■

**मूल्य २५० रु.**

**सवलतीत १५० रु.**



किरण येले

# मनाचे तरंग लिहिणारा कलाकार महेंद्र गौतम

**महेंद्र** गौतम तिशीचा तरुण आहे. मूळचा पश्चिम महाराष्ट्रातला पण पुण्यात स्थायिक झालेला. कविता आणि कथा लिहिणारा. खूप वेळा असं होतं की कवी कथेकडे अभिव्यक्ती म्हणून वळतो तेव्हा त्याच्या कथांचा नायक हा कुणी बाहेरची व्यक्ती असते, परंतु आतापर्यंत महेंद्रनं लिहिलेल्या कथांचा नायक हा कुणी नामाभिधान नसलेली व्यक्ती आहे. त्याच्या कथेच्या नायकाला जसे नाव नसते तसेच त्याच्या कथांतील इतर पात्रांनाही नावे नसतात. यामुळे त्याची कथा वाचताना अनेकदा वाचकाला कधी आपण स्वतः दिसतो तर कधी त्यात कथालेखक दिसतो. महेंद्र गौतमची ही कथालेखनाची शैली आगळी आहे. ही अशी निनावी पात्रांची कथा लिहिताना लेखकाला ते पात्र वाचकपुढे उभं करणं हे आव्हान असत, पण ते आव्हान महेंद्र गौतम स्वीकारतो आणि पेलतो असं कथा वाचल्यावर निश्चितच म्हणावं लागेल. महेंद्र गौतमच्या कथेत समकालीन समाजव्यवस्थेत एकटं पडलेल्या माणसाची घुसमट दिसते. त्याच्या कथांत संघर्ष आहे, पण तो आंतरिक संघर्ष आहे. हा संघर्ष भौतिक बाब मिळवण्यासाठीचा संघर्ष नाही तर आंतरिक गरजा भागवण्यातून आलेला आहे. महेंद्र गौतमच्या कथेत उपकथानक येतात आणि त्या उपकथनाकांचं सूत्र मुख्य कथनकाचा भाग बनून येते. ही कथा कवितेच्या खूप जवळ जाणारी आहे. यात वेळकाळ अभावानं येतो. कथेचं स्थळ जारी बाह्य असलं तर कथा बहुतांशी वेळा आंतरिक पातळीवर घडते.



महेंद्र गौतम

महेंद्र गौतमची कथा कवितेच्या जवळ जाणारी कथा आहे. वाचताना वाचकाला या कथांत लय जाणवते. महेंद्रच्या कथेची भाषा गद्य असली तरी त्यातील जाणिवा कवितेच्या जवळ जाणाऱ्या आहेत. त्या हळव्या प्रसंगांचं आरेखन करतात. त्यामागील अदृश्य वेदना आणि दुःख प्रतलावर आणून कथाबीजाशी एकरूप करतात आणि कथा पुढे सरकत जाते. वाचक त्यात गुंतू लागतो. कथेत ओढला जातो. त्याच्या कथांची भाषा नागरी असली तरी त्या कथेची पार्श्वभूमी ग्रामीण आहे.

महेंद्र गौतमच्या बहुतांश कथांत एकटेपण, प्रेमाची असोशी, नाकारलेपण, जगण्याविषयीची संदिग्धता, मनस्वीपण, समाजव्यवस्थेविरोधात चीड, मैत्री आणि आईवडील नात्याविषयी हळवेपण हे सगळं जाणवत राहतं. त्याची कथा मराठी साहित्यात नक्कीच स्वतःचा वेगळा ठसा उमटवेल असा अंदाज आहे. काही अवधानं मात्र त्याने पाळायला हवी. महेंद्रच्या बहुतांश कथा या मानसिक पातळीवर स्वतःच्या आतल्या कथा सांगतात. तसं कथाकाराची कथा त्याच्या आतली कथा असते, पण त्या कथा वेगवेगळ्या विषयांचा शोध घेत राहतात. वेगवेगळ्या जाणिवांचा शोध घेत राहतात. महेंद्र गौतमच्या कथांची शैली सध्यातरी एकच

आहे. आणि कथाविषयही एकाच आहे. तो पुढील काळात वेगवेगळ्या विषयांना भिडेल आणि वेगवेगळ्या शैलीमध्ये कथेत प्रयोग करेल अशी आशा करूया.

त्याच्या कथेची ही झलक –

**माझ्या उत्क्रांतीचे आदिम अवशेष**

खरं तर रोजच्या जगण्याचेच मूलभूत प्रश्न सोडवता सोडवता तोंडाला फेस येतो तिथं दुसरं काही करावं असं मनात असून करता येत नाही. तुकडे तुकडे झालंय सालं आयुष्य म्हणजे. पण रोज काहीतरी नजरेस पडतं अन् काम बिघडतं. सगळ्या दिवसांचं मातेरं होऊन जातं.

हा डोळ्यांखाली हिरवट काळपट मोठा ठिपका दिसतोय ना? हा तो अस्वस्थपणा सहन न होऊन तोंड उघडल्याचा परिणाम आहे बघ! बसमध्ये चढलो होतो ऑफिसला जायला, तुफान गर्दी. सगळ्यांनाच जायचं असतं पोट जाळायला. मग गर्दी होणार नाहीतर काय? समोर एक मुलगी होती रे, नाजूकशी. उभी होती कशीबशी आणि तिच्या मागून एक दांडगा रेडा, चेहऱ्यावर माज ओसंडून वाहणारा! गर्दीचा बहाणा करून खेटतोय तिला मागून. चेहरा त्रासिक झाला बिचारीचा. एकदोनदा, भैय्या, जरा सिधा खडा रहो ना असं काकुळतीनं तिनं सांगूनही तो आपला चिटकतोच आहे. पार रडवेली झाली बिचारी. वास्तविक त्याला नीट उभ राहता आलं असतं. पण नराला अशी मादी चेंगरायला भेटल्यावर तो चान्स कशाला सोडतो. मला तिचा तो दीनवाणा चेहरा बघवेना. त्याला बोललो, जरा नीट उभा राहा ना भाऊ. समोर मुलगी उभीय तुझ्या. तुला काय करायचं? तिला काही प्रॉबेल्म नाही? तू भाऊ लागतो की नवरा लागतो तिचा म्हणत तो सरळ अंगावरच आला. मी म्हटलं नीट बोल हरामखोरा अन् त्यानं मजबूत ठोसा दिला ठेवून मला. वर कॉलर पकडून आणखी एक कानफाटात बसली अन् झांज आली मला, भेकांडलोच. मग सोडवासोडवी झाली आणि कंडक्टरनं उतरवलं त्याला पुढच्या स्टॉपला. त्या बिचारीनं पाणी दिलं मला. शर्टच्या गुंड्या तुटल्या. डोळा हिरवाकाळा झाला. बोंबललं त्या दिवशीचं ऑफिस. हे असं आहे. पब्लिक ट्रान्सपोर्टमध्ये वागायची साधी अक्कल नाही आपल्याला. कुणी महिलांसाठी राखीव सीटवर बसतं. एखादी बोलायला गेली की निर्लज्जपणानं म्हणतात, तुम्हाला मीच दिसलो का? आम्ही काय फुकट बसलो का? साले साड्या नेसून बांगड्या भरून का येत नाहीत हे सगळे? म्हाताऱ्या, अपंग लोकांसाठी राखीव जागेत धडधाकट तरणी पोरं बसतात बरं एखादा म्हातारा आलाच तरी त्याच्याशी हुज्जत घालतात, उठायचं नाव नको. कुठून येतो एवढा माजोरडेपणा? की तो असतोच आपल्यात आणि बळी तो कानपिळी या न्यायानं वर येतो आपोआप. बरं हे दुबळ्यावर मिजास दाखवणार. यांच्याहून मुजोर, रगेल कुणी आला की शेपूट घालणार. आणि आपल्या डोळ्यांदेखत अशा गोष्टी घडताना पाहून आपल्याला आपल्या गांडूपणाची चीड येते. मग कुठेतरी ती चिडचिड निघते किंवा मनात मुरत राहते, ठसठसत राहते, अवघड जागेचं गळू ठसठसावं तसं.

२.

ती ऑफिसमधली रुता काय प्रॉम्प्ट पोरगी रे! एक दिवस पार सुजलेल तोंड घेऊन आली. मानेवर ओरखडे मांजरानं बोखरल्यासारखे. विचारलं, बाई गं, काय झालंय? तसं ढसाढसा रडायलाच लागली. तीन महिन्यांअगोदर लग्न झालं तिचं. नवरा सॉफ्टवेअर इंजिनीयर, मजबूत पॅकेज. रात्री तिनं मोठ्यानं ओरडावं चीत्कारावं असं वाटतं त्याला, अर्धा मिनिट टिकत नाही. मग डिप्रेशन काढायला बायको. फटकन कानफाटात ठेवून तिच्याकडं पाठ करून झोपी जायचा. तब्बल तीन महिने हा जाच सोसतेय ती. म्हटलं, हे किती दिवस सहन करशील बाई? तीन दिवसांनंतर आली. म्हणाली, 'चल, तुला पार्टी आज माझ्याकडून. मला बोलायचंय जरा, म्हणाली. रात्री परत त्यानं तोच टुकारपणा केला. मुस्कटात मारून थांबला नाही तर सरळ गॅलरीत जाऊन कपडे काढायचा रूळ घेऊन आला मारायला. अंगावर आला तसा फ्लॉवरपॉट दिला डोक्यात ठेवून. चारपाच सणसणीत किका दिल्या ठेवून. परत अंगावर आला तर जन्मभर पायावर उभं राहायच्या लायकीचा राहणार नाहीस. जा इलाज करून घे एकदा डॉक्टरकडून स्वतःचा.' एवढं बोलून ती बॅग भरून मैत्रिणीकडं निघून गेली. सोसत जाण सालं वाईटच.

३.

घरी आलो तेव्हा मर्लिन अगोदरच आली होती. फ्रेश होऊन सोफ्यावर बसलो तसं चहाचे दोन कप घेऊन आलीच ती. कसा गेला दिवस? हे तिचं नेहमीच वाक्य. खरं तर माझा मूड कसाय याचा अंदाज घेत असते ती मी आल्या आल्या. उत्साहात मस्तबिस्त म्हटलं की ती समजते आज काही घडलं नाही काळजी करण्यासारखं. किती दिवस झाले रे मी बिफ नाही खाल्लं. तुलापण पहिल्यासारखी काळजी नाही राहिली माझी. आता टिपिकल नवरा झालास. एका दमात एवढं सगळं बोलून बाई डोळे रोखून बघत राहिली माझ्याकडे. तिनं असं पाहिलं की फारच गोड दिसते ती. कलीजा खलास एकदम. मी पटकन तिला जवळ ओढलं आणि गालावर जोरात ओठाचा चंबू घासला.

अल नयाबला जाऊयात ना आज? मिठी सोडवत माझे दोन्ही हात हातात घेऊन लाडिक होत ती म्हणाली.

म्हटलं, जा तयार हो. नुसती नाटकं करायला पाहिजेत आपल्याला. गेल्या हप्त्यातच आई–बाबा गावी गेले. तसे ते अधूनमधून येतच असतात, महिना–दोन महिने मुक्काम करतात, मग गावी जातात परत येतात. त्यांची ही सून बिफ खाते हे कळलं तर कहर होईल. इंटरकास्ट आणि इंटर रिलिजन लग्न माझं. मर्लिन माझ्याच वर्गात होती. थर्ड इयरला जवळीक वाढली मैत्रीच्या पुढे गोष्ट जातेय हे लक्षात आल्यावर स्वच्छ सांगितलं की बाई ग मला हे असं असं वाटतंय. चूक की बरोबर माहीत नाही, पण आजन्म सोबत राहायची तयारी असेल तर मग पुढे कंटिन्यू करू

नाहीतर थांबू इथेच. आता हे असं कुणी प्रपोज करत नाही, पण मी आहे हा असाच बावळट आहे आणि भविष्यात आमच्यात काही सुधारणा होण्याची शक्यतासुद्धा नाही. हसायलाच लागली वेड्यासारखी, पण एक मैत्रीण म्हणून किंवा प्रेयसी म्हणून ती जशी छान होती तशी बायको म्हणूनही छानच आहे. शिवाय माझ्यापेक्षा महिन्याला पाच हजार जास्तच कमावते. आई-बाबा आले की त्यांचंही करते. त्यांचा दवाखाना करते, त्यांच्या डायटचं तर अधिक कसोशीनं बघते. कधी खरेदीलाही घेऊन जाते. कॉलेजात तर दोस्त म्हणायचे, की ऋष्या साल्या मर्लिननं काय पाहिलं असेल तुझ्यात! आणि मी साऊथ इंडियन सिनेमातल्या विलनसारखा हा हा हा करत मोठ्यान हसायचो. घरी सांगितलं तेव्हा कुटुंब जरा अस्वस्थ झालं. विशेषतः आई. ते ख्रिश्चन आहेत, कसे लोक असतात काय माहीत. त्यात आपण अशी साधी मध्यमवर्गीय माणसं. तुला वाटत का शेवटाला जाईल? उगीच भावनेच्या भरात निर्णय घ्यायचा आणि मग आयुष्यभर पश्चात्ताप करत बसायचं. शेवटी मी कन्व्हिन्स केलंच त्यांना. बाबा तसेही निर्धास्त होते. तिच्या घरचे मानले नाहीत शेवटपर्यंत. पण ती ठाम होती, रजिस्टर लग्न केलं. साधेपणानं सगळं आटोपलं. आठ-दहा मित्रमैत्रिणी तेवढ्या होत्या. बाकी काही सोहळे नाहीत. ती रविवारी प्रेयरला जाते तेव्हा मीसुद्धा एखादवेळी चर्चला जातो तिला सोबत म्हणून आणि प्रभू येशूला नाहीतर मदर मेरीला दोन्ही हात जोडून साष्टांग नमस्कारपण घालतो. पाद्रीबुवा हसतात, अशावेळी मग मीही हसतो आणि आजूबाजूचेही. ख्रिसमस, न्यू इयर सेलिब्रेशन होतं तेव्हा आईबाबापण हुरूपानं सामील होतात सुनेसोबत. दिवाळी-होळीही घरात दणक्यात साजरी होते. संक्रांतीला मर्लिनपण नव्या साडीत नटून सासू-सासऱ्यांना तिळगूळ देऊन पाया पडते. हलवा करण्यात रात्र रात्र जागते. वेगळा धर्म, वेगळी संस्कृती असली तरी माणसातली आपुलकी महत्त्वाची. ती ओल टिकून राहणं महत्त्वाचं. देवाधर्माचा शोषणासाठी उपयोग सुरू झाला आणि धर्म संपला. त्यात हे दिवसही बेक्कार धार्मिक उन्मादाचे आलेले.

४.

रविवार होता म्हणून सकाळीच मार्केटला जाऊन फिश आणली. साफ करत होतो. बेल वाजली. हिनं दार उघडलं तर दारात अनघा! ही आमची क्लासमेट आणि दोघांचीही कॉमन फ्रेंड. हिची जरा जास्तच जवळची.

'अग्गो बाई, हृषीकेश! चक्क नवरा केला की रे तुझा मर्लिननं.' आल्या आल्या खो खो हसत तिनं हिला टाळी दिली.

'बरं झालं आलीस. फिश फ्राय अन् फिश करीची पार्टी देतो तुला मी आज.'

मी फिशला मॅरीनेशन लावून फ्रीजमध्ये ताट ठेवून हॉलमध्ये गेलो. सोफ्यावर जाऊन अनघाच्या पुढ्यात बसलो आणि टीव्हीवर न्यूज चॅनल लावलं. मर्लिन चहा करायला किचनमध्ये गेली.

'कसं सुरूय रे?'

'बरंय गं. तुझं सांग?'

'चाललंय नीट.'

'मॅडम, चारपाच वर्षं झालीत डिग्री होऊन जॉबपण लगेच मिळाला आपल्याला.'

'मग?'

'लग्नबिग्न कधी करताय?' मी अभावितपणे बोलून गेलो आणि एकाएकी तिच्या चेहऱ्यावरचे रंगच बदलले. तिनं मान खाली घातली. डोळ्यांत दाटलेलं पाणी मला दिसलं.

मी काही बोलणार एवढ्यात मर्लिन चहाचा ट्रे घेऊन आली. तिच्या शेजारी बसली. मोठा सुस्कारा टाकत अनघा बोलली, 'हेम्यानं फसवलं मला. त्याचं लग्न ठरतंय.'

'काय?' मी जवळजवळ ओरडलोच. मर्लिनला या गोष्टीची आधीच कल्पना असावी ती शांतच होती.

'एवढी वर्ष तर नीट होत ना पण सगळं. अचानक काय झालं?'

'काय व्हायचंय? कॉलेज लाइफमध्ये त्याला GF हवी होती आणि इकडे आल्यावर बेडपार्टनर. आता नकोय मी त्याला. लग्न करतोय नात्यातल्या मुलीशी तो. संपला माझा रोल, हृषी.'

'मी बोलू का हेम्याशी?' मला हा धक्का होता.

'सोड रे. आता फार उशीर झालाय आणि तसाही जबरदस्तीचा रामराम मला नकोचंय आता.'

काय बोलावं हे न कळून मी गप्प बसलो. त्या दोघींना वेळ देण्यासाठी उठून गॅलरीत गेलो. तिथून थेट बेडरूममध्ये जाऊन पडलो, तो थेट मर्लिनने जेवायला उठवलं तेव्हाच उठलो. जेवण करून ती निघून गेली.

मला मागाहून हेम्याची हकीकत एकाकडून कळली. त्याची ऑलरेडी आणखी दोन लफडी सुरू होती.

५.

सहा वाजताची अपॉईंटमेंट होती डॉक्टरची. त्या बसमधल्या प्रसंगानंतर मर्लिनला तशीही माझी फार काळजी वाटतं होती. आणि गेला महिनाभर प्रचंड त्रास झालेला. डोळे भयंकर दुखायचे. कुणी सुया टोचाव्यात तसं टोचायचं. त्यासोबत कान ठणकायचा. ऐकू येणं आणि दिसणंही कमी झाल्यासारखं झालेलं. कुठल्या कुठल्या टेस्ट झाल्या. त्यातूनही काही विशेष निष्पन्न झालं नाही. रात्रीबेरात्री पाठ दुखायची आणि पोटातही कळा. महिनाभर हे असे वेगवेगळे त्रास. मर्लिनची गोव्याची मैत्रीण आहे सायकोलोजिस्ट. तिच्याशी बोलून पुण्यातल्या डॉक्टरची अपॉईंटमेंट घेतली मर्लिननं. गेलो तेव्हा डॉक्टरांनी आधी मर्लिनलाच बोलावलं. अर्धा-पाऊणतास मला बाहेर बसवून तिच्याशी चर्चा करत राहिले. नंतर आत गेल्यावर मर्लिनला बाहेर जायला सांगून मला हसत म्हणाले बसा. बोला काय त्रास होतोय?

मी सांगितलं सगळं. काय होतंय, कसं होतंय ते. माझा शब्दन्‌शब्द ते मन लावून ऐकत होते. हातातल्या पॅडवर मधूनमधून खरडत होते. सांगून झाल्यावर मी थांबलो. त्यांनी मान हलवून

मोठा सुस्कारा टाकला.

'व्हॉट्सअॅप फेसबूक वापरता तुम्ही?' त्यांनी विचारलं.

'हो.'

'कसं वाटतं फेसबूकवर किंवा व्हॉट्सअॅपवर?'

'बीभत्सपणा आहे नुसता. कितीतरी हट्टी आणि विकृत लोकांचा भरणा आहे तिकडे.'

'टीव्ही बघता का? काय बघता?'

'न्यूज चॅनेल, मूव्ही चॅनेल, स्पोर्ट्स आणि मालिकेचे चॅनेल.'

'म्हणजे सगळंच.'

'हो. पण, कंटाळा येतो आजकाल त्याचाही. सतत आरडाओरडी असलेल्या चर्चा, पक्षपातीपणा. निरर्थक वागणारे अँकर, रटाळ कथानक असलेल्या वर्षानुवर्ष चाललेल्या कथाहीन उथळ मालिका तेच ते सिनेमे आणि सगळ्यात भयवाह तो डब्ल्यूडब्ल्यूईचा हाणामारीचा कार्यक्रम. हिंसा कशी काय एंजॉय करू शकतो कोणी?'

सगळं ऐकून डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शनचा कागद हातात दिला. ह्या गोळ्या घ्या बाहेरच्या केमिस्टकडून. बरं वाटेल लवकरच. महत्त्वाचं म्हणजे व्हॉट्सअॅप, फेसबूक डीइंस्टॉल करा. टीव्ही बघायला मर्यादा घाला. बघायचाच असेल तर कार्टून्स बघा, डिस्कव्हरी किंवा दुसरं इन्फोटेंमेंटचे चॅनल असतात ते प्रेफर करा. आणि पटकन रियाक्ट करणं टाळा. माणूस म्हणून तुम्हाला काही मर्यादा असतात. कितीही मनात आलं तरी तुम्ही सगळ्यांना मदत नाही करू शकत किंवा सगळ्यांना बदलू नाही शकत.. आणि पुढच्या हप्त्यापासून आपण सायकोथेरपी सुरू करू. काही सेशन घेऊयात. काळजी करावं असं अजिबात काही नाही.' मी निमूट कागद हातात घेतला. जाताना म्हणालो, 'पण डॉक्टर, नेमका कुठला आजारय हा?' डॉक्टर खिन्न हसले. खरं सांगायचं हृषीकेशराव, कुठलाच आजार नाही तुम्हाला.

७.

आताशा मला बर वाटतं. बसमधून जात नाही आजकाल ऑफिसला, टूव्हीलर गिफ्ट केलीय मर्लिननं. शिवाय या महिन्यात गुड न्यूज दिलीय तिनं म्हणून बाप होणरोत आपण या जबाबदारीचं भान सतत असतं. पण पडल्या पडल्या कधीतरी मन उत्खनन करू लागतं. स्वतःच्या आदिम उत्क्रांतीचा धांडोळा घेऊ लागतं. सुरूवातीला पाण्यात कुठेतरी एकपेशीय जीव म्हणून जन्माला आलेलो आपण. पाण्यातून जंगलात, जंगलातून गावात, गावातून सिमेंटच्या जंगलात आलो. उत्क्रांतीच्या किती अवस्था पार केल्या? किती अॅडॉप्टेशन? आणि किती व्यवस्था रुजवल्यात इथे? बहुतेक आता परतीचा प्रवास सुरू झालाय...

अशावेळी झोप येत नाही. मग अस्वस्थ उघड्या डोळ्यांनी मी पहाट होण्याची वाट बघत बसतो.

**– महेंद्र गौतम**

भ्रमणध्वनी : ८८८८८ ६६०४७

**– किरण येले**

kiran.yele@gmail.com

॥ग्रंथाली॥




## जिणं शोषितांचं

**वृषाली मगदूम**

■

**अनुभवकथन**

■

**मूल्य ३०० रु.**

**सवलतीत १८० रु.**

## जागो, मैं खुदा हूँ

**किरण येले**


■


**नाटक**

■

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**




## नोबेलनगरी २०२२

**सुधीर थत्ते–नंदिनी थत्ते**

■

**वैज्ञानिक माहिती कथा**

■

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

## Tales Of Growing Less Ordinary

**Vinod Alkari**


■

**A series of fortunate events**

■

**Price : Rs. 350/-**

**Discount : Rs. 250/-**





**प्रकाश दुधलकर**

# ॲस्पी पटेल



ॲस्पी होमी पटेल

**ॲस्पी** होमी पटेल. एक शांत व स्वतःविषयी काहीही न सांगणारं एक अबोल व्यक्तिमत्त्व. नजर सतत कशाचा तरी शोध घेणारी. व्यवसायाने कस्टमहाऊस एजंट परंतु फोटोग्राफी हा ज्यांचा ध्यास आहे. मनाने पूर्ण निसर्गवादी. ज्यांनी आपलं सर्व आयुष्य निसर्गातील विविध छटा व छाया प्रकाशाचे विभ्रम कॅमेऱ्याने टिपण्यात खर्ची घातले. ज्यांच्या ७०० पेक्षा अधिक फोटोग्राफना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ज्युरींची पसंती मिळालेली आहे. फोटोग्राफीच्या क्षेत्रातील अनेक पुरस्कार ज्यांच्या नावावर आहेत. एशियन कल्चरल सेंटर फॉर युनेस्कोचा १९८९ चा मानाचा पुरस्कार ज्यांच्या नावावर आहे असे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या architecture beyond platitude या फोटोग्राफीवरील पुस्तकाला जगातील विविध ग्रंथालयामध्ये मानाचे स्थान मिळाले आहे, असा हा कलावंत.

ॲस्पी पटेल यांचा जन्म गुजरातमधील बिलमोरा येथे झाला असला तरी त्यांचे बालपण व शिक्षण मुंबईतच झाले. त्यांच्या कुटुंबात कोणत्याही कलेची पार्श्वभूमी अशी नाही. कस्टमहाऊस एजन्सी हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय. शिक्षणानंतर ॲस्पीदेखील त्याच व्यवसायात स्थिरावले. व्यवसाय करीत असतानाच वेळ मिळेल तेव्हा फोटोग्राफीही करत. त्यांना फोटोग्राफीची आवड पूर्वीपासूनच होती असे नाही. तर एक उत्सुकता म्हणून कुठे सहलीला जाताना किंवा घरगुती समारंभात मित्राकडील साध्या कॅमेऱ्याने हौसेखातर ते फोटोग्राफी करत. असेच त्यांच्या लग्नानंतर एकदा मित्राचा कॅमेरा घेऊन बाहेर फिरायला जाऊन आले. तेव्हापासून ते फोटोग्राफीकडे जरा जास्तच आकृष्ट झाले. त्यांची पहिली मुलगी अनहिता हिच्या जन्माच्या वेळी त्या गोंडस बाळाचे फोटो काढण्यासाठी एक सेकंड हॅन्ड कॅमेरा विकत घेण्यासाठी एका फोटो स्टुडिओवजा दुकानात गेले. स्टुडिओ मालकाने दिलेल्या काही जुजबी माहितीच्या आधारे त्यांनी फोटोग्राफी केली. त्याकाळी कॅमेऱ्यांना मीटर वगैरे काही नसायचे. केवळ फोटोफिल्म सोबत मिळणाऱ्या माहितीवजा पेपरवर लिहून असलेल्या सूचनांप्रमाणे फोटो काढणे एवढेच आपल्या हातात होते. त्यांनी काढलेले फोटो प्रोसेसिंगसाठी कोडॅक लॅबमध्ये गेले असता त्यांची भेट सागर भारद्वाज यांच्याशी झाली. ॲस्पी यांच्या फोटोतील कलात्मकता बघून सागर यांनी त्यांना फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेमध्ये घेऊन गेले. सर्व औपचारिकता पूर्ण करून ॲस्पी फोटोग्राफिक सोसायटीचे रीतसर सभासद झाले. त्यावेळी सायरस श्रॉफ सहसचिव म्हणून काम करत होते. त्यांच्याशी चांगलीच मैत्री झाली व त्यांच्या मार्गदर्शनाखालीच ॲस्पीच्या पुढील फोटोग्राफी शिक्षणांचा प्रारंभ झाला. त्यावेळी सर्वश्री जे.टी.मा., के.जी. महेश्वरी, आर.ए. आचार्य ही फोटोग्राफीतील मातब्बर मंडळी फोटोग्राफिक सोसायटीमध्ये कार्यरत होती. ते सर्व त्यांचे छायाचित्रणातील मार्गदर्शक बनले. त्यांच्याकडून अनेक टिप मिळत. त्यांच्याकडूनच व्यावहारिकदृष्ट्या प्रत्येक गोष्ट ते

शिकले. सोसायटीच्या फोटोसहली आणि स्वतःच्या खाजगी साहसामधूनही ते शिकत गेले. फोटोग्राफिक सोसायटीची सुंदर व सुसज्ज लायब्ररी होती, ज्यातून बरेच ज्ञान त्यांना मिळाले. ते फोटोग्राफिक सोसायटीच्या प्रत्येक कार्यक्रमात भाग घेत. वरिष्ठांकडून मिळणारे मार्गदर्शन व काम करताना आलेला अनुभव यातून शिकतच त्यांनी आपले फोटोग्राफीचे ज्ञान वाढवले, व त्यांनी छायाचित्रणतील सौंदर्यात्मक उंची प्राप्त केली. त्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक बक्षिसे मिळविली. फोटोग्राफिक सोसायटीमध्ये चालू असलेल्या उपक्रमामध्ये प्रथम एक स्वयंसेवक म्हणून भाग घेत. पुढे त्यांनी फोटोग्राफिक सोसायटीच्या व्यवस्थापकीय समितीवर खजिनदार, मानद सहसचिव आणि उपाध्यक्ष अशा विविध पदांवर पंधरा वर्षे समर्पितपणे काम केले आहे. समितीवर कार्यरत असताना त्यांनी फोटोग्राफीवरील स्लाईड शो आणि व्याख्यानदेखील दिले आहे. तसेच अनेक उपक्रमांचे उत्तम प्रकारे सुंदर आयोजन केले. काही काळ त्यांनी सोसायटीमध्ये छायाचित्रणातील मूलभूत व्यापक अभ्यासक्रमदेखील आयोजित केला होता. फोटोग्राफी क्लबच्या विविध वृत्तपत्रांमध्येही त्यांचे काही लेख प्रकाशित झाले आहेत. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धांसाठी त्यांनी ज्युरी म्हणूनही काम केले आहे. सध्या ते फ्रीलान्स फाइनआर्ट छायाचित्रकार म्हणून कार्यरत आहेत.



सन १९९० मध्ये प्रिय मित्र सायरस श्रॉफ यांच्यासोबत त्यांचे पहिले प्रदर्शन झाले. जानेवारी २०१२ मध्ये प्रतिष्ठित जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये त्यांनी त्यांचे पहिले एकल प्रदर्शन 'गॉर्जियस ट्रॅपिंग्ज' या नावाने आयोजित केले होते. एकदा ते सहलीसाठी अमेरिकेत गेले असता तेथील विविध कलाकारांची प्रदर्शने पाहिली. इमारतींचे विविध आकार व विशिष्ट आकाराचा समूह किंवा संपूर्ण इमारतीच्या काही मोजक्याच भागातील रचनांनी त्यांना भुरळ घातली व ते आर्किटेक्चरल फोटोग्राफीच्या प्रेमातच पडले. त्यांनी विविध ठिकाणी जाऊन तेथील इमारतींचे बाह्य तसेच अंतर्गत भागातील तसेच काही मोजक्याच आकारांचे छायाचित्रण करून ऑक्टोबर २०१४ मध्ये त्यांनी दुसरे एकल प्रदर्शन 'आर्किटेक्चर बियॉन्ड प्लॅटीट्युड' या नावाने जहांगीर आर्ट गॅलरी येथे आयोजित केले होते. ज्याचे प्रेस आणि जनतेने खूप कौतुक केले. या सर्व प्रदर्शनांना रसिकांची भरभरून दाद मिळाली. त्यानंतर त्यांची इतरही ठिकाणी प्रदर्शने झाली. प्रदर्शनामध्ये चित्रकृतींच्या संख्येला काही मर्यादा येतात. त्यांच्या संग्रहात असलेल्या अनेक कलाकृती लोकांपर्यंत पोहोचवाव्यात या दृष्टीने त्यांनी आर्किटेक्चर बियॉन्ड प्लॅटिट्यूड याच नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. त्या पुस्तकास देखील रसिकांची भरभरून दाद






मिळाली. ते पुस्तक जगातील अनेक ग्रंथालयांनी तसेच आर्किटेक्चर महाविद्यालयांनी आपल्या संग्रही ठेवले आहे. त्यात प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी यूएसए, सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, आय.ई.एस. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझाइन इत्यादीसारख्या विविध ग्रंथालयांमध्ये त्याला प्रतिष्ठित स्थान मिळाले आहे.

ॲस्पी पटेल हे कमी बोलणारे असले तरी त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येकाशी अदबीने बोलून त्यांच्या शंकेचे पूर्णपणे निरसन करतात. त्यांनी फोटोग्राफिक सोसायटीच्या, फोटोग्राफीवर्गांमध्येदेखील काही दिवस मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात मी कधीही कोणती गोष्ट ठरवून करत नाही. अचानक काही गोष्टी भावून जातात व एक सुंदर कलाकृती जन्म घेते. मी एक उत्कट छायाचित्रकार आहे.

त्यांनी फोटोग्राफीच्या विविध स्पर्धांमध्ये ज्युरी पॅनेलवरही काम केले आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सलोन / प्रदर्शने यात त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना १९८५ साली द फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबईची (APSI) 'असोसिएटशिप'. (ii) १९८६ मध्ये ऑल इंडिया इंटरनॅशनल



फोटोग्राफिक कौन्सिल, नवी दिल्लीची 'असोसिएटशिप' (AIIPC). (iii) FIAP' फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल द ला आर्ट ऑफ फोटोग्राफिक, बेल्जियमची 'असोसिएटशिप' (AFIAP) प्राप्त झाली. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कामाची दखल घेऊन, फोटोग्राफिक सोसायटीने २०१२ मध्ये त्यांना ऑनर्स ही उपाधी बहाल केली.

प्रत्येकाच्याच आयुष्यात काही चांगले व वाईट प्रसंग येत असतात. त्यातूनच माणूस शिकत जातो. ॲस्पींच्या बाबतीत असाच एक अनुभव आहे. ते पुष्कर येथील जत्रेची फोटोग्राफी करण्यासाठी गेले असताना काहीतरी चुकीमुळे कॅमेऱ्याची लेन्स कॅमेऱ्यात अडकून बसली. त्यांना लेन्स काढताही येईना किंवा फोटोही घेता येईना. शेवटी हतबल होऊन फक्त बघ्याचीच भूमिका पार पाडावी लागली. तेव्हापासून ते प्रत्येक गोष्ट अगदी काळजीपूर्वक हाताळावयास शिकले. नवीन फोटोग्राफरना त्यांचा हाच सल्ला आहे की तुम्ही वापरात असलेल्या कॅमेऱ्याची आधी नीट माहिती करून घ्यावी व त्यानंतरच फोटोग्राफीस सुरुवात करा. येणारा प्रत्येक अनुभव आपणास पुढील दृष्टी देतो.

ॲस्पी यांच्या मते कला ही माणसात उपजतच असते, तंत्र मात्र अभ्यासाने आत्मसात करावे लागते. प्रत्येक कलेप्रमाणे फोटोग्राफीमध्येदेखील सातत्य व डोळसपणा याची शिकण्यासाठी सवय लावावी लागते.

काळाच्या ओघात छायाचित्रण खूप विकसित झाले आहे आणि ते अधिक तंत्रज्ञानावर आधारित झाले आहे. आधुनिक कॅमेऱ्यांच्या साह्याने चांगली छायाचित्रे काढणे सोपे आहे, परंतु त्यात कलात्मकता येण्यासाठी थोडी चिंतनाचीही गरज आहे. इतर व्यवसायांप्रमाणेच यासाठी अत्यंत संयम व चिकाटी असणेही तितकेच आवश्यक आहे.

**– प्रकाश दुधलकर**

dudhalkar@gmail.com

# अशोक नायगावकर यांचा पंचाहत्तरी सत्कार सोहळा संपन्न

मराठी साहित्यविश्वात आपल्या उपरोधिक व मिस्कील शैलीतील कवितांमुळे, सादर करण्याच्या आगळ्यावेगळ्या शैलीमुळे प्रसिद्ध असलेल्या कवी अशोक नायगावकर यांच्या पंचाहत्तरीनिमित्तचा सत्कारसोहळा ग्रंथालीद्वारा गुरुवार, २९ डिसेंबर २०२२ रोजी दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे आयोजित करण्यात आला. यावेळी आमदार आशिष शेलार, दिनकर गांगल, रामदास फुटाणे, श्रीकांत बोजेवार, महेश केळुसकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, नीरजा हे मान्यवर उपस्थित होते.


आरंभी सुदेश हिंगलासपूरकर यांनी अशोक नायगावकर यांच्या 'वाटेवरच्या कविता' या पहिल्या कवितासंग्रहाच्या प्रकाशनामागची हकीकत सांगितली. त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त सत्कार करण्यामागची भावना विशद केली.

आशिष शेलार यांच्या हस्ते नायगावकर यांना भेटवस्तू, मानपत्र आणि चित्रकार नीलेश जाधव यांनी रेखाटलेले नायगावकर यांचे काढलेले व्यक्तिचित्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रंथालीद्वारा नायगावकर यांच्या 'वाटेवरच्या कविता' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे, 'कवितेच्या वाटेवर' या नव्या काव्यसंग्रहाचे आणि 'नायगावकर वगैरे वगैरे' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी नायगावकर यांनी मराठी साहित्यविषयक कार्य करणाऱ्या दहा संस्थांना कृतज्ञतेपोटी एकूण पंचाहत्तर हजार रुपये देणगी म्हणून दिले.

उपस्थितांना खदखदून हसवणाऱ्या आपल्या मनोगतात अशोक नायगांवकर यांनी नव्या पिढीचे वाचन खूप कमी झाले आहे, वाचनाची आवड निर्माण होऊन समाजाला सृजनशील, नवनिर्मिती करणारे लेखक-कवी मिळावेत अशी आशा व्यक्त केली. आपल्या वाईच्या जन्मभूमीविषयी, आपल्याला घडवणाऱ्या विविध संस्था व व्यक्तींविषयी आणि रसिकांविषयी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि आपल्या हसवता हसवता अंतर्मुख करणाऱ्या कविता सादर केल्या.

मिश्या, हशा, दाही दिशा अशा यमकपूर्ण विनोदी वाक्यामध्ये आशिष शेलारांनी नायगावकर यांचे वर्णन केले. विधानसभेतील अधिवेशनापेक्षा या कार्यक्रमाला येऊन छान मनोगते ऐकणे मला जास्त आवडेल म्हणून मी आवर्जून आलो असे त्यांनी सांगितले. आपल्या अटोपशीर मनोगताच्या शेवटी त्यांनी नायगावकर यांची 'निवांत' ही कविता सादर केली.

नायगावकर यांच्या कविता, प्रतिभेइतकीच किंवा काकणभर श्रेष्ठ अशी त्यांची मराठी साहित्यसंस्थांना मदत करण्याची कृती आहे असे दिनकर गांगल म्हणाले. ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे यांनी अशोक नायगावकर यांच्या कविता वाईच्या कृष्णा नदीपासून मिसिसिपीपर्यंत फिरतात, शहरांप्रमाणेच गावखेड्यांतील रसिकांनाही आणि आतातर परदेशात स्थायिक झालेल्या मराठीजनांनाही त्या आवडतात असे सांगितले. नायगावकर यांनी ३० वर्षांपूर्वी कवितेत मांडलेले प्रश्न आजही सुसंगत आहेत. नायगावकर यांच्याकडे विनोदी कवी म्हणून न बघता त्यांच्या कवितेत गुंफलेल्या उपरोध, उपहास व तीव्र अशा सामाजिक-राजकीय टीकेकडे लक्ष दिले पाहिजे असे कवियत्री नीरजा म्हणाल्या, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, महेश केळुसकर यांनी अशोक नायगावकर या आपल्या कविमित्राच्या वेगवेगळ्या आठवणी सांगितल्या. नायगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून कार्यक्रमाची सांगता झाली. ●



**अशोक नायगावकर यांची पंचाहत्तरी चेंबूर येथे साजरी झाली. त्यावेळी त्यांच्या 'वाटेवरच्या कविता' आणि 'कवितेच्या वाटेवर' या कवितासंग्रहांचे पुन:प्रकाशन राजीव खांडेकर, मोनिका गजेंद्रगडकर, रवींद्र पाथरे, श्रीकांत बोजेवार अशा मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.**

## वाचकदिन मुलाखत




वाचकदिनी उषा मंगेशकर यांच्या हस्ते 'ग्रंथाली Listen'च्या सहाव्या भागाचे प्रकाशन झाले. त्यावेळी सुदेश हिंगलासपूरकर आणि मंगला खाडिलकर



## अशोक नायगावकर सत्कार समारंभ






अशोक नायगावकर यांच्या दोन कवितासंग्रहांचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन



**राजीव खांडेकर**
मुख्य संपादक, एबीपी माझा



**भारती सहस्रबुद्धे**
सहसंपादक, एबीपी माझा

**वाचकदिनी प्रकाशने**




**डॉ. मृण्मयी भजक**















वाचकदिनी प्रकाशित पुस्तके

**‘शब्दांचा झुला’ – मोनिका गजेंद्रगडकर, ‘जिणं शोषिताचं’ – वृषाली मगदूम, ‘ढगाखाली’ – चांगदेव काळे, ‘तिरकस चौकस’ – सॅबी परेरा, ‘जागो, मैं खुदा हूँ’ – किरण येले, ‘नोबेलनगरी २०२२’ – सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते**




'भगवान गौतम बुद्ध' – डॉ. मृण्मयी भजक, योजना शिवानंद, डॉ. प्रज्ञा दया पवार, आनंद खरात आणि सुदेश हिंगलासपूरकर




'सप्तरंगी कोरिया' – सुदेश हिंगलासपूरकर, वासुदेव तुंबे, लेखिका सुधा हुजूरबाजार–तुंबे, मनीषा पाटणकर–म्हैसकर, निळू दामले, मेधा आलकरी




'Tales Of Growing Less Ordinary' – अमेय आलकरी, विजया चौहान, विवेक गोविलकर, विवेक सावंत, लेखक विनोद आलकरी, मेधा आलकरी, सुदेश हिंगलासपूरकर, स्नुषा प्रेक्षा शेठ–आलकरी मुलांसह




'फक्त 'ती'च्यासाठी' – डॉ. मृण्मयी भजक, डॉ. निखिल दातार, लेखिका डॉ. स्मिता दातार, निर्मला सामंत–प्रभावळकर, माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर, एसीपी ज्योत्स्ना रासम आणि सुदेश हिंगलासपूरकर




**‘विज्ञानधारा’ उपक्रमाच्या ठाणे, खारघर आणि दादर येथील कार्यक्रमांची क्षणचित्रे**

ठाणे येथील कार्यक्रमात शरद काळे यांच्या ‘चिंतन भाग ३ आणि श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील विज्ञानमूल्ये’ दोन पुस्तकांचे प्रकाशन करताना पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, सोबत सरस्वती सेकंडरीचे मुख्याध्यापक कैलास रावते, लेखक शरद काळे, संस्थेचे विश्वस्त सुरेंद्र दिघे आणि सुदेश हिंगलासपूरकर

शिशुविहार विद्यालय, दादर





गोखले एज्युकेशन सोसायटीची प्रशाला, खारघर




कॉर्पोरेट गप्पा
दीपक घैसास यांच्याशी संवाद साधताना ‘उद्योगविश्व’चे संस्थापक ज्ञानेश चांदेकर




‘निवांत’ पुस्तकप्रकाशन
अँथनी डिसिल्वा,
लेखिका मॅटिल्डा डिसिल्वा
फादर फ्रान्सिस दिब्रेटो,
मॉन्सिनियर फ्रान्सिस कोरिया
डॉ. सिसिलया कार्व्हालो आणि
सुदेश हिंगलासपूरकर



**शरद काळे**

# एका ठिणगीमुळे वणवा पेटू शकतो

**निसर्गातील** बदल अपेक्षेप्रमाणे होत असले की कॅलेंडरची पाने उलगडत जावी तसा काळ पुढे सरकत राहातो. ऋतू येतात आणि जातात, वर्षामागून वर्षे जात राहातात. जगाचे रहाटगाडगे सुरूच असते. परंतु अनपेक्षितपणे निसर्गाने कधी रुद्रावतार धारण केला तर मात्र या दिनचर्येत मोठाच बदल होतो. कधी भूकंप होतात, कधी चक्रीवादळे येतात, कधी अतिवृष्टी होते, तर कधी दुष्काळ पडतो. सुनामीसारखी संकटे आपण अनुभवली, कोविडच्या जागतिक साथीत आपली भंबेरी उडाली. जागतिक अर्थव्यवस्था कोलमडते का असेही वाटून गेले. अनादि काळापासून पृथ्वीवर हे प्रकार सुरू आहेत. माणसाने त्यातील फक्त एक छोटासा कालखंड अनुभवला आहे, ७०-८० हजार वर्षांचा माणसाचा इतिहास पृथ्वीच्या किंवा विश्वाच्या अब्जावधी वर्षांच्या कालखंडाच्या तुलनेत तसा अजिबातच मोठा नाही! आणखी किती काळ माणसाचे अस्तित्व या पृथ्वीवर असेल, याचे अचूक भाकीत करणे विज्ञानाला अजून तरी शक्य झालेले नाही. कदाचित ते कित्येक सहस्त्रके असू शकते, कदाचित ते काही शतकांमध्येही संपू शकते!

एखादा मुलगा समुद्रकाठी वाळूत किल्ला बांधत असतो. त्या किल्ल्याला घडवण्यात आणि सजवण्यात त्याचा बराचसा वेळ जातो. अगदी मन लावून तो ते काम करत असतो. परंतु एक मोठी लाट येते आणि क्षणार्धात त्याचा तो किल्ला उद्ध्वस्त करून जाते. काही वेळ त्याला त्याचे वाईट वाटते, रागही येतो. मात्र घरी परतल्यावर काही मिनिटांमध्येच तो ते सारे विसरून जातो! निसर्गही सारे असेच विसरून जातो का? आपण इतिहास लिहीत नसतो, तर आपल्या जीवनात आपण काय अनुभवले असते? इतिहास वाचून, त्याचा अभ्यास करून आपण काही शिकतो का? इतिहासामुळे निसर्गाचा भूगोल बदलत नसतो, तो बदलतो त्याच्याच गतीने! किती मनोरंजक प्रश्न आहेत ना हे सारे! परंतु त्यांची उत्तरे आपल्याकडे नाहीत. हे प्रश्न विचारण्याचे प्रयोजन काय? तर या प्रश्नांमधून आपल्याला काही शिकता यावे, दैनंदिन जीवन जगत असताना, विसर पडलेल्या गोष्टींची आठवण करून द्यावी आणि त्यातून जीवन अधिक अर्थपूर्ण आणि सुंदर व्हावे, असेच अभिप्रेत आहे.

कार्बन या मूलद्रव्याभोवती सजीवांचे जीवनचक्र फिरत असते. पदार्थसारणीमध्ये सहाव्या क्रमांकावर असलेले कार्बन हे मूलद्रव्य निसर्गात नसते तर सजीवसृष्टी अस्तित्वात आलीच नसती. सहा इलेक्ट्रॉन, सहा प्रोटॉन आणि सहा न्यूट्रॉन या मूलकणांनी बनलेल्या या कार्बनचा अणुक्रमांक सहा तर अणुभार बारा आहे. रसायनशास्त्राच्या नियमाप्रमाणे ह्याची इतर मूलद्रव्यांबरोबर असलेली जडणघडण ही अगदीच मर्यादित असते. ही जडणघडण मूलद्रव्याच्या क्रियात्मक इलेक्ट्रॉनच्या संख्येवर (व्हॅलन्सी) अवलंबून असते. सोडियम अणूच्या बाह्यकक्षेत एक इलेक्ट्रॉन असतो, तर क्लोरिनच्या बाह्यकक्षेत सात इलेक्ट्रॉन असतात. अणूच्या स्थिरतेसाठी ह्या इलेक्ट्रॉनच्या रचना अस्वस्थ करणाऱ्या असतात. त्यामुळे स्थिरतेसाठी हे दोन अणू परस्परांशी जोडले जातात. सोडियमच्या अणूच्या बाह्यकक्षेत असलेला इलेक्ट्रॉन क्लोरिनच्या अणूला दत्तक दिला जातो! त्यामुळे सोडियम आणि क्लोरिन या दोन्ही अणूंमधील अस्वस्थता दूर होऊन सोडियम क्लोराइड म्हणजे मिठाचा स्थिर असा रेणू तयार होतो. सोडियम आणि क्लोरिन या दोन्ही अणूंची क्रियात्मक इलेक्ट्रॉनसंख्या एकच असते, म्हणजेच दोघांची व्हॅलन्सी एक असते. या नैसर्गिक

अणुरचनेत बदल होत नसतो. पदार्थसारणीमधील बहुतेक सर्व मूलद्रव्यांच्या बाबतीत हा नियम अचूक लागू पडतो. या नियमाला कार्बन हा एक प्रमुख अपवाद आहे! व्हॅलन्सी बाबतीत तो फारसा काटेकोर नसतो, त्यामुळे त्याची व्हॅलन्सी १,२,३ किंवा ४ यापैकी कोणतीही असू शकते! त्याच्या अणूच्या दोन कक्षांमधून जे सहा इलेक्ट्रॉन फिरत असतात, ते अतिशय उत्साही असतात! त्यामुळे त्यांच्या ऊर्जेत सातत्याने फेरबदल होतात व त्यांची क्रियात्मकता बदलत राहते. त्यामुळे व्हॅलन्सी बदलत राहते, आणि नियमातील याच शिथिलतेमुळे त्याची क्रियात्मकता प्रचंड वाढते व त्यापासून बनणाऱ्या संयुगांची संख्या अमर्याद म्हणावी इतकी प्रचंड आहे. सजीवसृष्टीतील वैविध्य कार्बनच्या या बदलत्या क्रियात्मकतेत आहे! या त्याच्या क्रियात्मकतेमुळे कार्बनी किंवा सेंद्रिय रसायनशास्त्रशाखाच उदयास आली. बाकी सर्व मूलद्रव्यांचा अभ्यास असेंद्रिय किंवा इनऑरगॅनिक या शाखेत होत असताना, कार्बनची मात्र कार्बनी किंवा ऑरगॅनिक रसायनशास्त्र ही स्वतंत्र शाखा असणे यातच त्याचे जीवसृष्टीतील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित होते.

जडणघडण करण्याच्या त्याच्या गुणधर्मामुळे सजीवसृष्टीतील वैविध्य निर्माण होऊन जोपासले जाते त्याच त्याच्या क्रियात्मकतेमुळे सजीवसृष्टीला घातक असलेल्या संयुगांचीही निर्मिती होत असते! कार्बन डाय ऑक्साइड हा प्रकाशसंश्लेषणातील प्रमुख घटक आहे. तो नसता तर सजीवसृष्टी अस्तित्वातच आली नसती. मात्र तोच कार्बन डाय ऑक्साइड जागतिक तापमानवृद्धीसाठी जबाबदार असतो, हे आपण पाहिले आहे. कार्बनची प्रदूषणकारी अनेक संयुगे निसर्गात सातत्याने तयार होत असतात, तसेच माणसाने त्याच्या गरजांप्रमाणे निरनिराळ्या कार्बनी संयुगांची कृत्रिम निर्मितीदेखील केली आहे, आणि त्यात सतत भर पडत आहे. युरियाची प्रयोगशाळेत प्रथम निर्मिती झाली होती. सन १८२८मध्ये जर्मन रसायनशास्त्रज्ञ फ्रेडरिक वोहलर यांनी हा शोध लावला होता. त्यामुळे आधुनिक ऑरगॅनिक किंवा सेंद्रिय रसायनशास्त्र या शाखेचे ते जनक मानले जातात. तोपर्यंत सेंद्रिय पदार्थनिर्मिती ही फक्त सजीवसृष्टीतच होऊ शकते असे मानले जात होते.

गेल्या १५० वर्षांमध्ये कार्बन डाय ऑक्साइडची पातळी हळूहळू वाढू लागली, त्याच्या दृश्य परिणामस्वरूप वनस्पतींच्या पानांमध्ये असलेल्या पर्णरंध्रांची संख्या कमी कमी होत चालली आहे. जवळजवळ ३४ टक्क्यांनी ही संख्या कमी झालेली असावी असा एक शास्त्रीय अंदाज आहे. पर्णरंध्रांची संख्या कमी झाल्यामुळे वनस्पतींमधून होणारे पाण्याचे बाष्पीभवन कमी होत चाललेले आहे. अमेरिकेच्या इंडियन राज्यातील ब्लुमिंग्टन आणि हॉलंडमधील उट्रेक या दोन विद्यापीठांमधील शास्त्रज्ञांच्या गटाने हे संशोधन केले आहे. या विषयीचा शोधनिबंध त्यांनी गेल्या महिन्यात (नोव्हेंबर २०२२) प्रोसिडिंग्ज ऑफ नॅशनल ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस या प्रतिष्ठित नियतकालिकात प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या अभ्यासात त्यांनी वापरलेल्या ढाच्यानुसार (मॉडेल) आज हवेत असलेल्या कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण दुप्पट होईल, तेव्हा वनस्पतींच्या द्वारे पर्णरंध्रांवाटे बाहेर पडणाऱ्या पाण्याचे प्रमाण अतिशय कमी झालेले असेल. या गृहितकापर्यंत येण्यासाठी त्यांनी फ्लोरिडा राज्यातील आजच्या वनस्पतींचा आणि सुमारे १०० ते १५० वर्षे जुन्या हर्बेरियम नमुन्यांमधून जपून ठेवलेल्या वनस्पतींचा तौलनिक अभ्यास केला आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण लाखात दहाने वाढते, त्यावेळी पर्णरंध्रांची संख्या कमी होतेच, तसाच त्यांचा आकारदेखील लहान होतो. त्यामुळे वनस्पतींच्या माध्यमातून वातावरणात मुक्त होणाऱ्या बाष्पाचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात घटते.

पानांच्या खालच्या भागावर पर्णरंध्रे असून वनस्पतींच्या प्रकाशसंश्लेषणासाठी लागणारा कार्बन डाय ऑक्साइड हवेतून शोषून घेण्याचे कार्य ती करतात. तसेच, बाष्पोत्सर्जनाचे कामही करतात. या बाष्पोत्सर्जनामुळे वनस्पतीप्रणालीत जी पोकळी (vacuum) निर्माण होते, त्यामुळे वनस्पतींच्या मुळांनी शोषलेले पाणी झाडाच्या उंच शेंड्यापर्यंत सहजतेने पोहोचते. तसेच, बाष्पोत्सर्जनामुळे वनस्पतींच्या तापमानात फारशी वाढ होत नाही. त्यामुळे पर्णरंध्रांची संख्या आणि आकार यावर जे परिणाम होतात, त्यामुळे बाष्पोत्सर्जन आणि प्रकाशसंश्लेषण या दोन्ही क्रियादेखील मंदावतात. बाष्पोत्सर्जन ही क्रिया अव्याहतपणे चालत असलेल्या जलचक्राशी तर प्रकाशसंश्लेषण ही क्रिया कार्बन चक्राशी जोडलेली आहे. ही दोन्ही चक्रे पर्यावरणाच्या संतुलनासाठी आवश्यक असतात. पर्णरंध्रे कमी होऊन बाष्पोत्सर्जनाचे प्रमाण कमी झाले, तर सुरुवातीला भूपृष्ठावर पाण्याचे प्रमाण थोडे अधिक राहील, पण नंतर त्यामुळे जे पावसाचे प्रमाण कमी होईल, त्यामुळे भूपृष्ठावरील पाणीदेखील कालांतराने कमी होत जाईल! बाष्पोत्सर्जनाचे प्रमाण कमी झाले तर झाडाच्या सावलीत जी शीतलता असते, ती कमी होईल! विशेषतः उष्ण प्रदेशात हा बदल अधिक तीव्रपणे जाणवू लागला आहे. त्यामुळे या शास्त्रज्ञांच्या म्हणण्याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या ढाच्यानुसार, आज कार्बन डाय ऑक्साइडचे हवेतील जे प्रमाण एक लाखात ३९ भाग (म्हणजे ०.०३९%) आहे, ते एक लाखात ८० भाग होईल (०.०८%), त्यावेळो बाष्पोत्सर्जनाचे प्रमाण अर्धे होऊन त्याचा अनिष्ट परिणाम जलचक्रावर होईल. म्हणजे या अभ्यासात दिसलेला परिणाम अधिक गतीने येत्या काही दशकांमध्ये होणार आहे. त्याचा परिणाम फ्लोरिडा राज्यात होईल आणि तेथील पावसाचे प्रमाण कमी होत जाणार आहे. थोड्याफार फरकाने हा प्रकार इतरत्र घडतच असणार आहे. ही येणाऱ्या दीर्घकालीन दुष्काळाची चाहूल असू शकते!

आपण काहीही केले किंवा कसेही वागलो, तरी पर्यावरणात सारे काही सुरळीत चालत राहील अशी अपेक्षा करणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. सर आयझॅक न्यूटन यांच्या गतीच्या तिसऱ्या नियमानुसार प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया ही असतेच. एखादा गायक किंवा गायिका आतडी पिळवटून टाकणाऱ्या सुरांनी वातावरण

भारून टाकत असताना, अचानक कुणाचा मोबाइल वाजला तर साऱ्या मैफिलीचा बेरंग होतो! एखादा खेळाडू रंगात येऊन खेळत असतांना शारीरिक दोष निर्माण होऊन त्याची लय बिघडते, तद्वतच आपल्या विविध करणींमुळे किंवा निसर्गातील काही घडामोडींमुळे निसर्गाची लय बिघडून जाते. परिस्थिती पूर्ववत होण्यास मग खूप काळ वाट पाहावी लागते. वाढत्या कार्बन डाय ऑक्साइडमुळे पर्णरंध्रांची संख्या कमी होणे किंवा त्यांचा आकार कमी होणे ही वरवर पाहता नगण्य वाटण्याची शक्यता असते! त्याचे दीर्घकालीन परिणाम पृथ्वीवरील सजीवसृष्टीसाठी विनाशकारी ठरू शकतात ह्याकडे लक्ष वाढण्याची नितांत गरज आहे. इतिहासातून धडे घेतले नाहीत आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष सुरूच ठेवले तर मानववंशाचा विनाश अटळ आहेच, पण त्याच्या ह्या मस्तीत त्याचबरोबर सजीवसृष्टीदेखील नष्ट होऊ शकते. पर्यावरणात कोरोनासारखा एखादा विषाणू डोईजड झाला, तर काय उत्पात होऊ शकतात, आपण कसे हतबल होतो, याचा विदारक अनुभव आपण घेतला आहेच! अशाच एका नैसर्गिक आपत्तीची आणि त्यामुळे झालेल्या भीषण परिणामांची आठवण वाचकांना करून द्यायची आहे.

इंडोनेशिया देशात असलेल्या १२१ ज्वालामुखी पर्वतांपैकी माउंट तंबोरा (तांबोरो, इंडोनेशियन गुनुंग तंबोरा) नावाचा ज्वालामुखी पर्वत आहे. हा ज्वालामुखी पर्वत सुमाबावा या बेटावरील उत्तर किनाऱ्यावर असून त्याची उंची सन १८१५ साली ४३०० मीटर होती. या ज्वालामुखीचा १० एप्रिल १८१५ रोजी उद्रेक झाला होता. या उद्रेकानंतर त्याची उंची घटून २८५१ मीटर झाली होती! हा ज्वालामुखी अजून जागृतावस्थेत असून सन १८१५च्या उद्रेकानंतर सन १८८० आणि सन १९६७मध्ये दोनदा त्याचे उद्रेक झाले होते, त्यांचे प्रमाण सन १८१५च्या उद्रेकाच्या तुलनेने अगदी कमी होते. हा उद्रेक पृथ्वीवर नोंदलेल्या ज्वालाम ुखींच्या उद्रेकात सर्वात शक्तिशाली उद्रेक मानला जातो. ५ एप्रिल १८१५ रोजी हा ज्वालामुखी जागृत होऊ लागल्याची जाणीव बेटांवरील लोकांना झाली होती. भूकंपासारखे धक्के बसू लागले आणि त्या पर्वत शिखरावरून अतिशय तप्त असे माती, दगड आणि राख यांचे एकत्रित मिश्रण वाहू लागले. त्याचा वेग दर तासाला १६० किलोमीटर किंवा अधिकच म्हणजे चांगलाच जाणवणारा होता. त्याचे तापमान ८०० सेल्सिअस एवढे प्रचंड होते. १० एप्रिल १८१५ रोजी एक प्रचंड मोठा स्फोट होऊन पर्वत शिखराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. त्या उद्रेकात जो दगड मातीमिश्रित लाव्हारसाचा तप्त असा लोंढा आणि त्याबरोबरच सागरात उठलेल्या त्सुनामीलाटांनी बेटावर राहणाऱ्या दहा हजार लोकांचा बळी घेतला! ३५००० घरे जमीनदोस्त झाली. जिथे पर्वताचे शिखर होते तिथे जवळजवळ ६ किलोमीटर लांबीचा ओसाड सपाट प्रदेश (caldera) निर्माण झाला. तो अजूनही तसाच आहे!

या स्फोटात म्हणा किंवा उद्रेकात म्हणा, १५० घन किलोमीटर आकारमानाएवढी राख, दगड आणि विविध खनिजांचे मिश्रण बाहेर पडले होते. ६० मेगॅटन ६०,०००,००० टन!) सल्फर द्रवतुषार (aerosol) स्वरूपात आसमंतात उधळले गेले! हे सर्व द्रवतुषार स्वरूपातील मिश्रण वातावरणात पसरू लागले, तेव्हा त्याचे दाट आवरण सर्वदूर पसरू लागले. त्या दाट आवरणामुळे सूर्यप्रकाश पृथ्वीवरील त्या भागात पोहोचण्यास आडकाठी निर्माण झाली! त्यामुळे पृथ्वीवरील सरासरी तापमान तीन सेल्सिअसने घसरले. सुमाबावा बेटावर त्याचे सर्वात अधिक परिणाम जाणवणे साहजिकच होते. त्या उद्रेकाच्या परिणामांची व्याप्ती म्हणजे पुढील काही महिन्यांत जवळजवळ ९०००० ते एक लाख लोक विविध रोगांच्या साथीत आणि अन्नाच्या दुष्काळात मृत्युमुखी पडले. पुढील कित्येक आठवडे त्या भागात आकाशातून राखेचा वर्षाव होत होता. सुमाबावा आणि आजूबाजूच्या कित्येक बेटांवरील पिण्याच्या पाण्याच्या साठ्यांचे प्रदूषण होऊन लोकांना पिण्यासाठी पाणी मिळणे कठीण होऊन बसले. आजूबाजूची सर्व झाडे जळून गेली. जंगले भस्मसात झाली. जुलै १८१५ मध्यावर ज्वालामुखी शांत झाला खरा, पण त्याचे दीर्घकालीन परिणाम नुकतेच सुरू झाले होते! पृथ्वीच्या वातावरणात सर्वदूर सल्फ्युरिक आम्लयुक्त बाष्प पसरले होते. त्या बाष्पात राख आणि धूळ मिसळली होती. पुढील कित्येक महिने चीन आणि तिबेटमध्ये अनैसर्गिक थंडी पडली होती. त्या थंडीत झाडे मरून गेली. भाताचे पीक नष्ट झाले. कित्येक जनावरे मृत्युमुखी पडली.

या घटनेचे पडसाद १८१६ साली जगाच्या इतर भागात म्हणजे युरोप आणि उत्तर अमेरिकेत उमटले. त्या वर्षी उन्हाळा असा या भागांमध्ये आलाच नाही. जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांमध्ये त्या भागात अधूनमधून बर्फ पडत होते. थंड हवेचेच साम्राज्य जाणवत होते. ह्या शीतलहरींमुळे उन्हाळी पिके संपूर्णपणे हातातून गेली. भूकबळी पडू लागले. म्हणजेच सन १८१६ हे वर्ष उन्हाळा विरहित वर्ष ठरले. जगाच्या इतिहासात हे प्रथमच घडत होते. अमेरिकेतील न्यू इंग्लंड या भागात तेथील लोकांच्या म्हणण्यानुसार ऋतुचक्र मागे फिरले! वसंत ऋतूनंतर उन्हाळा येण्याऐवजी हिवाळा आला! ४ जुलैला बर्फवृष्टी झाली होती आणि पाणी गोठले होते. अमेरिकेचे राष्ट्रपती थॉमस जेफरसन आपला आठ वर्षांचा कार्यकाळ पुरा करून निवृत्त झाले होते आणि मॉन्टिसेलो येथे शेती करत होते. त्यांचे मक्याचे पीक या अमोसमी थंडीने हातचे गेले, आणि त्यांना त्या अवघड प्रसंगावर मात करण्यासाठी चक्क १००० डॉलरचे कर्ज घ्यावे लागले होते! कित्येक हजार लोक न्यू इंग्लंड सोडून चांगल्या हवामानाच्या शोधात अमेरिकेच्या मध्यपूर्व भागाकडे म्हणजे इंडियाना आणि इलिनॉईस या ठिकाणी जाऊन पोहोचले! त्यांच्या या जाण्यामुळेच सन १८१६ मध्ये इंडियानाला तर सन १८१८ मध्ये इलिनॉईसला राज्यांचा दर्जा मिळाला.

युरोप आणि विशेषतः इंग्लंडमध्ये १८१६च्या उन्हाळ्यात अतिवृष्टी झाली, ती या ज्वालामुखीच्या उद्रेकामुळेच होती. युरोपमधील बऱ्याच देशांमध्ये पावाचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता. कित्येक ठिकाणी लोकांनी बेकऱ्या जाळून टाकल्या होत्या!

तक्ता १ – सन २०२०मध्ये आलेल्या सर्वात गंभीर दहा नैसर्गिक आपत्ती

| क्र. | देश | नैसर्गिक आपत्ती |
|---|---|---|
| १ | ऑस्ट्रेलियन वणवे (जानेवारी ते मार्च) | ४७८ बळी व जंगलसंपत्तीची हानी |
| २ | मध्य अमेरिकेत हरिकेन इटा (नोव्हेंबर) | १५० बळी, वित्तहानी |
| ३ | अफगाणिस्तान पूर (ऑगस्ट) | १५०हून अधिक बळी, वित्तहानी |
| ४ | ग्रीस, टर्की – भूकंप, त्सुनामी (ऑक्टोबर) | ११७ बळी, वित्तहानी |
| ५ | बांगला देश, भारत (मे) अँफॅन चक्रीवादळ | ८५ बळी, वित्तहानी |
| ६ | अमेरिका, हैती हरिकेन लॉरा (ऑगस्ट) | ७७ बळी, वित्तहानी |
| ७ | इंडोनेशिया पूर (जानेवारी) | ६६ बळी, वित्तहानी |
| ८ | टर्की (जानेवारी) | ४१ बळी, वित्तहानी |
| ९ | फिलिपिन्स ज्वालामुखी उद्रेक (जानेवारी) | ३९ बळी, वित्तहानी |
| १० | फिलिपिन्स टायफून (नोव्हेंबर) | ४२ बळी |

तक्ता २ – सन २०२१मध्ये आलेल्या सर्वात गंभीर दहा नैसर्गिक आपत्ती

| क्र. | देश | नैसर्गिक आपत्ती |
|---|---|---|
| १ | हैती – भूकंप (ऑगस्ट) | २२४८ बळी व वित्तहानी |
| २ | फिलिपीन्स – सुपर टायफून रे | ३७५ बळी, वित्तहानी |
| ३ | चीन – भूस्खलन पूर (ऑगस्ट) | ३९२ अधिक बळी, वित्तहानी |
| ४ | जर्मनी – पूर (जुलै) | २०० बळी, वित्तहानी |
| ५ | फिलिपिन्स – सेरोजा चक्रीवादळ (एप्रिल) | २२२ बळी, वित्तहानी |
| ६ | भारत – नेपाळ पूर (ऑक्टोबर) | २०१ बळी, वित्तहानी |
| ७ | भारत – चक्रीवादळ टौटे (मे) | २०० बळी, वित्तहानी |
| ८ | अमेरिका – हरिकेन ईडा (ऑगस्ट) | ९१ बळी, वित्तहानी |
| ९ | अमेरिका – टोर्नेडो (जानेवारी) | ९० बळी, वित्तहानी |
| १० | इंडोनेशिया – ज्वालामुखी (नोव्हेंबर) | ४५ बळी |


तक्ता ३ – सन २०२२मध्ये आलेल्या सर्वात गंभीर दहा नैसर्गिक आपत्ती

| क्र. | देश | नैसर्गिक आपत्ती |
|---|---|---|
| १ | पाकिस्तान – पूर (ऑक्टोबर) | १७३९ बळी व वित्तहानी |
| २ | अफगाणिस्तान – भूकंप (जून) | १०३६ बळी, वित्तहानी |
| ३ | नायजेरिया – पूर (नोव्हेम्बर) | ६१२ अधिक बळी, वित्तहानी |
| ४ | दक्षिण आफ्रिका – पूर (एप्रिल) | ४६१ बळी, वित्तहानी |
| ५ | इंडोनेशिया – भूकंप (नोव्हेंबर) | ३३४ बळी, वित्तहानी |
| ६ | फिलिपिन्स – मेगी वादळ (एप्रिल) | २१४ बळी, वित्तहानी |
| ७ | ब्राझील – पूर (फेब्रुवारी) | २३३ बळी, वित्तहानी |
| ८ | पूर्व आफ्रिका – दुष्काळ (जुलै) | २०० बळी, वित्तहानी |
| ९ | भारत – पूर (जानेवारी) | १९२ बळी, वित्तहानी |
| १० | अफगाणिस्तान – पूर (ऑगस्ट) | १८२ बळी, वित्तहानी |


॥ग्रंथाली॥

## शरद काळे यांची विचार व जीवन यावर सांगड घालणारी सहा पुस्तके


### चिंतन भाग १, भाग २ आणि भाग ३




मूल्य ६०० रु.
सवलतीत ३५० रु.




मूल्य ७५० रु.
सवलतीत ४५० रु.





मूल्य ७५० रु.
सवलतीत ४५० रु.





श्रीमद्भगवद्गीतेतील विज्ञानमूल्ये
मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.

### विज्ञानांजली




मूल्य ३५० रु.
सवलतीत २१० रु.

### प्रेरणा




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.


अन्नासाठी सर्वत्र दंगली होत होत्या. आयर्लंडमध्ये तर सतत आठ आठवडे पाऊस पडत होता. त्या काळात आयर्लंड बटाट्याचे आगार होते. तेथील जवळजवळ सर्व बटाट्याचे पीक नष्ट झाले आणि प्रचंड मोठा दुष्काळ पडला. इतर युरोपीय देशांमध्ये मका आणि गहू या दोन पिकांचे अतोनात नुकसान झाले. भुकेच्या कहरानंतर आयर्लंडमध्ये १८१६ सालच्या शेवटी टायफस या रोगाचा प्रादुर्भाव होऊन मोठी साथ पसरली. त्यात हजारो लोकांचा बळी गेला. इतर इंग्लिश बेटांवर ही साथ पसरून त्यांच्याकडेही बरीच जीवितहानी झाली होती. ह्या घटनेतून शिकण्यासारखे बरेच काही आहे. स्पॅनिश फ्लू, कोरोना, त्सुनामी, चक्रीवादळे, भूकंप या नैसर्गिक आपत्ती किती विनाशकारी असू शकतात याचा अनुभव वेळोवेळी येत असतो. सन २००० नंतर अशा आपत्तींची संख्या प्रचंड वाढली आहे.

युनायटेड नेशन्सच्या आपत्तीनियंत्रण कार्यालयाच्या माहितीनुसार हवामानबदलाशी संबंधित संकटांमध्ये गेल्या वीस वर्षांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे (तक्ता १, २ आणि ३). सन १९८० ते १९९९ या दरम्यान ३६५६ अशा आपत्तींची नोंद झाली होती, तर सन २००० ते २०१९ पर्यंत ती संख्या ६६८१ झाली होती. जागतिक स्तरावर ठिकठिकाणी आलेल्या पुरांची संख्या या कालखंडात दुप्पट झाली होती तर वादळांची संख्या दीडपट झाली होती. एरवी शांत असलेल्या अरबी समुद्रात गेल्या काही वर्षांमध्ये चक्रीवादळे निर्माण होऊन त्याचा फटका कोकण किनारपट्टीला बसू लागल्याचा अनुभव आपण घेत आहोत. सुदैवाने मुंबई आतापर्यंत तरी या तडाख्यातून सहीसलामत वाचली आहे, पण आणखी किती दिवस ती वाचेल, हे आपण सांगू शकत नाही. ह्या सर्व आपत्ती, कुठे ना कुठे आपल्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाशी जोडलेल्या आहेत. एका ठिणगीमुळे वणवा पेटून सारा परिसर बेचिराख होण्यास वेळ लागत नाही. जगात सर्वत्र उडणाऱ्या प्रदूषणाच्या ठिणग्यांच्या एकत्रित परिणामांमुळे नेमका काय परिणाम होऊ शकतो, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही!

प्रदूषण कमी करणे ही केवळ सरकारची जबाबदारी आहे असे नसून, ती प्रत्येकाचीच जबाबदारी आहे, आणि त्यातूनच त्या समस्येची उकल होण्याची शक्यता आहे, ही जाणीव समाजाच्या प्रत्येक माणसाला झाली पाहिजे. गणितामध्ये इंटिग्रेशन किंवा एकात्मिक समीकरण अतिशय महत्त्वाचे असते. प्रत्येक माणसामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा एकात्मिक परिणाम हा प्रलयंकारी असतो. घरातील कचरा अर्धा किलो किंवा एक किलो असतो, पण त्याकडे लक्ष दिले नाही तर त्यामुळे देशाचा उकिरडा होण्यास फारसा वेळ लागत नाही. पृथ्वीवर पाणी भरपूर आहे, पण रोज आपण वैयक्तिक पातळीवर निर्माण करत असलेल्या शंभर-दीडशे लिटर प्रदूषित सांडपाण्याच्या एकात्मिक परिणामांमुळे आपण शुद्ध पाणीच गमावून बसण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, म्हणून सजगपणे आपण वैयक्तिक पातळीवरच प्रयत्न करून त्यातून सजीवसृष्टीसाठी एकात्मिक स्वरूपात काहीतरी भरीव करण्याची आवश्यकता आहे. निसर्गऋणाची ही भरपाई आहे.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com

ग्रंथाली




**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

**अशोक नायगावकर यांचे दोन कवितासंग्रह**




**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



विजयराज बोधनकर

# चौदाव्या शतकातील कलावंत

**जिओवानी बेलिनी (१४३०)**



**बराच** काळ जीव ओतून काढलेली भव्य चित्रं आगीच्या भक्ष्यस्थानी पडतात तेव्हा समाज हळहळतो. कारण तो चित्रकार या जगातून निघून गेलेला असतो. हे दु:ख आहे जिओवानी बेलिनीचं आणि चित्ररसिकांचं. जिओवानीचा जन्म १४३० मध्ये वॅनीसमध्ये झाला. वडील आणि जिओवानीचा मेव्हणाही चित्रकार. तेव्हा कुठलाही व्यवसाय किंवा कलाही परंपरागत अनेक वेळा बहुधा चालत राहायची. त्याचे दोघे भाऊसुद्धा वडिलांसोबत काम करता करता चित्रकार बनले. संपूर्ण कुटुंबच कलेच्या क्षेत्राला विस्तारीत होते. चौदावं शतक धार्मिकेतचा बोलबाला असलेला काळ. जुन्या गॉथिक पद्धतीनं त्याचे वडील काम करायचे.

जिओवानी मात्र वेगळ्याच पिंडाचा होता. सतत नव्या शैलीचा, रंगांचा, मांडणीचा विचार करायचा, शोध घ्यायचा. तरुण चित्रकार किंवा त्याच्या शिष्यांसोबत विचारविनिमय करून सतत नव्याचा आग्रह धरायचा. आहे तसे, दिसते तसे न चितारता कल्पनाशक्तीच्या शक्यता उंचावून त्याच्या चित्रांची तो नव्यानं रचना करायचा. अनेक गोष्टींची रचना करून एक चित्र तयार करायचा. हे त्या चौदाव्या शतकातलं नावीन्याचं वैभव होतं. 'अ डेड क्राइस्ट सर्पोटेड बाय एंजल्स', 'ट्रान्सफिग्युरेशन', 'क्रूसीफिक्शन' यांसारखी चित्रं रचनात्मक कामाचे उत्तमोत्तम नमुने होते.

प्रारंभी जिओवानी टेम्परा माध्यमातून चित्रं रंगवायचा.



कालांतराने तो तैलरंगाकडे वळला. म्हटलं जातं की जिओवानी तैलरंगासाठीच जन्माला आला. इतक्या विविध पद्धतीनं त्यानं चौदाव्या शतकात तैलरंग खुबीनं वापरलेत. तो निसर्गाचा चाहता होता. निसर्ग एक श्रृंगारी आणि मनोहारी आहे असं त्याला वाटायचं. त्यानं त्याचमुळे धर्मनिरपेक्ष प्रतिमांवर अधिक जोर देऊन निर्मितीचा वेग वाढवला. त्याच्या शैलीची बाजू नेहमीच पुढारलेली होती. त्याच्या चित्रांत अभिव्यक्तीची छटा होती.

दया, करुणा, मानवता, संवेदनशीलता या अमूर्त भावनांची आणि निसर्गघटकांची छटा चित्रातून कायम प्रकट होत राहिल्यामुळे त्याच्या चित्रकारितेचा अर्थ लावणं ही आव्हानात्मक बाजू आकर्षण ठरायची.

स्कुओला द सॅन मास्को या प्रचंड इमारतीसाठी त्यानं इतरांसोबत चित्रं रेखाटली. १४७९ या वर्षभरात त्यानं डोगेज पॅलेससाठी अनेक व्यक्तिचित्रं, अनेक पॅनेल आणि कलात्मक चित्रं भरपूर प्रमाणात चितारली. या कामाचं त्याला फार मोठं मानधन मिळालं. पण हेच १५७७ मध्ये आगीच्या भक्षस्थानी पडलं तेव्हा जिओवानी या जगातून निघून गेला होता. समाज मात्र हळहळला. जिओवानीचा हा कलाप्रवास वैयक्तिकरीत्या शांत आणि सृमद्धीचा ठरला. त्याच्या कामाची प्रशंसा त्याच्या शिष्यांनी जगभर केल्यामुळे जिओवानी नावीन्यपूर्ण कामासाठी चिरंजीवच राहिला. अशा या नावीन्यपूर्ण कलात्मक महामानवानं १५१६च्या काळात या जगाचा निरोप घेतला, पण कलारसिकांसाठी वैभवाचं दान देऊन गेला.

**अलब्रे ड्युशर (१४७१)**



ज्या वातावरणात मूल वाढतं त्या वातावरणाचा खोलवर मनावर परिणाम होत जातो. त्या परिणामाचा दरवळ आयुष्यभर सोबत राहतो. वडील सुवर्णकार असतील तर मुलावरही त्याच प्रक्रियेचे संस्कार होत जातात. तोच मुलगा पुढे चित्रकार झाला तरी ती प्रक्रिया त्याच्या कामातून बऱ्याचदा फुलून येत राहते. अलब्रे ड्युशर हा चित्रकार असाच एका सुवर्णकाराचा मुलगा. वडिलांसोबत सुवर्णकारीतेचं कामही केलं, पण त्यात मन रमलं नाही. आवड चित्राचीच आणि तो भविष्यात मोठा चित्रकारच झाला. अलब्रेचा जन्म न्युरेमबर्गमध्ये २१ मे १४७१ रोजी झाला. त्याला एकूण चौदा भावंडं होती. अलब्रेनं चित्रकला आणि सुवर्णकाम आपल्या वडिलांकडून शिकला. वडिलांना अलब्रेनं सुवर्णकामच करावं वाटत असलं तरी त्याचा कल पाहून त्याच्या वडिलांनी त्याला मायकल वॉगलमटकडे चित्रकलेचे धडे शिकवायला पाठवले. तेव्हा तो फक्त पंधरा वर्षांचा होता. त्याचं वॉगलमटकडचं शिक्षण संपल्यानंतर तो युरोपातल्या मार्टिन शोनगावरकडे कोरीव काम शिकायला आकर्षित झाला. चांदी-सोन्यावर वडिलांसोबत त्याने बालपणी कोरीवकाम केलं होतं. ते त्याच्या अंतरात मुरलं. त्याला नवनवीन तंत्रं शिकण्याची हौस होती. तो भरमसाट चित्रं रेखाटायचा, रंगवायचासुद्धा. त्याला वुडकट प्रिंटिंगचं तंत्र अवगत करायचं होतं. आणि भ्रमंती करून त्यानं ते तंत्र अनेकांकडून अवगत केलं.




१४९५ मध्ये भ्रमंती करून न्युरेमबर्गला परतला तेव्हा तेथे त्यानं स्वत:चा कारखाना सुरू केला. पाच वर्षांत त्याच्या कामावर इटालियन स्टाईलचा प्रभाव पडलेला होता. वूडकट हे त्याचं क्षेत्र बनवलं जे तो मार्टिन शेनगावरच्या स्टुडिओत शिकला होता. तरीही वूडकट प्रिंट तयार केल्यामुळे सहजपणे मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होऊ शकल्या. त्यामुळे विषयाचा आणि चित्रांचा प्रस्तर झपाट्यानं होत गेला. एक गोष्ट त्यातून सहजपणे जाणवते की लहानपणचे त्याच्यावर झालेल्या सोनेचांदीच्या पत्र्यावरच्या खोदकामाचे संस्कारच वूडकटच्या आणि एनग्रेव्हिंगच्या तंत्रापर्यंत घेऊन गेले. याचबरोबर त्यानं निसर्गचित्रं आणि पोर्ट्रेटसुद्धा तैलरंगातून रंगवली. विविध शाखांमधून त्यानं काम केल्यामुळे प्रयोगशील कलावंत म्हणून त्याची ख्याती सर्वत्र पसरत गेली. तो बऱ्यापैकी इतर देशांत राहिल्यामुळे अनेक प्रकारचं तंत्रं त्यानं अवगत केली होती. त्यामुळे त्याने अमाप धन कमावलं.

१५०९ मध्ये एका खगोलशास्त्रज्ञाच्या वारसदाराकडून त्याचं मोठं घर खरेदी केलं. तिथं बरंच काम त्यानं केलं. त्याचं घर हे एक आकर्षण बनलं होतं. त्याची बायकोसुद्धा पितळीवर काम करणाऱ्या कलावंताची मुलगी होती. तिच्यावरही त्या कलेचे संस्कार झाले होते. ड्युररनं सेल्फ पोर्ट्रेट खूप केली. वॉटर, ऑईल, ब्राँझ, वूडकट अशा विविध माध्यमांनी त्याला झपाटलं होतं. त्यातून केलेली शेकडो वूडकट एन्ग्रेव्हिंग चित्रं त्यानं त्याच्या

आयुष्यात निर्माण केली. असा हा प्रयोगशील चित्रकार कलावंत ६ एप्रिल १५२८ रोजी वयाच्या फक्त ५६ वर्षी या जगातून मोठं तंत्र विकसित करून देवाघरी निघून गेला.

**रोजियर व्हॅन उर ओयडेन (१४००)**



ज्या काळात ज्या विचारांचा प्रभाव असतो तो प्रभाव प्रत्येक कृतीतून, वृत्तीतून आणि कलावंताच्या कलाकृतीतून उमटत राहतो. तो एक प्रवास असतो. त्या गोष्टीचा प्रभाव ओसरला की नव्या गोष्टींचा प्रभाव पुन्हा पसरायला प्रारंभ होतो. हे नियतीचं चक्र आहे. जुन्या काळात धार्मिकतेचा प्रभाव होता. येशू ख्रिस्ताचा प्रभाव, लेखक, कवी, संगीतकार, चित्रकार यांच्या कलांवर होणं स्वाभाविकच होता. त्या काळच्या चित्रप्रतिमेमध्ये बहुतांश येशू ख्रिस्ताचा प्रभाव जाणवतोच जाणवतो. अशाच काळात रोजियरचा जन्म झाला. इसवी सन १४०० सालात जन्म झाला तरी जन्मतारखेबद्दल जरा संभ्रमच आहे. रोजियार हा साउथ नेदरलँडमधला चित्रकार होता. त्याचा जन्म बेल्जियम देशातल्या डॉरनक ह्या ठिकाणी झाला.




रोजियर चित्रकलाक्षेत्रात तसा फार उशिरा आला. चित्रकार रॉबर्ट कॉम्पिनच्या हाताखाली काही काळ शिकला. त्यानंतर तो कलाक्षेत्रात रुळत गेला. १४२७ मध्ये एलिझाबेथ गॉफर्थ हिच्याशी तो विवाहबद्ध झाला. मुळातच कलाक्षेत्रात उशिरा येण्यामुळे त्यानं आपली चित्रप्रगती झपाट्यानं करून तो काळ भरून काढला असावा. (त्याच्या पूर्वायुष्याविषयी मोठीच गोपनीयता आहे.) केवळ नऊ वर्षांत तो ब्रसेल्समध्ये सिटी पेंटरच्या पोझिशनला नावारूपाला आला. १४३२ ते ३५ तो चांगलाच स्थिरावला. या काळात तो ब्रज या शहरात वास्तव्याला होता. या शहरात मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे. त्यामुळे त्यानं हे शहर निवडलं असावं.

रोजियरच्या कामावर तेव्हाचा उत्तम चित्रकार जॅन वॅन आईकच्या चित्राकृतीचा प्रभाव पडला होता. त्यानं बराच प्रवास केला. ब्रसेल्स, त्यानंतर तो रोमला पोहचला. येथे मात्र त्यानं मेडीची परिवारासाठी बऱ्याच चित्राकृती करून दिल्यात. रोजियरनं जितकी धार्मिक चित्रं काढली तितक्याच खुबीनं पोर्ट्रेटसुद्धा चितारली. चौदाव्या शतकात कलेचा वारसा झपाट्यानं प्रगत होत होता. त्या प्रारंभीच्या काळात या चित्रकारांचं महत्त्व काही वेगळेच होते. रोजियरच्या चित्राचा प्रभाव बराच काळ पुढच्या चित्रकारांवर टिकून होता. बऱ्याच चित्रकारांनी रोजियरला आपला आदर्श मानला असावा कारण त्याने बरीच वर्षं कार्यशाळा चालवली होती, त्यात त्याचे सहकारी आणि बरेच विद्यार्थीही तयार झाले होते.

त्यांच्या कामात एक वेगळी नियोजनपद्धती जी अगदी सुटसुटीत असायची. रंगचैतन्य व प्रतीकांचा भरपूर उपयोग त्यानं केलेला दिसून येतो. 'डिसेंट फ्रॉम द क्रॉस' व 'द लास्ट जजमेंट इन बून' ही दोन चित्रं फारच महत्त्वाची मानण्यात येतात. त्याच्या आयुष्यात तो अत्यंत समृद्ध जीवन जगला आणि ख्यातीप्राप्त चित्रकार म्हणूनही तो जगापुढे राहिला, की ज्याच्या शैलीचं अनुकरण होत राहील. असा हा चित्रकार १४६४ मध्ये स्वर्गवासी झाला. त्याला सेंट मायकल कथिड्रल या चर्चमध्ये दफन करण्यात आलं.

**सेबास्टियानो देल पिऑम्बो**



हा चित्रकार चौदाव्या शतकातला. इटली देशातल्या विनेस शहरात १४८५ साली जन्माला आला. त्याला लहानपणापासून वाद्यं वाजवण्याची आवड. तंतुवाद्य तो सहजसुंदर वाजवायचा. त्यात त्यानं बऱ्यापैकी यश मिळवलं होतं. पण हळूहळू वय वाढत गेलं तसतसं त्याची चित्रकलेची गोडी



वाढत गेली. वयाच्या अठराव्या वर्षापासून तो चित्रं रेखाटायला लागला. जियोवानी बेलिनी व जॉरजिओनी यांच्याकडे तो प्रशिक्षित विद्यार्थी म्हणून काम शिकत होता. पुढे पुढे तो कामात इतका तरबेज झाला की त्यानं काढलेलं चित्र हे जियोवानीनंच काढलं आहे असा बघणाऱ्यांचा समज व्हायचा. चित्रकलेची जाणीव प्रगल्भ होत गेल्यानंतर तो १५११मध्ये रोमला गेला. हे काम एक निमित्त झालं रोमला स्थायिक होण्याचं. काही काळातच तो रफैल आर्टिस्ट सर्कलचा सदस्य बनला.

विशेष म्हणजे १५१५ मध्ये सेबास्टियानो मायकेलअँजेलो याच्या कामानं इतका प्रभावित झाला की त्याच्याशी मैत्री करून त्याच्या कामात सहकार्यही करू लागला. बऱ्याचदा असं व्हायचं की सेबास्टियानो हा पोपबरोबर सारखा भ्रमंतीवर असल्यामुळे तो बरीचशी चित्रं पूर्ण करण्यास असमर्थ ठरायचा, तेव्हा मात्र मायकेलअँजेलो त्याचं चित्र पूर्ण करून द्यायचा. ही वेगळ्या मैत्रीची देवाणघेवाण चित्रसहकार्याच्या माध्यमातून चालायची. परंतु मैत्रीचं दुर्दैव की, मैत्री फार काळ टिकू शकली नाही. 'लास्ट जजमेंट' हे चित्र सीस्टीन चॅपलमध्ये लागणार होतं. त्या पेंटिंगच्या वादावरून मैत्रीला वाटा फुटल्या. मानवी स्वभाव हाच मुळात गुंता आहे. त्यात उत्तमोत्तम गुरफटून संपून जातं. त्यात मग नको असणारं, कुणालाही न आवडणारं वैरही निर्माण होत जातं. याही मैत्रीत असंच झालं.

एका कामामुळे अधिक नात्याचा गुंता वाढत गेला. सेबास्टियानोनं एका मित्रासाठी पोपला प्रोत्साहित केलं. त्यानं भिंतीवर मारण्याचं प्लास्टर असतं ते काही टेक्निक वापरून विकसित केलं होतं. त्या प्लास्टर पार्श्वभागावर चित्र काढणार होता. पण, असं नमूद केलंय की त्या पार्श्वभागावर मायकेलची कलाकृती चित्रित होणार होती. तो पार्श्वभाग (Fresco) मायकलला रुचला नाही. त्यानं स्वत:चा पातळ रंग मारून बेस तयार केला. यात पुन्हा मतभेद झाले आणि मैत्री लयाला गेली. त्यामुळे सेबास्टियानोच्या हाती असलेली दोन कामेसुद्धा त्यानं केली नाही. तो भयंकर मानी होता.

तो रफेल आर्टसर्कलचा सदस्य होता. त्यानं अनेक पोर्ट्रेट केली होती, पण रफेल जिवंत असेपर्यंत सेबास्टियानो अंधारातच चाचपडत राहिला. रफेल गेल्यानंतर त्याला व त्याच्या कामाला बरे दिवस आले. पोपच्या सतत सेवेत असल्यामुळ त्याला चित्रकलाक्षेत्रात हवं तसं काम करताच आलं नाही. असा हा कलंदर चित्रकार वयाच्या बासष्टव्या वर्षी छोट्याशा आजारानं १४ जून १५४७ रोजी मृत्युमुखी पडला. त्याच्या मृत्युपत्राप्रमाणे त्याला खूप साधेपणाने दफन करण्यात आलं व त्याचा पैसा गरिबांना दान करण्यात आला.

**– विजयराज बोधनकर**
vijayrajbodhankar1964@gmail.com

॥ग्रंथाली॥




**मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.**

**सुरेश वांदिले यांची दोन पुस्तके**

■

**धम्माल, चित्तथरारक**
**आणि**
**अंतर्मुख**
**करणाऱ्या कथा**


■





**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

## पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते चिंतन-३ आणि भगवद्गीतेतील विज्ञानमूल्ये या पुस्तकप्रकाशन

विज्ञानधारा या उपक्रमातील दुसरा कार्यक्रम ठाण्याच्या सरस्वती सेकंडरी स्कूल येथे ३ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. काकोडकर यांनी ग्रंथालीच्या उपक्रमशीलतेचं व विद्यार्थ्यांसाठीच्या या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना 'करिअर' निवडताना उपयोगी ठरतील असे तीन मुद्दे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्याला ज्या विषयात गोडी आहे त्यामध्ये करिअर केली पाहिजे. भरपूर पैसे व चांगले पद मिळण्याबरोबरच ज्या क्षेत्रात आपण काम करतोय त्या क्षेत्रात काही मोलाची भर घालू शकतो त्यामध्ये करिअर केली पाहिजे. त्याचप्रमाणे माणसामुळे विश्वाच्या जडणघडणीमध्ये जे अपायकारक बदल होत आहेत त्याला अटकाव करण्यासाठी आपण काही करू शकू अशा करिअरची निवड आपण केली पाहिजे, असे डॉ. काकोडकर यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी, वाऱ्याचा वेग कसा मोजावा, पृथ्वीच्या आसाचा बदलता कल आणि ध्रुवतारा, हायड्रो एनर्जीचा वापर, मायक्रोब्जच्या मदतीनं ऊर्जानिर्मिती, आण्विक ऊर्जानिर्मिती केंद्रातील कचऱ्याची समस्या असे त्यांच्या मनातील काही प्रश्न विचारले. या प्रश्नांना डॉ. काकोडकर यांनी अतिशय सुबोध व विस्तृत उत्तरं दिली.




यानंतर ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शरद काळे यांच्या 'चिंतन-३ आणि 'भगवद्गीतेतील विज्ञानमूल्ये' या पुस्तकांचं प्रकाशन डॉ. काकडोकर यांच्या हस्ते करण्यात आलं. या पुस्तकाची प्रस्तावना लिहिणाऱ्या अंजली घैसास यांनी यावेळी मनोगत व्यक्त केलं. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या विविध उपक्रमांबद्दल माहिती सांगितली.

डॉ. शरद काळे यांनी विद्यार्थ्यांकडून पर्यावरणसंवर्धनासाठी उपयुक्त अशा 'मी पानात टाकणार नाही. अन्न वाया घालवणार नाही' आणि 'आज आम्ही आमच्या शब्दकोशातून कचरा हा शब्द काढून टाकण्याचं ठरवलं आहे.' या प्रतिज्ञा करवून घेतल्या. अन्न टाकणं हा आईचा, शेतकऱ्याचा आणि पृथ्वीचा अपमान आहे. तसेच आपण विविध वस्तू वापरून त्या निसर्गात टाकून देतो व त्यामुळे अनेक पर्यावरणविषयक समस्या तयार होतात. त्यामुळे वापरून झाल्यावर वस्तू टाकून न देता त्यांना पुनर्वापर करण्यासाठीच्या साखळीत दिलं पाहिजे असं सांगितलं. विद्यार्थ्यांना त्यांनी घरात तयार होणाऱ्या विघटनशील (ओल्या) कचऱ्याचं उत्तम पोषणमूल्य असलेल्या खतात रूपांतर कसं करायचं याचं प्रात्यक्षिकही करून दाखवलं.


विद्यार्थ्यांनी डॉ. काळे यांनाही अवयवदान, माणसाचे विचार आणि स्वप्न यांच्यातील संबंध, विरजण लावण्यासाठी लाल मिरचीच्या देठाचा वापर, सूर्योदयाच्या कालावधीची वेळ निश्चित करणं अशा विविध विषयांवरील प्रश्न विचारले आणि डॉ. काळे यांनी त्यांना उत्तरं दिली. सरस्वती सेकंडरी स्कूलचे विश्वस्त सुरेंद्र दिघे, मुख्याध्यापक कैलास रावते, ग्रंथालीचे विश्वस्त श्रीधर पाटील आदी यावेळी उपस्थित होते. विज्ञानशिक्षिका शिल्पा कोठेकर यांनी आभारप्रदर्शन केलं तर ग्रंथालीच्या महेश खरे यांनी सूत्रसंचालन केलं. श्रेया जैतपाल हिच्या सुरेल पसायदानगायनानं कार्यक्रमाची सांगता झाली. ●

## दादरच्या शिशुविहार आणि खारघरच्या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या प्रशालेत 'विज्ञानधारा' कार्यक्रम

विज्ञानधारा या उपक्रमात शिशुविहार विद्यालय, दादर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. १६ डिसेंबर रोजी दादर येथे झालेल्या कार्यक्रमात बी.ए.आर.सी.मधील निवृत्त वैज्ञानिक शरद काळे यांनी विद्यार्थ्यांमधील कुतूहल व विज्ञानवृत्ती वाढावी म्हणून त्यांच्याशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी सोप्या भाषेत उत्तरे दिली. उत्तम प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना कुतूहलरत्न हे प्रमाणपत्र आणि पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी शरद काळे यांनी ओल्या कचऱ्याचे खतात रूपांतर करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले आणि विद्यार्थ्यांना अन्नपदार्थ वाया न घालवण्याची तसेच कचरा हा शब्द जीवनातून घालवण्याची शपथ दिली. शिशुविहार शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांची शाळा कचरामुक्त करण्याचा संकल्प केला. असाच कार्यक्रम गोखले एज्युकेशन सोसायटीची प्रशाला, खारघर या ठिकाणी पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानकुतूहल निर्माण व्हावे या हेतूने हा उपक्रम 'ग्रंथाली'ने आखला आहे.

●

# 'भगवान गौतम बुद्ध' या पुस्तकाचे प्रकाशन




मंगळवार, ६ डिसेंबर २०२२ रोजी बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनाच्या दिवशी अविनाश फणसेकर लिखित 'भगवान गौतम बुद्ध' या नाटकाच्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रज्ञा दया पवार यांच्या हस्ते व रिपाईचे (गवई) मुंबई प्रदेशाध्यक्ष आनंद खरात यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ग्रंथाली प्रतिभांगणच्या वास्तूत झालेल्या या कार्यक्रमात सुरुवातीला ज्येष्ठ गायिका, नाट्य अभिनेत्री योजना शिवानंद आणि बालगायिका अनन्या गोखले यांनी सुरेश भट लिखित आणि यशवंत देव यांनी संगीतबद्ध केलेल्या भगवान गौतम बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील दोन गीतांचे सादरीकरण केले. यानंतर यशोधरेच्या स्वगताची ध्वनिचित्रफीत पडद्यावर दाखवण्यात आली.

मुखपृष्ठ साकारणारे चित्रकार सय्यद भाई तसंच कार्यक्रमाला उपस्थित विविध मान्यवर आणि कार्यक्रमासाठी मदत करणाऱ्या विविध व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी मनोगत व्यक्त केलं. योजना शिवानंद यांनी या नाटकाच्या आठवणी जागवत या पुस्तक प्रकाशनाची पार्श्वभूमी सांगितली. १९८१ साली या नाटकाचा एकांक नागपूर येथे दीक्षाभूमीवर झाला होता. यामध्ये डॉ. नितिश भारद्वाज आणि योजना शिवानंद यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या नाटकाच्या प्रयोगांच्या निमित्तानं त्यांना बुद्धाच्या शिकवणुकीचा व बाबासाहेबांच्या विचारांची नव्यानं ओळख झाली, असं त्यांनी सांगितलं.

आनंद खरात यांनी या नाटकाचे प्रयोग पुन्हा व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी प्रा. मीना गोखले यांनी मनोगत व्यक्त करताना योजना शिवानंद यांच्या विविध पैलू असलेल्या सृजनशीलतेचे आणि कार्यक्रम आयोजनातील तपशीलवार तयारीचे कौतुक केले.

सुप्रसिद्ध साहित्यिक प्रज्ञा दया पवार यांनी बोलताना योजना शिवानंद यांचे मनस्विनी व प्रबुद्धिनी असे वर्णन केले. या पुस्तकाचे प्रकाशन करताना ग्रंथालीच्या वाचक चळवळीचा प्रवास शाळकरी वयापासून त्यांनी पाहिला असल्याचे व प्रतिभांगण-सारख्या उत्तम वास्तूत कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यामुळे आनंद झाल्याचे त्यांनी सांगितलं. गौतम बुद्धानं स्वत:ला कधी भगवान म्हणवून घेतलं नाही. त्यांनी जनसामान्यांना स्वतः धम्माचा अनुभव घ्या आणि त्याप्रमाणे वर्तन करा अशी शिकवण दिली. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या शिकवणुकीला नव्याने दीनदलितांपर्यंत पोहोचवलं. या नाटकाच्या पुस्तकाच्या व प्रयोगांच्या निमित्तानं ही शिकवण पुन्हा लोकांसमोर यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सध्याच्या सामाजिक अस्वस्थतेच्या वातावरणात गौतम बुद्धाचे शांतीचे विचार मांडणाऱ्या नाटकाच्या पुस्तकाचं प्रकाशन ग्रंथालीनं केल्याबद्दल त्यांनी ग्रंथालीचेही आभार मानले.

डॉ. मृण्मयी भजक यांनी या कार्यक्रमाचं नेटकं आणि रसपूर्ण सूत्रसंचालन केलं. महेश खरे यांनी ग्रंथालीच्या पुढील उपक्रमांविषयी माहिती सांगितली. ●


# 'कॉर्पोरेट गप्पा' कार्यक्रमात दीपक घैसास यांची मुलाखत

कॉर्पोरेट गप्पा या उपक्रमात सुप्रसिद्ध उद्योजक आणि अर्थतज्ज्ञ दीपक घैसास यांची मुलाखत शुक्रवार, १६ डिसेंबर २०२२ रोजी ग्रंथाली प्रतिभांगण येथे आयोजित करण्यात आली. 'उद्योगविश्व'चे संस्थापक ज्ञानेश चांदेकर यांनी आपल्या नेमक्या व अभ्यासपूर्ण प्रश्नांनी घैसास यांना बोलते केले. घैसास यांनी त्यांचा खाद्यउद्योग, सॉफ्टवेअर आणि गुणसूत्रे-स्टेमसेल्स अशा बहुपैलू उद्योजकतेचा प्रवास अतिशय रंजकपणे सांगितला. पुढील काळामध्ये अनुवंशशास्त्रात इतकी प्रगती होणार आहे की जोडप्यांना आपल्याला मूल कसे हवे हे ठरवता येऊ शकेल, असे ते म्हणाले.

'येणाऱ्या काळामध्ये भारताला सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याची मोठी संधी आहे. कोविडच्या काळामध्ये भारताने साऱ्या जगाला हे दाखवून दिले आहे की इतक्या मोठ्या लोकसंख्येला लस देणे शक्य आहे. इतकेच नव्हे तर भारताने जगभरात या लसीचा पुरवठाही केला. नव्या जगामध्ये उद्योजकतेच्या खूप नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. लोकांची गरज आणि ती योग्यप्रकारे पूर्ण करण्याची तयारी असणारा उत्साही उद्योजक असेल तर धार्मिक कार्य करण्यासाठी पुरोहितांची सोय करणे हा उद्योगही चांगला व्यवसाय करू शकतो हे आता सिद्ध झाले आहे. भविष्यात कदाचित बँकांचीही आवश्यकता राहणार नाही. त्यांची जागा घेणारी नवी व्यवस्था तयार होईल. जे उद्योग बदलत्या काळानुसार बदलणार नाहीत ते नामशेष होतील. नोकियासारखी प्रचंड मोठी कंपनीही हे बदल न केल्यामुळे खूप मागे पडली.' असे अनेक मुद्दे घैसास यांच्या मनोगतामध्ये आले.

अतिशय रंगलेल्या या गप्पांमध्ये उपस्थित प्रेक्षकांनीही काही प्रश्न विचारले व घैसास यांनी त्याला रंजक अशी उत्तरे दिली. ●

## ‘फक्त ‘ती’च्यासाठी’ या पुस्तकाचे प्रकाशन




स्त्रियांच्या गर्भपाताच्या हक्कासाठी गेली चौदा वर्षं एकहाती लढा देणारे डॉ. निखिल दातार सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ आणि कायद्याचे पदवीधर आहेत. त्यांच्या या लढ्याची गोष्ट सांगणारं, डॉ. स्मिता दातार लिखित पुस्तक, ‘फक्त ‘ती’च्यासाठी’, २४ डिसेंबर रोजी ग्रंथालीनं प्रसिद्ध केलं आहे. या प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती मृदुला भाटकर, मुंबईच्या माजी महापौर निर्मला सामंत प्रभावळकर, एसीपी ज्योत्स्ना रासम, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. पुस्तकाला मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांची प्रस्तावना लाभली आहे.


या सोहळ्याची सुरुवात शुभांगी भुजबळ आणि शिल्पा साने यांनी सादर केलेल्या ‘व्हय मी सावित्रीबाई’ या नाट्यछटेनं झाली. ‘हे पुस्तक म्हणजे स्त्रियांच्या गर्भपात हक्कासाठी दिल्या गेलेल्या लढ्याची उद्‌बोधक गोष्ट आहे. अतिशय सोप्या आणि रंजक पद्धतीनं डॉ. स्मिता यांनी हा लढा वाचकांसमोर ठेवला आहे. केवळ वीस आठवड्यापर्यंतच गर्भपात वैध आहे, या जुन्या कायद्यामुळे स्त्रियांना गंभीर विकृती असलेल्या किंवा अवांच्छित मुलं जन्माला घालून, काय दिव्यातून जावं लागतं, याचं वर्णन वाचून आपण अंतर्मुख होतो. नवीन शोध लागतात मात्र कायदे जुनेच राहतात. हा जुना गर्भपात कायदा बदलण्याची गरज का होती, हे वाचकांना हे पुस्तक वाचून कळतं.’ असे पुस्तकाविषयी गौरवोद्‌गार माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी काढले.

डॉ. दातारांनी समाजातल्या आणखी काही गंभीर समस्यांसाठी काम करावं, आम्ही त्यांना नक्की साहाय्य करू, असं प्रतिपादन मुंबईच्या माजी महापौर निर्मला सामंत प्रभावळकर यांनी केलं. डॉ. दातारांनी सेहत संस्थेसोबत शोधून काढलेल्या ‘रेप टूल किट’मुळे पोलिसांना बलात्कार केसमध्ये पुरावे शोधणं सोपं झालं आहे, असे उद्‌गार एसीपी ज्योत्स्ना रासम यांनी काढले.

कार्यक्रमाच्या निवेदक मृण्मयी भजक यांनी दातार दाम्पत्याची हलकीफुलकी मुलाखत घेतली. ‘स्त्रियांना सुधारित गर्भपात कायद्याची माहिती मिळावी आणि डॉ. निखिल दातार यांचे स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य मिळवून देण्याचे हे प्रयत्न घराघरात पोचावे, आणि हा लढा तीव्र व्हावा, म्हणून आपण हे पुस्तक सोप्या भाषेत आणि गोष्टीरूपात लिहिलं,’ असं लेखिका डॉ. स्मिता दातार म्हणाल्या.

‘गर्भपात कायद्यात अजूनही सुधारणा अपेक्षित आहेत, त्यासाठी मी पुन्हा न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. मी स्त्रियांसाठी आणि समाजातल्या इतर गंभीर प्रश्नांसाठी लढतच राहीन,’ असं डॉ. निखिल दातार म्हणाले. ग्रंथाली ही एक वाचक चळवळ आहे, त्या माध्यमातून हे वेगळ्या विषयावरचं पुस्तक तुमच्यासमोर येतंय, असं सांगून ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या आगामी उपक्रमांविषयी माहिती दिली. डॉ. भानुबेन नाणावटी कलाघर इथे संपन्न झालेल्या या प्रकाशन सोहळ्याला अनेक क्षेत्रांतले मान्यवर उपस्थित होते. ●



॥ग्रंथाली॥




**टिपंवणी**
**झरा मूळचा खरा**
संपादन
**नीलम माणगावे**
**प्रा. आशालता कांबळे**
■
**टिपवंणी आत्मकथनावरील अभिप्रायांचे संकलन**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

**बंजारा परंपरा आणि भोगवटा**
**डॉ. विजय जाधव**
■
**बंजारा समाजजीवनावरील लेखसंग्रह**





**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# Tales Of Growing Less Ordinary या पुस्तकाचे प्रकाशन

२३ डिसेंबर २०२२ रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात विनोद आलकरी लिखित Tales Of Growing Less Ordinary - A series of fortunate events या इंग्रजी पुस्तकाचं प्रकाशन महाराष्ट्र ज्ञान मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक विवेक सावंत, व्यवसाय सल्लागार विवेक गोविलकर आणि सामाजिक कार्यकर्त्या विजया चौहान यांच्या शुभहस्ते झालं. लेखक विनोद आलकरी यांनी त्यांच्या युनिसेफमधील कारकिर्दीत देश-विदेशांत आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक लिहिलं आहे.

आरंभी ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची आणि आगामी प्रकाशनांची माहिती दिली.




लेखक विनोद आलकरी यांनी आपल्या मनोगतात पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट केली. अनुभव सांगणं या हेतूबरोबरच इतरांनी, विशेषतः तरुणांनी त्यापासून काही शिकावं ही त्यामागची भावना आहे असं ते म्हणाले. किस्से आणि विनोदाचा शिडकावा असलेल्या भाषणात त्यांनी हार्दिक, थरारक अशा अनुभवांनी आपल्याला बरंच काही कसं शिकवलं, असं किस्से सांगून म्हटलं.

सामाजिक कार्यकर्त्या विजया चौहान आणि लेखक हे युनिसेफमधील सहकारी असल्यामुळे त्यांनी आपल्या भाषणात लेखकाच्या कार्यपद्धतीचा आढावा तर घेतलाच, शिवाय माणूस म्हणून त्यांचं मोठेपण कशात आहे तेही उद्धृत केले. कुटुंबातील आर्थिक संकोच हा जगण्यातील आकांक्षाही मर्यादित करतो. फार मोठी झेप घेण्याची स्वप्नं बघायला मध्यमवर्गीय कुटुंबातून उत्तेजन नसतं त्यामुळे स्वतःचं मनही त्यासाठी तयार होत नाही. विनोद हा त्याला अपवाद आहे कारण त्याच्याकडे ते धाडसी मन आहे, आत्मविश्वास आहे आणि उंच उडू पाहणारी दृष्टी आहे. विनोदनं अपयशाची भीती कधी बाळगली नाही. अपयशामुळे निराश न होता आपण उंच उडी घेऊ शकतो हे स्वतःला बजावत त्यानं आपलं करिअर त्या दृष्टीनं नियोजित केलं असं त्या आपल्या भाषणात म्हणाल्या.

लेखक आणि व्यवसाय सल्लागार विवेक गोविलकर यांनी लेखक विनोद आलकरी यांच्या परदेशातील अनुभवांवर भाष्य करताना त्यांना स्वतःला तशाच काही अनुभवातून जावं लागलं त्या प्रसंगांची उजळणी केली. अशा अनुभवांमधूनच त्यांना कथाबीज मिळत गेलं आणि त्यांची लेखनसंपदा वाढली हेही आपल्या भाषणात नमूद केलं.


महाराष्ट्र ज्ञान मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक विवेक सावंत यांनी या प्रकाशन समारंभाचं अध्यक्षस्थान भूषवलं. पुस्तकातील लेखकाचा प्रांजळपणा त्यांना खूप भावला. त्याची दोन-तीन उदाहरणंही त्यांनी आपल्या भाषणात दिली आणि लेखकाचा हा खरेपणा वाचकांच्या मनाला भिडेल अशी खात्री त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. स्वतःच्या आयुष्याला गौरवपदावर नेऊन ठेवण्याचा कुठलाही प्रयत्न लेखकानं केला नाही याबद्दल त्यांनी लेखक विनोद आलकरी यांचं कौतुक केलं. वर्धा, अमरावती यासारख्या छोट्या शहरातून आलेल्या एका तरुणाने यशाची शिडी कशी चढली त्याची ही गोष्ट, न्यूनगंडानं पछाडलेल्या छोट्या शहरातील तरुणांनी वाचावी यासाठी या पुस्तकाचा मराठी अनुवाद लवकरात लवकर निघावा अशी विनंती त्यांनी या प्रकाशनप्रसंगी केली. जगभरात युद्धामुळे किंवा दहशतवादामुळे होरपळलेल्या बालकांना पिण्याचं शुद्ध पाणी मिळावं किंवा इतर सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी युनिसेफची धडपड सुरू आहे. या समाजकार्याचा लेखक विनोद आलकरी हे एक भाग आहेत. इराकसारख्या दहशतवादग्रस्त देशात कार्यरत असताना विनोद आलकरी यांना आपलं अपहरण होऊ नये म्हणून जे प्रशिक्षण घ्यावं लागलं त्या चित्तथरारक प्रसंगाचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. लेखक जगभरातील मुलांच्या कल्याणासाठी अशा प्रसंगातून जाण्याचं जे धाडस करतात त्याबद्दल विवेक सावंत यांनी गौरवोद्‌गार काढले. लेखकाच्या उत्तम भाषाशैलीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. अतिशय थोडक्या शब्दांत नर्मविनोद किंवा थरार कसा लिहिला जाऊ शकतो त्याचं हे उत्तम उदाहरण आहे. शीर्षकात वापरलेले ‘less ordinary’ हे नम्रतादर्शक शब्द खरं तर लेखकाचे ‘एक्स्ट्राऑर्डिनरी’ गुण दाखवतात. आजकालच्या जगात आपल्याकडील घरटी एक मूल परदेशी जाण्याचा काळ येत चालला आहे. त्या काळात तरुणांनी हे पुस्तक वाचणं, मनन करणं, त्यामध्ये आलेली सांस्कृतिक देवाणघेवाण समजून घेणं किती समयोचित आणि महत्त्वपूर्ण आहे हे विवेक सावंत यांनी आपल्या भाषणाचा शेवट करताना आवर्जून सांगितलं.

विनोद आलकरी यांचे सुपुत्र अमेय आलकरी आणि स्नुषा प्रेक्षा शेठ आलकरी यांनी पुस्तकातील उताऱ्यांचं केलेलं अभिवाचन प्रेक्षकांना खूप आवडलं.

मेधा आलकरी यांनी या समारंभाचं नेटकं सूत्रसंचालन केलं.

●

## ‘सप्तरंगी कोरिया’ या पुस्तकाचे प्रकाशन




‘भारत आणि दक्षिण कोरिया यांचे दृढसंबंध हे हजार-पंधराशे वर्षांपूर्वीचे आहेत. अयोध्येची राजकन्या सुरीरत्न आणि दक्षिण कोरियाचा राजपुत्र यांचा विवाह झाला. त्यानंतर कोरियात ती महाराणी ‘हो’ म्हणून ओळखली जाऊ लागली. आजची कोरियातील साठ लाख प्रजा ही या राजाराणीचे वंशज आहेत अशी इतिहासात नोंद आहे. भारतीय टपाल खात्यानं राजकन्या सुरीरत्न आणि महाराणी हो यांच्या नावानं दोन टपाल तिकिटं काढली आहेत.’ अशी माहिती सुधा हुजूरबाजार तुंबे यांच्या ‘सप्तरंगी कोरिया –एक अनुभव’ या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत असताना प्रशासकीय अधिकारी मनीषा पाटणकर म्हैसकर यांनी दिली.

हा प्रकाशन समारंभ रविवार ११ डिसेंबर रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रात पार पडला. आरंभी ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली चळवळीविषयी आणि त्यांच्या आगामी प्रकल्पांविषयी, प्रकाशनांविषयी माहिती दिली.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पत्रकार आणि लेखक निळू दामले उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात, सुधा हुजूरबाजार तुंबे यांचं लेखन आपल्या लिखाणापेक्षा खोलवर असल्याची प्रांजळ कबुली दिली. त्याचं श्रेय समाजात मिसळणाऱ्या आणि माणसं जोडणाऱ्या सुधाताईंना दिलं. लेखिका तेथील समाजाशी एकरूप झाल्यामुळे तेथील लोकांच्या लकबी, सवयी यांचं मनोज्ञ दर्शन त्या या पुस्तकात घडवू शकल्या, हे पुस्तक वाचकाला अक्षरशः खिळवून ठेवतं, अशा शब्दात त्यांनी पुस्तकाचं कौतुक केलं.

या पुस्तकानिमित्त सूत्रसंचालक मेधा आलकरी यांनी सुधाताई आणि त्यांचे पती वासुदेव तुंबे यांच्याशी संवाद साधला. त्याला दोघांनी खूप मनमोकळी उत्तरं दिल्यामुळे ती मुलाखत खूपच रंगली. प्रेक्षकांमधूनही काही प्रश्न आले. कोरिया देश, तेथील संस्कृती, तिथला निसर्ग, तिथल्या लोकांची मनोवृत्ती आणि सध्या लोकप्रिय झालेल्या कोरियन मालिका याबद्दल सुधाताईंनी या पुस्तकात विस्तृत लिहिलं आहे आणि मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी माहितीपूर्ण आणि रंजक उत्तरं दिली.

ज्येष्ठ लेखिका शांता गोखले या प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांनी पाठवलेल्या शुभेच्छा मेधा आलकरी यांनी वाचून दाखवल्या. हा कार्यक्रम ग्रंथाली वॉच या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध आहे. ●

## ‘मॅटिल्डाच्या कथांना वसईच्या मातीचा गंध’ – ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक फा. फ्रान्सिस दिब्रिटो




मॅटिल्डा अँथनी डिसिल्वा यांच्या ‘निवांत’ या पुस्तकाचे प्रकाशन फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या हस्ते मर्सेस, वसई येथे संपन्न झाले.

रेव्ह. फादर दिब्रिटो आपल्या छोटेखानी मनोगतात म्हणाले की इथल्या मातीशी एकरूप झालेल्या मॅटिल्डाच्या कथांना वसईच्या मातीचा, भाज्यांचा गंध व गावठी गुलाबफुलांचा दरवळ येतोय. तिच्यापासून प्रेरणा घेऊन इतरांनीही लेखन करावं. साहित्य कसं निर्माण होतं हे स्पष्ट करताना त्यांनी सांगितलं की समाजात जे जे घडत असतं, त्याचं प्रतिबिंब मनात खोलवर जातं, चिंतनशील मनुष्य त्यावर विचार करायला लागतो, त्याला लिहावंसं वाटतं, शब्दरूप करावंसं वाटतं.

सुदेश हिंगलासपूरकर ‘ग्रंथाली’चे विश्वस्त यांनी आपल्या ग्रंथालीचं कार्य सर्वांसमोर ठेवलं.

प्रमुख वक्त्या डॉ. सिसिलिया कर्व्हालो यांनी केवळ पुस्तकाचा इतिहास कथन नाही केला तर प्रत्येक कथेचं अभ्यासपूर्ण सार, सारांश सांगताना ह्या कथांमध्ये गॉसिपिंग नाही तर समाजनिरीक्षण, आजूबाजूची अस्वस्थता आहे, असं सांगितलं.


लेखिका मॅटिल्डा यांनी, आपल्या या क्षणीच्या मनोवस्थेची तुलना पहिलटकरणीशी केली आहे. पहिलं पुस्तक म्हणजे पहिलं बाळच असतं, त्याचं स्वागत कसं होईल याची उत्कंठा असते, असं म्हणत त्यांनी लग्नानंतर सुरू केलेल्या लेखनाबद्दल सांगितलं.

समारंभाचे अध्यक्ष मॉन्सिनियर फ्रान्सिस कोरिया यांनी लेखिकेला नाताळच्या चांदणीची उपमा देताना ही चांदणी आता प्रकाशमान झाली आहे. तिला लघुकथेचं तंत्र आणि मंत्र गवसलंय असे सांगून पुस्तक दर्जेदार झाल्याचं गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ. सिलीन डिसिल्वा यांनी पाहुण्यांचे स्वागत केलं. उज्ज्वला लेमॉस यांनी प्रास्ताविक तर दीपक मच्याडो यांनी आभारप्रदर्शन केलं.


शिक्षिका व लेखिका असलेल्या अचला मच्याडो यांच्या सहजसुंदर सूत्रसंचालनाने गुंफलेला, कृत्रिमतेचा लवलेश नसलेला असा हा सोहळा रंगला. ●

# वाचकदिनी प्रसिद्ध पुस्तके











ग्रंथालीच्या ४८ व्या वाचकदिना-निमित्त आयोजित साहित्य आणि सुरांची मैफल या कार्यक्रमात ज्येष्ठ निवेदिका मंगला खाडिलकर यांनी उषा मंगेशकर यांना 'दीदी आणि मी' या कार्यक्रमात बोलते केले.

लतादीदींच्या आठवणींवर मी एक पुस्तक काढणार आहे, असे उषा मंगेशकर यांनी यावेळी सांगितले. 'आम्ही पाच' हे त्याचे नाव असेल. हे पुस्तक दीदींच्या समोर व्हावे अशी माझी इच्छा होती, मात्र कोरोनामुळे ते रखडले, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. विविध प्रकारची गाणी, हिंदी गाण्यांचा अनुभव, लावणीचे प्रकार, संगीतकारांची खासियत, दीदींबरोबर प्रथम गाताना काय वाटलं अशा विविध अंगांनी सुसंवादिनी मंगला खाडिलकर यांनी उषाताईंशी संवाद साधला. कार्यक्रमाचे मानधन न घेता उषाताईंनी 'ग्रंथाली'चेच उत्तम श्रोत्यांसमोर बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले.


कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात ग्रंथालीच्या सहा पुस्तकांचे प्रकाशन 'एबीपी माझा'चे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले, की वाचकदिनी प्रसिद्ध झालेली ६ पुस्तकं ही वेगळ्या धाटणीची आहेत. सगळी पुस्तकं अतिशय उत्तम आणि प्रत्येक पुस्तक वाचनीय आहेत. मराठी वाचनसंस्कृती वाढण्याविषयी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे हे सांगताना पुस्तकांची परीक्षणं नीट छापून येतात का, ग्रंथालीनं प्रकाशित केलेल्या सुरेश वाघे यांच्या 'संकल्पनाकोश'सारख्या अनेक वर्षांच्या अभ्यासातून साकारलेल्या ग्रंथांविषयी आपण अनभिज्ञ असावं याबद्दल खंत व्यक्त केली. तसंच, दरवर्षी अनेक महत्त्वाची पुस्तकं प्रसिद्ध होत असतात परंतु त्यांना योग्य प्रसिद्धी न मिळाल्यामुळे ती वाचकांपर्यंत पोचत नाहीत हाही मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. म्हणूनच टीआरपीचा विचार न करता अशी पुस्तकं वाचकांना समजण्यासाठी 'एबीपी माझा'नं 'आनंदाचं पान' हा साहित्यविषयक कार्यक्रम सुरू केला, असं ते म्हणाले. यावेळी 'एबीपी माझा'च्या सहसंपादक भारती सहस्रबुद्धे यांनी 'आनंदाचं पान' या कार्यक्रमाची चित्रफीत दाखवली आणि त्यामागची भूमिका विशद केली.

यावेळी मोनिका गजेंद्रगडकर यांचं 'शब्दांचा झुला', प्रा. वृषाली मगदूम यांचं 'जिणं शोषितांचं', चांगदेव काळे यांचं 'ढगाखाली', सॅबी परेरा यांचं 'तिरकस-चौकस', किरण येले यांचं 'जागो, मैं खुदा हूँ', सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांचं 'नोबेलनगरी २०२२' ही पुस्तकं प्रसिद्ध झाली.










समाजामधील वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न सातत्यानं करण्यात येतो, अल्पसंख्याकांविषयी अपप्रचार केला जातो, या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजाची आर्थिक स्थिती दाखवणारा लेख या पुस्तकात आवर्जून समाविष्ट केल्याचे प्रा. मगदूम यांनी सांगितलं. चांगदेव काळे, मोनिका गजेंद्रगडकर यांनी लालित्यपूर्ण शैलीमध्ये त्यांच्या पुस्तकांची ओळख करून दिली. किरण येले यांनी 'जागो, मैं खुदा हूँ' या नाटकाच्या लेखनाची पार्श्वभूमी यावेळी उपस्थितांपर्यंत पोहोचवत मन्टोच्या ऋणातून मुक्त होण्याचा हा प्रयत्न असल्याचं सांगितलं.

सॅबी परेरा यांनी सगळे धोके पत्करून लिहावं लागतं असं सांगितलं. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रस्तावना केली, तर डॉ. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केलं. ●


# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**कर्मण्येवाधिकारस्ते**

**मनीषा दहातोंडे (लबडे)**




**भातावर झाकण ठेवलेला फळा**

*'' नवा अधिकारी... नवा प्रकल्प... नवी कार्यवाही...! ती पूर्णत्वाला जाईपर्यंत त्याची नाव किनाऱ्याला लागेपर्यंत दुसरा प्रकल्प. मग ज्ञानरूपी नाव हेलकावे खाणारच! नावाड्याची दिशाभूल होणारच! स्वत:च्या विचारांचा दीपस्तंभ जवळ असताना अनेक उसन्या दीपस्तंभांची माळ प्रकल्पाच्या रूपाने त्याच्या पुढ्यात मांडल्यावर इकडे जाऊ की तिकडे, या द्विधा अवस्थेत तो गांगरून जाणारच! विद्यार्थीरूपी प्रवासी मात्र त्याच्यावर विश्वास ठेवून निश्चिंत असतो... आपला हा नावाडी आपल्याला किनाऱ्यावर नेईल. संकटाशी चार हात करील. पण आपल्याला ज्ञान देईलच अशी त्यांची अपेक्षा असते!''*

'कर्मण्येवाधिकारस्ते...' ही मनीषा दहातोंडे (लबडे) यांची बृहत्‌कादंबरी. ती शीर्षक आणि मुखपृष्ठापासूनच आपल्याला आकर्षित करते. आपण कर्म करत राहावे, एवढाच हे शीर्षक आपल्याला संदेश देते. पुढे त्याच्या फळाविषयीची कल्पना वाचकांवर सोपवलेली दिसून येते. वास्तविक तसे पाहिले तर हे शीर्षक आपल्या कर्म–कर्तव्यावरच ठाम आहे. फळ नावाची बाब विचारात घेण्याची गरज नाही, ते त्यातच अंतर्भूत आहे. फुलांत गंध असतो, फळांत रस असतो नैसर्गिकपणे तसा, कादंबरीचा विषय शिक्षणक्षेत्राशी निगडित आहे. तिथे शिक्षक हा केंद्रस्थानी हिशोबात आहे, तेव्हा विद्यार्थी हा गृहीत धरलेलाच असतो. ज्ञान देणारा आणि ज्ञान घेणारा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे कर्मण्येवाधिकारस्ते एवढेच समर्पक ठरते, आशयसंपन्न ठरते, सगळा पैस ते कवेत घेण्याची क्षमता सिद्ध करते.

तीच गोष्ट सतीश भावसार यांनी साकारलेल्या मुखपृष्ठाबाबत. फुलपाखरू आणि त्याच्याभोवती भक्कम काटेरी रज्जू! मुक्त आकाशात स्वच्छंद झेप, विहार करण्याचे त्याचे स्वप्न साकार होईल, ही कल्पनाच जखमी झाली आहे. हे फुलपाखरू विद्यार्थ्यांचे प्रतीक समजायला हरकत नाही. तुम्हाला मनासारखे खूप काही करायचे आहे, ध्येय गाठायचे आहे, हेतू–उद्देश साध्य करायचे आहेत, पण... पण व्यवस्थेचे काटेरी नियम आणि त्यातल्या जखमी करणाऱ्या प्रवृत्ती तुमच्या स्वच्छंद मुक्त कल्पनांना जखमी करण्यासाठीच समोर ठाकलेल्या असतात. त्यांच्या दणकट, प्रस्थापित काटेरी टोकाची अस्त्रे घेऊन. अशावेळी परिणाम काय होईल, याची कल्पना केलेलीच बरी. मुखपृष्ठ या आशयाचे खूप नेमकेपणाने आपल्याशी थेट संवाद साधून जाते.

शीर्षक आणि मुखपृष्ठ यांच्या साखळीत असणारे कथानक एका आदर्शवादी शिक्षिकेशी गुंफलेले आहे. आनंदी या कादंबरीतील नायिका. अगदी सुरुवातीपासून शिक्षक व्हायचे, हे तिचे ध्येय. नुसते शिक्षक नाही, चांगली शिक्षक! गोरगरिबांना पुढे न्यायचे, उपेक्षितांना न्याय द्यायचा, जीवनाची सुवर्णमाला बनवायची, हे तिचे ध्येय. त्यासाठी वाटेल ते परिश्रम घ्यायची, प्रसंगी पदरमोड करायची पण आपल्या ध्येयापासून पळ काढायचा नाही. पुढेच जायचे, अशी तिची जिद्द.

शाळेतील एकूण परिस्थिती नवीन शिक्षकासाठी आदर्श ठरावी अशीच असते, हे आनंदीच्या अंगवळणी पडणे आणि ती पचणे, हे एक दिव्यच! झेडपीच्या शाळेत फार काम करायचे नाही. फक्त साहेबाच्या पुढेपुढे करायचे, हा सल्ला ऐकण्याची वेळ तिच्यावर येते. शिकवणीमध्ये घरीच मुलांना शिकवल्याने पुन्हा शाळेत तेच शिकवण्याचे कष्ट कशासाठी घ्यायचे, हा दुसरा आदर्श. पण तेच आनंदी फी न घेता घरी गरीब मुलांना अधिक ज्ञानदान देण्याचा प्रयत्न करते तेव्हा मात्र बाऊ केला जातो की विनापरवानगी शिकवणी घेत आहात. शाळेत पोषक आहार देण्याच्या नावाखाली जी खिचडी शिजते, ती एक वेगळाच अभ्यासक्रम ठरते. शिक्षणापेक्षा शिजवण्याला महत्त्व अधिक दिले जाते. शाळेची तपासणी म्हणजे वरिष्ठांची प्रचंड अरेरावी. ते म्हणतील, सांगतील, आदेश देतील तेच प्रमाण. इकी की वीज शाळेत नाही तरी संगणक शाळेत बसवला पाहिजे इथपर्यंत. या सगळ्या प्रकारात पदरमोड करून आनंदी वेळ साजरी करते, परंतु त्यापायी होणारी प्रचंड घुसमट तिला सहन करावी लागते, तीही केवळ आपल्या ध्येयाच्या आदर्शापायी. या सगळ्याच्या जोडीला गावातले राजकारण, दबाव हे आणखी वेगळेच. त्यातून प्रस्थापित शिक्षकांची मनमानी, नवीन शिक्षकांना कामाला जुंपून हे आपल्या राज्यात मोकळे.


एकूण शिक्षणपद्धतीत शिरलेले अनेक गढूळ प्रवाह, शिक्षक, व्यवस्थापन, राजकारण या सगळ्याच्या भोवती फिरत राहते. नीतिमूल्ये, आदर्श, ज्ञानदानाचे पावित्र्य या सगळ्या वरवरच्या कल्पना ठरतात. अशावेळी घुसमट थांबवायची तर तिथून बाहेर पडणे अथवा स्वत:चा मृत्यू दररोज पाहणे इतकेच उरते. याचे प्रतिनिधित्व करते ती आनंदी. ''मला मुलांना गणित शिकवताना आयुष्याचं गणित शिकवायचं होतं, शरीरशास्त्राबरोबर आतला माणूस शिकवायचा होता, मला जीवनाचा आनंद शिकवायचा होता. त्यासाठी वाद नव्हता घालायचा. ते चुकलं का बाबा माझं?'' असा प्रश्न आनंदी स्वत: विचारते तेव्हा समोर केवळ तिच्या बाबांची प्रतिमा नसते, समस्त समाज समोर असतो, आपल्यासहित. तिचा तो प्रश्न आपल्या सगळ्यांसाठी असतो.

मनीषा दहातोंडे (लबडे) या अध्यापन करत आहेत. त्यामुळे कठीण–मृदू, कोमल–काटेरी सगळे त्यांनी पाहिले–अनुभवले आहे. त्यातला सच्चेपणा त्यांच्या लेखनात दिसून येतो. तळमळ, तगमग आणि ध्येय, हे सारे कुठलाही अभिनिवेश न मिरवता अगदी सहज प्रवाहीपणे ओघवत्या शैलीत मांडलेले आहे. स्वत: उत्तम लेखिका असून सातत्याने त्यांचे लेखन प्रकाशित होत आहे. उत्तरोत्तर उत्तमोत्तम लेखन त्यांच्या हातून होणार याची नांदी म्हणजे ही कादंबरी! यशवंतराव गडाख यांची सुंदर प्रस्तावना आणि डॉ. संजय कळमकर यांचा ब्लर्ब या कादंबरीच्या यशाची ग्वाही देतात.

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ४०० रुपये**

# ग्रंथपान

**श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील विज्ञानमूल्ये**
**डॉ. शरद काळे**




**जीवन जगण्याची कला म्हणजे गीता**

*''उघड्या डोळ्यांनी मार्गक्रमण केले तर प्रवास सुखाचा आणि आनंदाचा होतो. मार्गावरील सजीव आणि निर्जीव सख्यासोबत्यांना आपल्यामुळे त्रासदायक परिस्थिती निर्माण न करता त्यांच्यासह आनंदाने पुढे जात राहिले तर या ऐहिक जीवनातील शेवटचा क्षण हा सुंदर आणि आनंदाचा असेल ह्याची खात्री प्रत्येक प्रवाशाने ठेवावी असेच परमात्मा श्रीकृष्ण आपल्याला या ज्ञानविज्ञानयोगात सांगत आहेत. हेच तर आपल्यातील विज्ञान आणि विज्ञानातील अध्यात्म!''*

कौरवपांडव युद्धाच्या वेळी अर्जुनाला आलेले युद्धवैराग्य दूर करण्यासाठी श्रीकृष्णाने जीवनाचे स्तर समजावून सांगताना जे तत्त्वज्ञान श्रीकृष्णाच्या मुखातून बाहेर पडले, ती भगवद्‌गीता. सातशे संस्कृत श्लोकांत सामावलेले सार केवळ 'उपदेश' एवढे एकच तत्त्वज्ञान नाही, तर हे तत्त्वज्ञान विज्ञानाच्या भक्कम पायावर असलेले, विश्वाला नव्याने समजावून घेण्याचे परमतत्त्व आहे. प्रत्येकाने या सातशे श्लोकांचा, अठरा अध्यायांचा अन्वयार्थ तत्त्वज्ञान, आध्यात्म, विज्ञान असा आपापल्या आकलनानुसार आणि दृष्टिकोनानुसार लावलेला आहे. डॉ. शरद काळे मात्र विज्ञानाच्या दृष्टिकोनातून या ग्रंथाकडे पाहत आहेत, त्यांचा अन्वयार्थ विज्ञानाच्या पायावर आधारलेला आहे.

डॉ. शरद काळे हे वैज्ञानिक आहेत. गेली चाळीस वर्षे भाभा अणुसंशोधन केंद्रात संशोधनाचे कार्य त्यांनी केलेले आहे. विज्ञानाच्या अनेक शाखांशी त्यांचा निकटचा संबंध या संशोधनाच्या निमित्ताने प्रस्थापित झालेला आहे. 'विज्ञानाच्या पाऊलखुणां'सारखी त्यांची आतापर्यंतची एकूण ग्रंथसंपदा पाहिली तर विज्ञान हा त्यांचा श्वास आहे, याचा प्रत्यय येतो. भगवद्‌गीतेचे जीवनस्पर्शी तत्त्वज्ञान वाचत असताना त्यात सामावलेले विज्ञान त्यांच्या नजरेतून दूर होणे त्यामुळेच शक्य नव्हते. हे विज्ञान किती तऱ्हेने इथे आलेले आहे, त्याचे सूक्ष्मातले सूक्ष्म अन्वयार्थ शोधण्यात त्यांची संशोधकवृत्ती सदैव जागृत असलेली दिसून येते. अगदी आपला जन्म, आपले शरीर, त्यांचा मृत्यू, आत्मा, प्राण, देहाचा नाश आणि आत्म्याचे चिरंतन स्वरूप, यासारख्या सतत आपल्यासोबत असलेल्या शरीरावस्था, यांचे स्वरूप आध्यात्मिक पातळीवर श्रीकृष्ण अर्जुनाला समजावून सांगतात तेव्हा त्या शरीरात असलेल्या पेशी, कार्ये, विविध अवयव यांच्यात असलेले विज्ञान विसरता येत नाही. त्यातून या गोष्टीकडे अंधश्रद्धेने न पाहता वैज्ञानिक दृष्टिकोन पाहायला हवे, यांचे सुंदर विवेचन डॉ. काळे यांनी केलेले आहे.

आज आपण इंटरनेटच्या माध्यमाचा वापर करून जी दिव्यदृष्टी प्राप्त केलेली आहे, ती दिव्यदृष्टी महाभारताच्या काळातही होतीच. संजय अंध धृतराष्ट्राला रणांगणावरील दृश्यांची माहिती सांगत असतो याचे कारण त्याला प्राप्त झालेली दिव्यदृष्टी. हीच दिव्यदृष्टी श्रीकृष्णाने अर्जुनाने दिली तेव्हाच तो श्रीकृष्णाचा आकृतीत अदितीचे बारा पुत्र, आठ वसु, अकरा रुद्र, दोन्ही अश्विनीकुमार, एकोणपन्नास मरूत गण, याशिवाय कधीही न पाहिलेली अनेक रूपे, याचे जे ब्रह्मांडरूप आहे, त्याचे दर्शन अर्जुनाला झाले. या दिव्यदृष्टीची तुलना सहस्र सूर्यांच्या प्रकाशाशी केलेली आहे. या सहस्र सूर्यांचा एकत्रित प्रकाश काय असेल याची कल्पना आली त्यामुळे दिव्यदृष्टीला दिसणारे वैश्विक रूप कसे असेल याची कल्पना सगुण आणि निर्गुणाशी जोडलेली आहे. प्रकाश अधिक प्रकाश = अंधार हे सूत्र विशिष्ट स्थितीत सिद्ध होते तेव्हाच अंधाराची खरी ओळख आपल्याला होते. द्वापारयुगात कृष्णाने दिलेल्या दिव्यदृष्टीमुळे अर्जुनाला विश्वरूपाचे दर्शन झाले, तसे आताच्या युगात–कलियुगात घडलेल्या प्रसंगाचे उदाहरण लेखकाने इथे दिलेले आहे. १६ जुलै १९४५ रोजी सकाळी सहा वाजता मेक्सिकोच्या वाळवंटात 'ट्रिनिटी' ह्या गोपनीय नावाखाली पहिला अणुस्फोट केला तेव्हा त्याचा अध्वर्यू आणि पिता डॉ. रॉबर्ट ओपेनहायमर यांनी मुलाखतीत सांगितले, की हिंदू पुराणातील भगवद्‌गीतेत लिहिलेल्या सहस्र सूर्यांच्या प्रकाशाचा लेख आहे. अगदी तसाच प्रकाश मी अनुभवतो आहे. युद्धामध्ये होणारा मानवी संहार आणि परमात्म्याला धारण करावे लागणारे रौद्ररूप यांचीही तुलना या अणुबाँबच्या निमित्ताने केली आहे. वैज्ञानिक प्रयोगशाळेत प्रयोग करताना निरीक्षणांची नोंद करत जातो. त्याप्रमाणे श्रीकृष्णाने अर्जुनाचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी संपूर्ण मानवजातीला या विश्वाचा भेद उकलून दाखवण्यासाठी हा प्रयोग हाती घेतला होता. हे लेखकाचे निरीक्षण हा ग्रंथ वाचत असताना पदोपदी आपल्याला जाणवत राहते.

भगवद्‌गीतेतील विज्ञानमूल्ये वाचकांच्या समोर ठेवताना ज्ञान–विज्ञानयोग, विश्वरूपदर्शन योग, ज्ञान–कर्म–सत्यासत्ययोग आणि सांख्ययोग या अध्यायांचा समावेश केलेला आहे. या प्रत्येक अध्यायातील विज्ञानमूल्ये असलेला मूळ श्लोक, त्याचा भावार्थ आणि त्यास अनुसरून विश्लेषण असा क्रम घेतलेला आहे. त्यामुळे एक विषयानुसार नेमकेपण बांधीव स्वरूपात सादर केलेले आहे. विश्लेषण करताना विज्ञानाशी संबंधित संदर्भ, विविध घटक यांचीही माहिती दिलेली आहे आणि सगळ्यात लक्षणीय बाब म्हणजे अध्यात्म, समजुती, सगुण–निर्गुण, द्वैत–अद्वैत यांचा अभ्यासही इथे दिसून येतो. त्यामुळे गीतेकडे केवळ मार्गदर्शक उपदेश आणि जीवनाचे सार सांगणारे तत्त्वज्ञान म्हणून पाहण्याची आपली जी पारंपरिक समजूत आहे तिला विस्तारण्याचे, वेगळ्या दृष्टिकोनाचे सार आपल्यासमोर उलगडलेले आहे. गीतेतील मला समजलेले विज्ञान जगभरातील मराठी वाचकांपर्यंत पोहोचावे या एकमेव उद्देशाने हे पुस्तक आपल्या हाती सोपवत आहे, असे लेखक त्यांच्या मनोगतात सांगतात. अध्यात्माकडून विज्ञानाकडे व विज्ञानातून समाजजीवनाकडे नेणारे हे पुस्तक आहे असे प्रस्तावनेत अंजली/श्रीनिवास घैसास यांनी नमूद केले आहे. या पुस्तकाचे आशयघन मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारले आहे.

**मूल्य ४०० रुपये   सवलतीत २५० रुपये**




## ग्रंथपान

**भरारी**
**डॉ. कांताताई नलावडे**




**पंखात बळ असलेली कविता**

*''गावकुसाबाहेर जन्मलेल्या माणुसकीच्या गहिवराने*
*फुफाट्यात बसून अक्षरे वाचली*
*सरस्वती त्याचवेळी क्षणभर खचली''*

कवितेचे पुस्तक हाती घेतले, की मन कसे प्रसन्न होते. भावभावना, मनाची स्पंदने, प्रतिभेचे नवनवीन कोमल, तरल आविष्कार, रूपक-अनुप्रासाची जुगलबंदी असे बरेच काही विविधांगी, थेट काळजाला हात घालणारे विदारक वास्तव आपल्यासमोर उलगडत जाते. आपण त्यात भावविभोर होतो. नाहीतर थेट आतून-बाहेरून फुटून निघतो. तरीही जे समोर आहे त्यापेक्षा कवीला त्याहीपलीकडचे काही सांगायचे आहे, याचा शोध घेत राहतो. एका अर्थाने कविता मनाला रिझवते, फुलवते, झुलवते, तळहातावर घेऊन. नाहीतर चटके देते, दूर भिरकावून देते, आपलेपण तोडून टाकते. एका लहानशा अवकाशात आशयाचा किती प्रचंड अवकाश असतो, याचे भान देते ती कविताच.

कविता तशी विषयाच्या अंगाने पाहिली तर तिची विभागणी करता येते. ही विभागणी कवीच्या व्यक्तित्वाचा आरसा असतो. हे व्यक्तित्व अनेक घटकांवर पोसलेले असते. त्यापैकी ग्रामीणता, शेती, निसर्ग, त्याच्याशी समरस झालेले जीवन, हा एक घटक असतो, जो कवितेचा संपूर्ण पिंड पोसतो, फुलवतो. 'भरारी' या कवितासंग्रहात याचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. आषाढ, श्रावण, वसंत, रान, ज्वारी, ऊस, इतर अनेक पिकांची सुगी, यांच्या प्रत्येकांच्या विविध रूपांची, आकृतिबंधांची, छटांची प्रतिबिंबे आपल्यासमोर उभी राहतात. जशी 'रंगभरा-श्रावण' यात सरी, मेघराजाचे कारंजे, सप्तरंग उनपावसाचे, सणांची-नैवेद्याची लगबग आणि यातच भर पडते ती 'मेघ गळे नभातून। सुकलेल्या आसवांना स्फूर्ती येते रंगातून' या ओळीची. 'रान उसाचं' या कवितेत तर संपूर्ण शिवार आपल्यासमोर चित्राकृतीतून मांडलेले आहे. एकटा ऊस तिथे आहे तो जसा रानातला राजा आणि भेंडी-गवार पाहुणी, मेथी-पालक मेहुणी, पाहुण्या-रावळ्यांचा सोहळा, नाद वाहतो खळाळा, ही कविकल्पना थेट रानाशी जोडलेल्या नात्यातून उत्स्फूर्तपणे आलेली आहे. 'नानांच्या रानात' या कवितेतून तर यौवनात आलेल्या ज्वारीचे वर्णन कुणाही वयात आलेल्याला आपले प्रतिबिंब भासावे असेच आहे. याच्या जोडीला आषाढी अमावास्या, बैलपोळा, होळी हा शेतकऱ्याच्या जीवनाचा एक हिस्साच. थोडक्यात गावशिवार, रान त्यातली संपूर्ण संस्कृती या कवितांमधून आपल्या भेटीला आली आहे.

या कवितासंग्रहात दुसरा टप्पा आहे तो मायेच्या ओलाव्याचा. आई झाल्याशिवाय बाईला पूर्णत्व येत नाही, ही रूढ झालेली पक्की समज कोणत्याही सासुरवाशिणीला ओलांडून जाता येत नाही. याचा प्रत्यय 'सासुरवाशणीला मातृत्वाची चाहूल' या कवितेतून येतो. ही असा व्यक्त होते ती अशी, 'निराशेचा अंधःकारात गटागंळ्या खात होतं, जिवंतपणाचं जगणं मृत्युमय भासत होतं. 'पण मातृत्वाची चाहूल लागताच शिशिर ऋतूतही वसंत अवतरला. येण्याच्या तुझ्या चाहुलीने खरी किमया केली, अनुरागाची वेल बहरायला लागली.'

परंतु याचाच दुसरा ध्रुव आहे भ्रूणहत्या. या भ्रूणालाही जग पाहण्याची, मायेच्या ओलाव्याची असलेली ओढ क्रूरपणे खुडून टाकली जाते, या क्रूरपणाची ओळख असलेले भ्रूण आईशी संवाद साधते, जगू देण्याची प्रकाश पाहण्याची आस व्यक्त करते तेव्हा संपूर्ण चराचराच्या पूर्णत्वाची कल्पना समोर ठेवते. त्याचे वर्णन कवितेत येते ते असे, कन्याजन्माने सृष्टीच्या पूर्णत्वाला आकार दिला. जन्माने माझ्या सृष्टीवर स्वर्ग अवतरला.

'ओझं' ही कविता म्हणजे कवयित्रीचा संपूर्ण प्रवास म्हणावा अशी आहे. कन्या ते आजी, शिक्षक ते नेता, गावशिवार ते दिल्ली, असा संपूर्ण पट मांडताना जग विस्तारल्याचा अनुभव येतो तरी शेवटी घरातल्या नातीच्या इवल्या मिठीचे जग त्याहून मोठे ठरते. काही हरवले की त्याची किंमत तेव्हा लक्षात येते, तशी आई नसताना तिची उणीव किती तीव्रतेने भासते; तिचे वर्णन 'मायेची माय' या कवितेतून उत्कटपणे उतरलेले आहे.

'भरारी' या कवितासंग्रहाच्या कवयित्री आहेत डॉ. कांताताई नलावडे. साताऱ्याजवळील ग्रामीण भागातून आलेल्या परंतु राजकारणात थेट दिल्लीपर्यंतचा प्रवास केलेल्या, अटलजींसारख्या थोर कविमनाच्या राजकारणी व्यक्तीचा सहवास लाभलेल्या. विधान परिषदेत स्वतःची छाप उमटवलेल्या तरी स्वतःचे हळुवार कवित्व जपणाऱ्या कवयित्री आहेत. त्यांच्या कवितेत अटलजी, पं. नेहरू, शंकरराव खरात यांच्याविषयीच्या ओलाव्याने ओथंबलेल्या काव्यभावना पाहिल्यानंतर त्या राजकारण या रुक्ष वाटणाऱ्या माळरानावर उमललेले टवटवीत सुंदर पूर्ण काव्यसुमन आहे, याची खात्री हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह देतो. त्यांच्या कवितेत वैविध्य आहे. भाषेचा गोडवा आणि मायेचा ओलावा आहे. कविता छंदबद्ध नाही असे त्याच म्हणतात. परंतु यमकाशी त्यांचा चांगला ऋणानुबंध आहे, हे लक्षात येते. 'कविता करण्यात सातत्य ठेव' हा कुसुमाग्रजांनी दिलेला मोलाचा सल्ला मनी बाळगला तर उत्तम कवयित्रींच्या पंक्तीला बसण्याचा मान दूर नाही, असे विश्वासाने म्हणावेसे वाटते. अशोक नायगावकर, सौमित्र, डॉ. आशुतोष जावडेकर, शिरीष गोपाळ देशपांडे, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या कवितांचे मनापासून कौतुक केले आहे. 'भरारी'ला साजेसे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १५० रुपये  सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**सप्तरंगी कोरिया**
**सुधा हुजूरबाजार–तुंबे**




**द लँड ऑफ मॉर्निंग काम**

*''निळ्या आणि जांभळ्या रंगामधील छटा ही 'पारवा' रंग म्हणून ओळखली जाते. आत्मपरीक्षण, वास्तविकतेची जाण, नवीन विचार, मानवी हक्कांसाठी झगडणारी, पारंपरिक रीतिरिवाजांवर नवीन आधुनिक तत्त्वांची उभारणी, समाजसेवा, देशसेवा वगैरे बाबी या रंगाच्या द्योतक मानल्या जातात आणि त्या दक्षिण कोरियासाठी लागू पडतात. कोरियन जीवनात राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेमाला अग्रस्थान दिले जाते. तसेच, समाजसेवा ही सर्वसामान्यांच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग असते.''*

सप्तरंगी कोरिया : एक अनुभव हे सुधा हुजूरबाजार–तुंबे यांचे पुस्तक. 'एक अनुभव' म्हणून लेखिका तेथील वास्तव्याच्या कालखंडाविषयी सांगत आहेत. हे सांगणे म्हणजे केवळ प्रवासवर्णन आहे असा मात्र समज असेल तर तो चूक ठरावा. द. कोरियात त्यांचे वास्तव्य जवळपास ७८ महिन्यांचे, म्हणजे आयुष्याचा एक लहानसा कप्पा व्यापला जावा असा हा कालखंड. या कालखंडात प्रत्यक्ष वावरत असताना लेखिकेला जे पाहता आले, करता आले त्या जगण्याचा हा अनुभवाधारित कालखंड आहे. अनेक जण परदेशात आलेल्या अनुभवांना, वेगवेगळ्या पातळ्यांवर सामोरे जातात. नवीन प्रदेश, संस्कृती, भाषा, व्यवहार, यांच्याशी जुळवून घेताना अनुभवांचे बरेवाईट प्रसंग येतातच. परंतु हे संचित अक्षरांच्या कोंदणात सजवून वाचकाच्या हाती देण्यात हवे तितके स्वारस्य ते दाखवत नाहीत. सुधा हुजूरबाजार तुंबे यांनी मात्र ती उणीव राहणार नाही याची काळजी घेतलेली आहे. मुळातच कोरिया या देशाविषयी, त्याच्या अंतरंगाविषयी फारसे लेखन उपलब्ध नाही. मात्र लेखिकेने कोरिया, जो आतापर्यंत परका वाटत आला आहे, तो आपला, आपुलकीचा, कुतूहलाचा स्वत:चे वेगळेपण जपणारा देश आहे, हे या त्यांच्या अनुभवांच्या आधारावर खात्रीने पटवून दिले आहे.

कोरिया तसा लहानसा, तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला, सुमारे पाच कोटी लोकसंख्येचा देश! परंतु त्याने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. इथले सगळे व्यवहार त्यांच्या 'हांगुळ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाषेतूनच केले जातात. परदेशी नागरिकांची भाषेची गैरसोय होऊ नये म्हणून 'ग्लोबल सेंटर'मध्ये ती मोफत शिकवली जाते. १० स्वर, १४ व्यंजने अशा २४ मुळाक्षरांची तयार केलेली भाषा आहे. लेखिकेने ही भाषा अवगत केली तीही प्रावीण्यासह. त्यामुळे तेथील वास्तव्यात सगळे व्यवहार आणि वैयक्तिक पातळीवरील परस्परसंबंध यात त्यांना कुठे अडथळे आले नाहीत, उलट फायदाच अधिक झाला; इतका की रेनबो पोलीस स्वयंसेवक, गांगनाम पब्लिसिटी ॲम्बॅसेडर म्हणून नियुक्ती मिळण्यापर्यंतचा प्रवास झाला तो याच भाषाप्रावीण्यामुळे. तेथील वृत्तपत्रांमध्येही त्यांनी लेखन केले.

सुरक्षा आणि सभ्यता हा कोरियाचा अभिमानबिंदू आहे. प्रामाणिकपणा कोरियन रक्तात भिनलेला आहे. वाचनाची आवड तर राष्ट्रीय छंद जोपासण्यासाठी सर्वांनाच असते, त्यामुळे पुस्तकांच्या मोठमोठ्या दुकानांत कायम गर्दी असते.

लेखिका कोरियन संस्कृतीचा परिचय करून देतात. तिथे बुद्धपौर्णिमा साजरी केली जाते तशी ती कोरियात जागोजागी बुद्धाच्या मंदिरातून रंगीत कागदी आकाशदिव्यांची नयनमनोहर रोशणाई करून साजरी केली जाते. भारतात सर्वपित्री अमावास्या पाळली जाते, तसा कोरियात च्युसॉक हा वार्षिक सण होतो आणि त्याची जबाबदारी कुटुंबातील मोठ्या मुलाने पार पाडायची असते. अर्थात या परंपरेच्या कारणास्तव कोरियन मुली अशा मोठ्या मुलास वर म्हणून लग्नासाठी प्राधान्य नाकारतात; हा गमतीचा भाग नसून हल्लीच्या तरुण मुलीच्या कलाकडे त्या लक्ष वेधतात. गमतीचा आणखी एक भाग असा, की लग्नात आहेर घेण्याची पद्धत त्यांच्याकडेही आहे.

बागा, पर्यटनस्थळे, हॉटेले, शाळा, शिक्षण, कुटुंबव्यवस्था, नोकरी, पोषणआहार, खेडी, खाद्यपदार्थ, पेहेराव, रहदारी, शिस्त–नियम, व्हिसा, पोलीस, रंग, मिलिटरी, कंपन्या, टीव्ही, ऋतू, आर्थिक व्यवहार अशा अनेक घटकांचे निरीक्षण, त्यांची वैशिष्ट्ये लेखिकेने खूप जागरूकपणे टिपलेली आहेत. कोरियन भाषा, मोकळा स्वभाव यामुळे मैत्रिणींचा गोतावळा, भेटवस्तूंची विशेषत: भारतीय वस्तूंची देण्यातली गंमत, भारतीय खाद्यपदार्थांची चव आणि तेथील खाद्यपदार्थांशी साधलेली जवळीक, यांचे प्रसंग त्यांच्या स्वभावाचे बारकावे उलगडून दाखवतात.

साधारणपणे परदेश पाहून आल्यानंतर तेथील अनुभवांची फार रंजक वर्णने केली जातात. परंतु लेखिकेने अतिशय संयमितपणे आणि जे भावले ते तसेच इथे व्यक्त केले आहे. हे सारे टीपकागदासारखे वेचलेले आहे. त्याला त्यांच्या अनुभवांची जोड आहे. सोबतीला एक कलात्मक असा सौंदर्य–रसिकतेचा गंध या लेखनाला आहे. तेथील निसर्गाची विविध रूपे त्या त्या ऋतूप्रमाणे त्यांनी अनुभवली, ती त्यांच्या लेखनात अवतरली आहेत. पुस्तकाची मांडणी सात प्रकरणात केलेली आहे. त्यांच्या शीर्षकाची यादी तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा अशा सप्तरंगाची आहे. थोडक्यात त्या प्रत्येक रंगाशी त्या देशातील वैशिष्ट्यांची उत्तम गुंफण केलेली आहे. जवळून झालेल्या कोरियन समाजाचे दर्शन या रंगांतून प्रकट झालेले आहे.

सुधा हुजूरबाजार–तुंबे यांचे ही पुस्तकरूपाने प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती आहे. त्यांचे लेख विविध वृत्तपत्रे व मासिकांतून प्रकाशित झालेले आहेत. त्या उच्चविद्याविभूषित असून विविध प्रतिष्ठित महाविद्यालयांतून अध्यापनाचे कार्य केलेले आहे. शिक्षक, समुपदेशक, मार्गदर्शक, पुनर्वसन अधिकारी म्हणूनही त्या कार्यरत आहेत.

थोर शास्त्रज्ञ जयंती नारळीकर आणि मंगला नारळीकर यांनी प्रस्तावनेत या पुस्तकाचे आणि लेखिकेचे मनापासून कौतुक केले असून पुस्तकाचे महत्त्वही अधोरेखित केले आहे. सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि मांडणी सुरेख केलेली आहे.

**मूल्य ३५० रुपये   सवलतीत २०० रुपये**

॥ग्रंथाली॥

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

१०१, १/बी, 'द नेस्ट', पिंपळेश्वर सोसायटी, टायकलवाडी, मनोरमा नगरकर मार्ग, स्टार सिटीसमोर, माहीम (पश्चिम), मुंबई ४०००१६. दूरध्वनी : ०२२-२४२१६०५० । Email - granthali01@gmail.com

# 'ग्रंथाली'ची 'अमृतग्रंथ' योजना

कवी-लेखक अशोक नायगावकर यांच्या कवितांनी रसिकांना हास्यासोबत विचारप्रवृत्तही केले आहे. या कलंदर व्यक्तिमत्त्वाची छाप साऱ्या मराठीजनांवर आहे. त्यांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली. त्यानिमित्त त्यांचा खास सत्कार 'ग्रंथाली'ने योजला. त्याचे औचित्य साधून 'ग्रंथाली'ने गेल्या दोन वर्षांत प्रसिद्ध केलेल्या ७५ पुस्तकांच्या खास संचाची योजना केली आहे. मूळ २१,००० रुपये किमतीचे हे ग्रंथ केवळ ७,५०० रुपयांत उपलब्ध केले आहेत. त्यासह विशेष भेट आहे ती अशोक नायगावकर यांच्या दोन कवितासंग्रहांची आणि त्यांच्या आठवणी जागवलेल्या व त्यांची स्वाक्षरी असलेल्या 'नायगावकर वगैरे वगैरे...' या पुस्तकाची. २९ डिसेंबर २०२२ या त्यांच्या जन्मदिनापासून फेब्रुवारी २०२३ मधील आगामी साहित्य संमेलन या कालावधीपुरती ही योजना आहे. त्याचा अधिकाधिक वाचक/संस्था/वाचनालये यांनी लाभ घ्यावा.








संपादक
डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी / डॉ. अजय देशपांडे

मूल्य ७५० रु.
सवलतीत ५०० रु.




संपादक
रमेश अंधारे

मूल्य १५०० रु.
सवलतीत १००० रु.




संपादक
विवेक पाटकर / हेमचंद्र प्रधान

मूल्य ७५० रु.
सवलतीत ५०० रु.

६०

महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवानिमित्त 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले तीन खंड

एकूण किंमत
२१,०३० रु.

**पंचाहत्तर पुस्तकांचा संच**
(टपाल/वाहतूक खर्च १५० रुपये वेगळा)

संचाची किंमत
७,५०० रु.






















| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| १. | शब्दांचा झुला | मोनिका गजेंद्रगडकर | २०० रुपये |
| २. | जिणं शोषितांचं | वृषाली मगदूम | ३०० रुपये |
| ३. | ढगाखाली | चांगदेव काळे | ३५० रुपये |
| ४. | जागो, मैं खुदा हूँ | किरण येले | १०० रुपये |
| ५. | तिरकस चौकस | सॅबी परेरा | २५० रुपये |
| ६. | नोबेलनगरी (२०२२) | सुधीर/नंदिनी थत्ते | १०० रुपये |
| ७. | फक्त तीच्यासाठी | डॉ. स्मिता दातार | ३५० रुपये |
| ८. | सप्तरंगी कोरिया | सुधा हुजूरबाजार-तुंबे | ३५० रुपये |
| ९. | राहा फिट | डॉ. अविनाश सुपे | ३०० रुपये |
| १०. | 'सर्जन'शील | डॉ. अविनाश सुपे | ३५० रुपये |
| ११. | माझी कॉर्पोरेट दिंडी | माधव जोशी | ३०० रुपये |
| १२. | सव्वाशे बोधकथा (भाग ३) | डॉ. दिलीप पांढरपट्टे | २०० रुपये |
| १३. | सव्वाशे बोधकथा (भाग ४) | डॉ. दिलीप पांढरपट्टे | २०० रुपये |
| १४. | प्रिय प्रतिमास, रेणूकडून | रेणू दांडेकर | ३०० रुपये |
| १५. | वय झाल्यावर | रेणू दांडेकर | १५० रुपये |
| १६. | सृजनाच्या नव्या वाटा | रेणू दांडेकर | २०० रुपये |
| १७. | बखर घारापुरीची | रवींद्र लाड | ३०० रुपये |
| १८. | मी बहुरूपी | अशोक सराफ<br>शब्दांकन : मीना कर्णिक | ६०० रुपये |
| १९. | कॅन्सर म्हणजे...<br>डोकं फिरलेल्या पेशी | डॉ. सतीश नाईक<br>डॉ. दुर्गा गाडगीळ | २५० रुपये |
| २०. | युक्तीच्या गोष्टी<br>सांगणाऱ्याची गोष्ट | शिल्पा शिवलकर | ३०० रुपये |
| २१. | कॅडेट नंबर ३४५० | कॅप्टन सचिन गोगटे | ४०० रुपये |
| २२. | कथा परमवीरचक्र विजेत्यांच्या<br>आणि ऑपरेशन सद्भावना | अनुराधा गोरे | ३५० रुपये |
| २३. | नाही चिरा नाही पणती | स्मिता भागवत | २०० रुपये |
| २४. | हे सांगायला हवं | मृदुला भाटकर | २५० रुपये |
| २५. | विदेशी गुदगुल्या | आनंद गर्दे | २०० रुपये |
| २६. | आनंदयात्री | जयंत नाईकनवरे | २०० रुपये |
| २७. | यशपुष्प | डॉ. आशुतोष रारावीकर | २०० रुपय |
| २८. | भावतरंग | सुषमा शाळिग्राम | २०० रुपये |
| २९. | भरारी | डॉ. कांताताई नलावडे | १५० रुपये |
| ३०. | चिंतन (भाग ३) | शरद काळे | ७५० रुपये |
| ३१. | गाऊ त्यांना आरती | अनुराधा गोरे | ३०० रुपये |
| ३२. | पटावरच्या सोंगट्या | चांगदेव काळे | २५० रुपये |
| ३३. | चाकोरी मोडणारे पुरुष | हरीश सदानी | १५० रुपये |
| ३४. | विज्ञानाच्या पाऊलखुणा | शरद काळे | ४०० रुपये |
| ३५. | चंबुखडी ड्रीम्स | डॉ. जगन्नाथ पाटील | ३५० रुपये |
| ३६. | राजा कालस्य कारणम् | बा. ग. केसकर | २५० रुपये |
| ३७. | उभारणी | भगवान इंगळे | २५० रुपये |
| ३८. | हसायदान | डॉ. प्रकाश लोथे | २०० रुपये |














































| | | | |
|---|---|---|---|
| ३९. | हमारी याद आएगी | कुमार सोहोनी | २५० रुपये |
| ४०. | त्सावोचे नरभक्षक | मूळ लेखक (इंग्रजी) : जॉन हेन्री पॅटरसन<br>अनुवाद : विनय वसंत देशपांडे | ३०० रुपये |
| ४१. | तरंग भवतालचे | विनता कुलकर्णी | २०० रुपये |
| ४२. | अक्षरयात्रा | डॉ. प्रियदर्शन मनोहर | २५० रुपये |
| ४३. | वादळवाट | एम. डी. देशमुख | ४०० रुपये |
| ४४. | जॅक ऑफ ऑल | अनुराधा गोरे | १३० रुपये |
| ४५. | पिठाई ते पिकवे | शुभांगी पाटील | ३०० रुपये |
| ४६. | वाळूत उमटलेले ठसे | अर्चना जगदीश | २०० रुपये |
| ४७. | सागरात हिमशिखरे | मेधा आलकरी | ३०० रुपये |
| ४८. | वारस होऊ अभिमन्यूचे | अनुराधा गोरे | ३०० रुपये |
| ४९. | साडी गं साडी | ज्योती रत्नपारखी-वालझाडे | ४०० रुपये |
| ५०. | १९७१चा रणसंग्राम | अनुराधा गोरे | ३५० रुपये |
| ५१. | रंगभूमीचे सौंदर्यशास्त्र | देवेंद्र राज अंकुर<br>अनुवाद : डॉ. वसुधा सहस्रबुद्धे | २५० रुपये |
| ५२. | शूरांच्या शौर्यगाथा | शशिकांत जागीरदार | २५० रुपये |
| ५३. | ओळख सियाचेनची | अनुराधा गोरे | ४५० रुपये |
| ५४. | अशक्य ते शक्य...<br>कारगिल संघर्ष | अनुराधा गोरे | ४५० रुपये |
| ५५. | गुंफियेला शेला | संपदा जोगळेकर-कुळकर्णी<br>सोनाली लोहार, हर्षदा बोरकर<br>निर्मोही फडके | ४०० रुपये |
| ५६. | प्राजक्तप्रभा | प्राजक्ता माळी | १०० रुपये |
| ५७. | वंश-अनुवंश | डॉ. हेमा पुरंदरे | ६०० रुपये |
| ५८. | दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स | सुधीर नाफड | २२५ रुपये |
| ५९. | बाबा आमटे | बाळू दुगडूमवार | ३०० रुपये |
| ६०. | लाल दिव्याची वस्ती आणि<br>निष्पाप बालपण | डॉ. राणी खेडीकर | १५० रुपये |
| ६१. | अस्पृश्य देवता आणि<br>निवडक कथा | मूळ लेखिका : डॉ. प्रतिभा राय<br>अनुवाद : डॉ. वसुधा सहस्रबुद्धे | २०० रुपये |
| ६२. | प्लास्टिक सर्जरी अर्थात<br>सुघटन शल्य | रविन थत्ते | ३५० रुपये |
| ६३. | पुस्तकांच्या चित्रवाटा | शिरीष घाटे | ७५० रुपये |
| ६४. | बाऊन्सर | रवी मांद्रेकर | ५०० रुपये |
| ६५. | हुंकारनाद | अनुराधा नेरूरकर | १५० रुपये |
| ६६. | लोकमान्य टिळक :<br>एक चिकित्सक अभ्यास | संकलन : डॉ. माधव राजवाडे | ३०० रुपये |
| ६७. | दावणीला बांधलेले लोक | भरतकुमार गायकवाड | १२५ रुपये |
| ६८. | स्वयंभू | मकरंद देवराम भारंबे | २५० रुपये |
| ६९. | परक्या मातीत रुजताना | उषा तांबे | २०० रुपये |
| ७०. | प्रेमसेतू | संदीप रामराव काळे | २५० रुपये |
| ७१. | आतल्या विस्तवाच्या कविता | संजय चौधरी | १५० रुपये |
| ७२. | माझं इवलं हस्ताक्षर | संजय चौधरी | १०० रुपये |
| ७३. | भारतीय अध्यात्मशास्त्र<br>गीता आणि विपश्यना | जनार्दन शां. संखे | २५० रुपये |
| ७४. | रोजी-रोटी | विजय कसबे | ५० रुपये |
| ७५. | यश म्हणजे काय ? | शिल्पा खेर | ३५० रुपये |


लोकमान्य
Co-powered by
Finance Partner
Travel Partner
AMRITH NONI
लोकमान्य
KESARI
बुध - शनि
9.30 PM
ZEE मराठी
Co-powered by:
Finance Partner:
Travel Partner:
Streaming Partner:
AMRITH NONI
लोकमान्य
KESARI
ZEE5

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.